सार्थपिङ्गलछन्दःसूत्र

पं. शिवरामशास्त्री शिंत्रे

श्री

वेदाङ्गार्थचन्द्रिका

भाग तिसरा

अथ

सार्थपिङ्गलछन्दःसूत्र

लेखक

काव्यालंकारभूषण **पं. शिवरामशास्त्री शिंत्रे,**

संस्कृताध्यापक, एलिफन्स्टन कॉलेज, मुंबई

किंमत १२ आणे

१९३५

मुद्रक—एम्. एन्. कुळकर्णी, कर्नाटक प्रिन्टिंग प्रेस, कर्नाटक हाउस,
चिराबझार, मुंबई.
प्रकाशक—पं. शिवरामशास्त्री शिंत्रे, जयराम कानजीची नवी चाळ,
मुगभाट क्रॉसलेन, मुंबई.

प्रास्ताविक दोन शब्द

आमच्या कॉलेजांतील संस्कृत विषयाचे अध्यापक पंडित शिवरामशास्त्री शिंत्रे यांनीं तयार केलेल्या या पिंगलकृत छन्दःसूत्राच्या सार्थ आवृत्तीला प्रास्ताविक दोन शब्द लिहिण्यांत मला आनंद वाटतो. बहुतेक सर्व वेदाङ्गांचीं मराठी भाषांतरें शास्त्रीबोवांनीं कित्येक वर्षांपूर्वी करून ठेवलेलीं आहेत. पण प्रकाशनास आवश्यक असलेलें आर्थिक साहाय्य न मिळाल्यामुळें तें लिखाण इतके दिवस हस्तलिखिता-वस्थेंतच राहिलें होतें. आतां त्यांनीं सार्थ वेदाङ्गें प्रसिद्ध करण्यासाठीं श्रीवेदाङ्गार्थ-चन्द्रिका नांवाची एक माला सुरू केली आहे. त्या मालेंत प्रसिद्ध होणारें हें दुसरें पुस्तक आहे. पूर्वीचें पुस्तक म्हणजे सार्थ शिक्षा हें १९३३ सालीं प्रसिद्ध झालें आहे.

निखिल संस्कृत वाङ्मयामध्यें वैदिक वाङ्मय हें अनेक दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाचें असलें तरी त्याच्या अध्ययनाची प्रथा मात्र आमच्या इकडील जुन्या पंडितवर्गामध्यें फारशी असलेली दिसत नाहीं. शास्त्रीमंडळींना वेदशास्त्रसंपन्न असें उपपद नेहमीं लावतात. या उपपदावरून वेदाध्ययन व शास्त्राध्ययन हीं दोनीहि सारख्याच महत्त्वाचीं आहेत अशी प्राचीन कल्पना होती हें सिद्ध होतें. अध्ययनकालीं वेदाध्ययनाकडे शास्त्रीमंडळीचें दुर्लक्ष झालें. त्यामुळें अलीकडील शास्त्रीमंडळी शास्त्रसंपन्न असली तरी वेदसंपन्न मात्र नसतात. शास्त्राध्ययनांत सबंध आयुष्य घालवणारे व अशा रीतीनें अनेक शास्त्रांत पारंगत झालेले शास्त्री दृष्टीस पडतात. पण वैदिक वाङ्म-याचा तितक्याच तत्परतेनें अभ्यास करणारे शास्त्री उपलब्ध होत नाहींत. क्वचित् कांहीं शास्त्र्यांनीं वेदांचा अभ्यास केला असल्यास सायणाचार्यांच्या भाष्यापलीकडे त्यांची दृष्टी गेलेली नसते. वेदपठन मात्र–वेदाध्ययन नव्हे–अति प्राचीन काला-पासून आतांपर्यंत अव्याहत चालू आहे व त्यामुळेंच वैदिक वाङ्मयाचें, त्यांत कोणत्याहि प्रकारचा फरक न होतां, संरक्षण झालें आहे.

वैदिक वाङ्मयाच्या अध्ययनाविषयींची अनास्था जुन्या शास्त्रीमंडळींतच दिसून येते असें नाहीं. पाश्चात्य विद्याविभूषितांमध्येंहि तोच प्रकार पुष्कळ अंशानें सांपडतो. अलीकडील काळांत वैदिक वाङ्मयाचें महत्त्व पाश्चात्य पंडितांनींच आम्हांस पटवून दिलें असें म्हटल्यास त्यांत फारशी अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. पण कोणत्या कारणानें कां होईना भारतीयांना अलीकडे वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाचें महत्त्व

पटलें आहे यांत शंका नाहीं. अशा वेळीं पंडित शिवरामशास्त्री शिंत्रे यांची ही वेदाङ्गार्थचन्द्रिका वेदाध्ययनाकडे जनतेचें लक्ष्य ओढण्यास उपयोगी पडेल अशी मला खात्री वाटते.

सहाध्यापक या नात्यानें शिंत्रेशास्त्री यांचा व माझा परिचय गेल्या सहासात वर्षांचा आहे. या अवधींत त्यांचा मनमिळावू स्वभाव, निरलस व विनयशील वृत्ति व सतत व्यासंगाची आवड यांचा मला पूर्ण अनुभव आलेला आहे. त्यांच्या या पुस्तकप्रकाशनाला मुंबई विश्वविद्यालयाकडून आर्थिक साहाय्य मिळालें आहे. त्याच संस्थेकडून किंवा दुसरीकडून असेंच आर्थिक साहाय्य त्यांना मिळेल तर बाकी राहिलेल्या व यापेक्षां विस्तारानें कितीतरी मोठ्या वेदाङ्गांचें प्रकाशन त्यांच्याकडून होईल यांत शंका नाहीं. अशा कार्यास लागणारा उत्साह शास्त्रीबोवांमध्यें भरपूर आहे. आवश्यक आर्थिक साहाय्य त्यांना मिळेल व ही वेदाङ्गार्थचन्द्रिका लवकरच पूर्ण होईल असें मी इच्छितों.

एल्फिन्स्टन् कॉलेज
ता. २९ ऑगस्ट १९३५

अ. बा. गजेंद्रगडकर

उपोद्घात.

—0—

आमच्या वेदांगार्थचंद्रिकेपैकीं सार्थछन्दःसूत्राचा हा तिसरा भाग, अभ्यासकांच्या सेवेकरितां प्रकाशित करण्यास आम्हांस अत्यंत संतोष वाटत आहे. ह्याची पहिली लेखी प्रत, आम्ही पूर्वी जळगांव पूर्वखानदेश येथील हायस्कुलांत संस्कृताध्यापक असतां, शके १८३६ सालींच लिहून तयार केली होती; परंतु आजवर द्रव्याचें साहाय्य न झाल्यामुळें प्रकाशन करतां आलें नाहीं. आतां **मुंबई विश्वविद्यालयानें ह्या पुस्तकाचे प्रकाशनार्थ उदार देणगी दिल्यामुळेंच ह्याचें मुद्रण संभवत आहे.** ह्या उदार आश्रयाबद्दल मी, मुंबई विश्वविद्यालयाचा अत्यंत आभारी आहें. असो, आतां प्रस्तुत विषयाकडे वळतों. मूळ वेदांचा पुष्कळसा भाग पद्यमय असल्यामुळें छन्दःशास्त्राचा मूळ पाया व बराच विस्तार वेदकालींच झाला होता. वाससनेयसंहिता अ. २३, मन्त्र ५८; 'षडस्य विष्ठाः शतमक्षराणि' वगैरे आहे. त्यावर भाष्यकार महीधर लिहितो कीं, ह्या अश्वमेध यज्ञाचीं अन्नें, सहा रसांमुळें सहा प्रकारचीं असून ह्याचीं अक्षरें शंभर आहेत. त्यांची उपपत्ति अशी कीं, ह्या यज्ञांत षडक्षरपादाच्या गायत्रीपासून १९ अक्षरीपादाच्या अतिधृतिपर्यन्त १४ छन्द उपयोजिले आहेत. ह्या चौदा वृत्तांच्या क्रमिक व उत्क्रमिक मोजण्यानें जमणाऱ्या जोड्यांची, प्रत्येकशः अक्षरें शंभर शंभर होतात. जसें गायत्रीची अक्षरें चोवीस व शेवटच्या अतिधृतीच्या चार पादांचीं एकंदर अक्षरें ७६, दोन्ही मिळून शंभर अक्षरें होतात. ह्याचप्रमाणें, उष्णिग्धृति, अनुष्टुबत्यष्टि, बृहत्यष्टि, पङ्क्तिअतिशक्वरी, त्रिष्टुप्शक्वरी, आणि जगत्यतिजगती ह्या छन्दोयुगलांचीं अक्षरेंही शंभरच भरतात. ह्याप्रमाणें अश्वमेधाचीं म्हणजे अश्वमेधांत उपयोजिलेल्या छन्दांचीं अक्षरें शंभर, ह्याची उपपत्ति झाली. इतकी प्रगल्भ छन्दःकल्पना इतक्या प्राचीनकालीं देखील होती. इतरत्र संहिता ब्राह्मणग्रन्थांतूनहि अनेक छन्दांचीं नांवें व स्वरूपें आढळतात. ह्या पिङ्गलसूत्रांतही क्रौष्टुकि (अ० ३–२९), यास्क (३–३०), ताण्डिन् (३–३६), सैतव (५–१८), काश्यप (७–९), रात–माण्डव्य (७–३४)

अशीं प्राचीन छन्दःसूत्रकारांचीं नांवें आढळतात. पाणिनीच्या व्याकरणाच्या श्रेष्ठत्वामुळें तत्पूर्वीचीं व्याकरणें मागें पडलीं, त्याचप्रमाणें प्रकृत पिङ्गलछन्दःसूत्रानें प्राचीन छन्दःसूत्रें मागें पडलीं व हेंच सूत्र वैदिकांकडून वेदाङ्ग म्हणून मानलें जाऊं लागलें असावें असें वाटतें. वस्तुतः शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द व ज्योतिष ह्यांत प्रतिपादन केलेल्या विषयावर लिहिलेल्या वेदानुसारी सर्व ग्रन्थांना वेदाङ्गत्व मानिलें पाहिजे व ह्याचप्रमाणें अनेक शिक्षा, अनेक प्रतिशाखें व अनेक ज्योतिषें वगैरे वेदाङ्ग ग्रन्थ म्हणून विद्वन्मान्य आहेतच; तथापि गुणाधिक्यामुळें अथवा शिष्टसंमतीमुळें पुष्कळ ग्रन्थांपैकीं एखाद्याच्याच नशीबीं वेदाङ्ग ही संज्ञा येते. प्रस्तुत पिङ्गलसूत्र वेदाङ्ग म्हणून हजारों वर्षे वैदिक लोक मानीत आले आहेत. ह्यांत पाणिनीय दर्शनाप्रमाणें वैदिक व लौकिक अशा उभयविध छन्दोविषयांचें वर्णन आहे. सूत्रकार पिङ्गलाला सुमारें बावीसशें वर्षे झालीं असून सुप्रसिद्ध वेदाङ्गशिक्षा ह्याच पिङ्गलानें, जुन्या पाणिनीय शिक्षेचा संक्षेप म्हणून रचिली असावी असा आमचा तर्क आहे, तो आम्ही पाणिनीय शिक्षेच्या प्रस्तावनेंत पूर्वीच प्रसिद्ध केला आहे. कारण पुष्कळ शिक्षा पुस्तकांच्या शेवटीं ' पिङ्गलाचार्य विरचिता शिक्षा समाप्ता ' असा उल्लेख आहे. सिद्धान्तकौमुदीच्या बालमनोरमाटीकेंत, वेदाङ्गशिक्षा कोणीतरी पाणिनिशिष्यानें रचिली आहे असें लिहिलें आहे; अर्थात् साक्षात् पाणिनिकृत नाहीं हें सिद्धच होतें; तो पाणिनिशिष्य किंवा पाणिन्यनुयायी पिङ्गलच होय असें, आम्ही इतर प्रमाणांवरून म्हणतों इतकेंच. अथ शिक्षां प्रवक्ष्यामिपाणिनीयं मतं यथा ' म्हणजे पाणिनीच्या मताप्रमाणें मी शिक्षेचें प्रवचन म्हणजे उत्कृष्ट व्याख्यान करतों, असें शिक्षासूत्र आहे. शिक्षा वगैरे साही वेदाङ्गांचा वेदांमध्यें संक्षेपानें निर्देश आहे. उदाहरणार्थ, तैत्तिरीयोपनिषदांत शिक्षावल्लींत दुसरा अनुवाक आहे. त्याचेंच प्रवचन शिक्षा, प्रातिशाख्य वगैरे ग्रन्थ आहेत. असो, वरच्या प्रवचनप्रतिज्ञेप्रमाणेंच, 'कालज्ञानं प्रवक्ष्यामि लगधस्य महात्मनः' म्हणजे महात्म्या लगधाचार्यांच्या कालज्ञानाचें, मी आतां प्रवचन करीन; अशी शिक्षारम्भाशीं सदृश प्रतिज्ञा, प्रचलित वेदाङ्ग ज्यौतिषांत दिसते; म्हणून शिक्षेप्रमाणेंच ज्यौतिषाचेंही प्रवचन किंवा संक्षेप पिङ्गलाचार्यांनेंच करून वैदिकांची सेवा केली असावी व हें छन्दःसूत्र मात्र प्रवचनरूप नसून स्वतः स्वतन्त्र रचिलें असावें असें आम्हांस वाटतें; अर्थात् त्याला वैदिक ग्रन्थांचें व प्राचीन आचार्यांच्या ग्रन्थांचें साह्य झालेंच असेल; तथापि मी अमक्या प्राचीन ग्रन्थाचें प्रवचन करतों अशी ह्यांत प्रतिज्ञा नसल्यामुळें हें सूत्र स्वतंत्र अशी पिङ्गलकृति ठरते. वेदाङ्गज्यौतिषाचा संक्षेप गर्गानें

केला असावा असें आर्यविद्यासुधाकरांत म्हटलें आहे तें बरोबर नाहीं; कारण त्याला पुरेसा पुरावा नाहीं; उलट गर्गकालीं ज्यौतिषाचा बराच विस्तार झाला होता त्याचा ओझरता उल्लेखही प्रचलित ज्यौतिषसूत्रांत नाहीं, हें उलटें त्या विधानाला बाधकच आहे. आमच्या तर्काला, समानाक्षर प्रतिज्ञेशिवाय पिङ्गलाचार्य हा प्रख्यात शास्त्रकार होता अशांविषयींचे प्राचीन उल्लेख आधार आहेत. नवव्या शतकांत उत्पन्न झालेल्या राजशेखराच्या काव्यमीमांसा ग्रन्थांत दहाव्या अध्यायाच्या शेवटीं, पुढें दिलेला उल्लेख आहे 'श्रूयते हि पाटलिपुत्रके शास्त्रकारपरीक्षा। अत्रोपवर्षवर्षाविह पाणिनि-पिङ्गलाविह व्याडिः। वररुचिपतञ्जली इह परीक्षिताः ख्यातिमुपजग्मुः'॥ ह्याचा अर्थ–कारण पाटलिपुत्रामध्यें (पाटणा) शास्त्रकारांची परीक्षा होत असे, असें ऐकण्यांत आहे. ह्याच पाटलिपुत्रकांत उपवर्ष, वर्ष, पाणिनि, पिङ्गल, व्याडि, वररुचि व पतञ्जलि हे परीक्षेच्या दिव्यांतून पार पडल्यावर सर्व देशांत प्रसिद्धि पावले. येथें पाणिनीच्या जोडीनें पिङ्गलाचा उल्लेख केला आहे त्यावरून तोहि त्याच्या तोडीचा व वैदिकमान्य शास्त्रकार होता असें दिसतें. हा पिङ्गलाचार्य–अथवा कांहीं ग्रन्थकारांच्या मतानें पिङ्गलनाग–हा ब्राह्मण असून प्राकृतपिङ्गलसूत्रकार पिङ्गलनाग हा क्षत्रिय होता. त्याचा व ह्याचा कांहींही संबंध नाहीं असें प्राकृतपिङ्गल ग्रंथावरून व ह्या दोन्ही सूत्रांच्या प्रक्रिया, काल वगैरेवरून दिसतें. असें असतां दोन्ही सूत्रकार एकच असें कोणी समजतात तें चुकीचें आहे. प्राकृतपिङ्गलांत, हम्मीर, काशीश, कलचुलिकर्ण इत्यादि अति अर्वाचीन राजांचा उल्लेख असून भाषाही फार अर्वाचीन आहे. संस्कृतसूत्रांपेक्षां प्रक्रिया, कांहीं वृत्तनामें वगैरेही प्राकृतसूत्रांत वेगळीं आहेत. उदाहरणार्थ, प्राकृतच्छन्दः परिच्छेद २–१४६ ह्या सूत्रांत संस्कृतांतील द्रुतविलंबितवृत्ताला सुन्दरी असें नांव दिलें आहे (सुमुहि सुन्दरि पिङ्गललक्खिआ). प्राकृतपिंगल २–२०४ वरून कवीनें, स्वपत्नीला उद्देशून त्या सूत्राची रचना केली असावी असें दिसतें. २–२७१ मध्यें, पिङ्गलपत्नीचें नांव पद्मावती ठरते. प्राकृतसूत्रांत रथोद्धता, स्वागता, अनुकूला, भ्रमरविलसित वगैरे संस्कृतसूत्रांतलीं वृत्तें नसून दोहा, निशिपालक वगैरे अनेक वेगळीं वृत्तें आहेत. परि० २–६७ भत्ती खत्ती विज्जू राजा=भक्त्या क्षत्रियों वित्थ राजा असें म्हटलें आहे. म्हणजे क्षत्रिय राजा पिंगल, असें विद्युन्मालेचें लक्षण भक्तीनें सांगतो. ह्या सूत्रांत त्याचें क्षत्रियत्व स्पष्टच असून शास्त्रारम्भीं 'जो विविहमत्तसागरपारं पत्तो विविमल मतिहेलम्। पढमं भासतरण्डो णाओ सो पिङ्गलो जअइ' ह्या पद्यांत आद्य संस्कृत

छन्दःसूत्रकार पिङ्गलाच्या जयवादानें, त्याविषयीं आपला नम्रपणा व्यक्त केला आहे; त्यानेंही प्राकृतसूत्रकार पिङ्गलाचार्यांहून वेगळा ठरतो. ह्या गाथेची संस्कृतच्छाया, 'यो विविधमात्रासागरपारं प्राप्तो विविमलमतिहेलम्, प्रथमं भाषातरण्डो ज्ञातः स पिङ्गलो जयति' अशी आहे. ह्याचा अर्थः जो सर्वां आधीं संस्कृतभाषारूपी नौकेच्या साह्यानें व आपल्या अतिशय निर्मल अशा बुद्धीच्या लीलेनें, अनेकविध छन्दोरूपी (मात्रा) समुद्राच्या परतीराला पोचला तो सुविख्यात पिङ्गलाचार्य सर्वछन्दःशास्त्रज्ञांत जय पावत आहे म्हणजे सर्वोत्कृष्ट आहे. रविकर कृत प्राकृतछन्दष्टीकेंत 'णाओ सो' ह्याची छाया 'नागः सः' अशी करून पिङ्गलनाग असा अर्थ केला आहे. हें लिहिणें वैदिकांच्या पठनांत असलेल्या 'मयरसतज' ह्या प्राथमिककारिकेंतील 'स जयति पिङ्गलनागः शिवप्रसादादविशुद्धमतिः' ह्या उल्लेखास धरून आहे व पिङ्गलाला पिङ्गलनाग म्हणण्याची परंपरा फार जुनी व प्रसिद्ध आहे; तथापि आम्हास पहिलीच छाया सत्य वाटते. प्रत्येक सुप्रसिद्धपुरुषाला अवतारी पुरुष मानून त्याची योग्यता वाढविण्याची इच्छा धरणें हा श्रद्धाजाड्याचा परिणाम आहे. ह्यामुळेंच प्राकृतपिंगलाचा टीकाकार लक्ष्मीनाथभट्ट ह्यानें, परि०१-७७ ह्यावर लिहितांना 'पिङ्गलो ब्राह्मणोऽभवद्यः शेषनागस्तेन' अशी, 'पिङ्गल होते सेसणाअ तण रोला वुत्ते' ह्यांतील पहिल्या तीन पदांची टीका दिली आहे. ह्यामध्यें क्षत्रियपिङ्गलाला ब्राह्मण व शेषावतार समजण्याची चूक केली आहे. कोणी लोक तर पतञ्जलीलाच शेषावतार व पिङ्गल मानतात. ह्या नागशब्दाच्या चुकीला अनुसरूनच 'विविमलमतिहेलम्' ह्याचा अर्थ, वि म्हणजे गरुड त्याच्या विमलमतीचा तिरस्कार (हेला) होईल अशा रीतीनें प्रस्तारमात्रांचा सागर ओलांडला; असा चमत्कारिक अर्थ केला असून गरुडवंचनाची आख्यायिकाही दिली आहे. ती कथा पुढें, मूळव्याख्यानांत आम्ही दिलेली आहे. जुन्या कालिदासानंतर झालेले पुष्कळ प्रासादिक कवी आपल्याला हौसेनें नवकालिदास म्हणवूं लागले त्याचप्रमाणें प्राचीन ब्राह्मणपिङ्गलाचार्याप्रमाणें प्राकृतपिङ्गलकारही स्वतःला–क्षत्रिय असून–पिङ्गलनाग व सर्पराज जागजागीं म्हणवीत आहे. वस्तुतः हा १४ व्या किंवा १५ व्या शतकांत उत्पन्न झालेला उत्तम भाषाकवि किंवा भाट असावा; अथवा नागजातीचा असून पिंगल हें त्याचें नांव असावें परंतु पिंगलनाग ह्या शब्दानें प्राकृत व संस्कृत छन्दांचा कर्ता एकच असा पुष्कळांना भ्रम होतो. 'सिंहो व्याकरणस्य कर्तुरहरत्प्राणान्प्रियान्पाणिनेर्मीमांसाकृतमुन्ममाथ सहसा हस्ती मुनिं जैमिनिम् । छन्दोज्ञाननिधिं जघान मकरो वेलातटे पिङ्गलमज्ञानावृतचेतसामतिरुषां कोऽर्थस्तिरश्चां गुणैः ॥ १ ॥ ह्या पञ्चतन्त्रादिग्रन्थांत

येणाऱ्या श्लोकाचा अर्थ, व्याकरणाचा कर्ता असणाऱ्या पाणिनीचे प्रियप्राण, सिंहानें नष्ट केलें; एक मदोन्मत्त हत्ती, मीमांसाशास्त्राचें सूत्र रचणाऱ्या जैमिनिमुनीला, एका-एकीं ठार करता झाला, समुद्रतीरीं एक मगर छन्दोज्ञानाचा सांठाच असलेल्या पिंगलाचार्याला मारता झाला; अज्ञानानें चित्त व्यापलेल्या अत्यंत क्रोधी अशा पशूंना सद्गुणांचा काय उपयोग? ह्या श्लोकावरून, पाटलिपुत्रांत शास्त्रकार म्हणून नांवाजलेले पिङ्गलाचार्य शेवटीं, समुद्रतीरीं मगराच्या तडाक्यांत सांपडून नामशेष झाले असें दिसतें. असो, छन्दःसूत्राचा प्रथमकर्ता पिङ्गलाचार्य अथवा कांहींच्या मतानें पिङ्गलनाग असून त्या सूत्रांच्या अनुरोधानें नंतर पुष्कळच छन्दःशास्त्रावरचे संस्कृत व प्राकृत ग्रन्थ झाले आहेत. बंगालच्या आशियाटिक सोसायटीनें सन १८७४ सालीं भट्टहलायुधकृत वृत्तिसहित संस्कृत छन्दःसूत्र मुद्रित केलें आहे. त्याच्या भूमिकेमध्यें पं. विश्वनाथशास्त्री, टीकाकार हलायुधाच्या धोरणानें, सूत्रकाराला पिङ्गलनाग असें म्हणतात; परंतु ते शेषावतार असते तर त्यांना मगराच्या हातानें मृत्यु येण्याचा असंभव दिसतो. टीकाकार हलायुध हा बाराव्या शतकांतला असून वंगनृपति लक्ष्मणसेनाचा मन्त्री होता असें पं. विश्वनाथशास्त्री म्हणतात. परंतु स्वतःच्या ब्राह्मणसर्वस्व ग्रन्थांत भट्टोजिदीक्षितांच्या ग्रन्थाला दूषण देणारा हलायुध चौदाव्या शतकांतलाच असावासें वाटतें, तो शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण असून मूळचा महाराष्ट्र, विदर्भ ह्या प्रांतांतला असावा, कारण पुष्कळ छन्दांच्या उदाहरणांत मुञ्जराजाची स्तुति असलेलें वर्णन आहे. कदाचित् हलायुधानें, उदाहरणें जुन्या ग्रन्थांतूनही घेतलीं असतील असें, सामुद्रिकविषयाचें प्रतिपादन करणाऱ्या अनेक उदाहरणांवरून वाटतें. अध्याय ४।५।६।७ मधलीं उदाहरणें पहा. कांहीं ठिकाणीं वृत्तिकारानें अधिकसूत्रांनीं मूलग्रन्थाचें पूरणहि केलें आहे. आतां मूळ छन्दःसूत्राकडे वळतों. ह्या सूत्राचे एकंदर आठ अध्याय असून त्यांपैकीं, पहिल्या अध्यायांत छन्दःशास्त्रांतल्या पारिभाषिक संज्ञा दिल्या आहेत. दुसऱ्या अध्यायांत गायत्र्यादि वैदिकछन्दांच्या अक्षरसंख्या दिल्या आहेत. तिसऱ्यांत गायत्री वगैरे अनेक वैदिक-छन्दांची लक्षणें व पादव्यवस्था, देवता, गोत्रें वगैरे माहिती आहे. चौथ्यांत आर्या, वैतालीय वगैरे जातिसंज्ञकवृत्तांचें वर्णन आहे. पांचव्यांत वृत्तसंज्ञकछन्दांपैकीं, अर्धसम व विषमवृत्ताचें वर्णन आहे. सहाव्या अध्यायांत प्रथम सविस्तर यतिसंबंधीं (विश्रामस्थानें) नियम असून त्यापुढें षडक्षरपाद गायत्रीपासून द्वादशाक्षरी जगती संपेपर्यन्त असलेल्या सात छन्दांतलीं प्रसिद्ध वृत्तें लक्षणांसह दिलीं आहेत. सातव्यांत त्रयोदशाक्षरी अतिजगतीवृत्तापासून सव्वीस अक्षरांचा पाद असलेल्या उत्कृतिपर्यन्त

असलेल्या छन्दांतलीं प्रसिद्ध वृत्तें, सलक्षण दिलीं आहेत. आठव्या अध्यायांत गाथा, प्रस्तार वगैरे छन्दःशास्त्राचा उरलेला विषय आला आहे. एकाक्षरी उक्तेपासून सव्वीस अक्षरी उत्कृतिपर्यन्त असलेलीं एकंदर समवृत्तें, तेरा कोटि, बेचाळीस लक्ष, सतरा हजार सातशें सव्वीस इतकीं होतात. 'रसलोचनसप्ताश्वचन्द्रदृग्वेदरामकैः। उक्तायुत्कृतिपर्यन्तप्रस्ताराणां मितिर्भवेत्॥ (शि. वि. शिन्त्रेशास्त्री). ह्या कारिकेंत सहरहू संख्या दिली आहे. ह्याशिवाय विषम, अर्धसम जाति व सव्वीस अक्षरांपुढील सर्व वृत्तांची संख्या वेगळीच. ह्यावरून छन्दांच्या अनन्तत्वाची कल्पना येईल. अष्टाध्यायात्मक असलेल्या ह्या छन्दःसूत्राचे अनुक्रमणीखण्डासह एकंदर एकोणीस खण्ड, वैदिकपाठांत दिसतात. परंतु ह्यापैकीं मयरसतज हा पहिला खण्ड व शेवटचा अनुक्रमणी खण्ड मूल सूत्रकाराचा नसून, कोणीतरी वार्तिककार किंवा भाष्यकार ह्यानें मागून जोडलेला असावा व मूलग्रन्थाप्रमाणें तोही वैदिकांच्या पाठांत चालू राहिला असावा असें वाटतें. कारण पहिल्या खण्डाचें मयरसवगैरे प्रतीक जरी ब्रह्मयज्ञप्रसंगीं म्हटलें जातें तरीही त्यांत पुनरुक्ति वगैरे दोष असल्यानें तो मूलसूत्राचा अंश नाहीं; शिवाय, इतर खण्डांच्या शेवटीं 'अष्टौवसव इति' असें इतिकरण आहे, तसें मय० वगैरे द्वादशसूत्रांच्या शेवटीं, वैदिकांच्या लेखी पोथ्यांतूनहि इतिकरण नाहीं हेंच त्याच्या अनार्षत्वाचें द्योतक आहे. अधिक विस्तार पुढें कारिकाव्याख्यानांत स्पष्ट दिसेलच. आतां हे सहा श्लोक कोणाचे? हा प्रश्न कायम राहतोच. वृत्तिकार हलायुधाचेच हे श्लोक असावे असें आम्हांला कांहीं पुस्तकावरून प्रथम वाटलें; परंतु कलकत्तामुद्रित प्रतीमध्यें, हलायुधवृत्त्यारंभीं हे श्लोक नाहींत व कांहीं कांहीं प्रतींत अव्यवस्थित क्रमानें आढळतात त्याअर्थीं हे श्लोक हलायुधकृतहिं नाहींत असें ठरतें. शिवाय वृत्तिकार समग्र शास्त्राचें व्याख्यानच करीत असल्यामुळें त्याला पुढील विषयाचा आधींच ऊहापोह करून पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. आणखी हलायुध बराच अर्वाचीन असून, मयरस० हें खण्ड वैदिक पठनांत त्याच्याही पूर्वी, पुष्कळ शतकें चालू असावें असें इतर ग्रन्थांतले उल्लेख सुचवतात. इतर ग्रन्थांत, छन्दसूत्रांचा प्रारंभ, मयरसतज० असाच उल्लेखिला जात असून 'धीश्रीस्त्रीम्' ह्या खऱ्या प्रारंभाचा उल्लेख आढळत नाहीं, ह्याकरितां हें उपोद्घातरूप खंड एखाद्या जुन्या भाष्यकाराचें असावें व वैदिकांनीं सुबोधत्वामुळें त्याचा स्वीकार केला असावा असें वाटतें. कात्यायनाचीं अनेक वार्तिकेंही पाणिनिसूत्रपाठांत, ह्याचप्रमाणें, वैदिकांनीं प्रक्षिप्त केलेलीं आढळतात; त्यांतलाच हा प्रकार आहे. शेवटचें अनुक्रमणीखण्ड तर सूत्रें मोजून कोणीही

लिहूं शकेल. पहिल्या मयरस० ह्या खण्डाचीं सूत्रें अर्थात् कलकत्तामुद्रित प्रतींत मूलस्थानीं नाहींत व त्यांची व्याख्याही नाहीं. ह्याच प्रमाणें हलायुधाच्या प्रतींत व प्रचलित वैदिकांच्या दाक्षिणात्य प्रतींत सुमारें २५ ठिकाणीं पाठभेद आहेत. जसें अ० ३।११ ह्यांतील पादनिवृत् ह्या पदाच्याऐवजीं लेखी प्रतींत पादनिचृत् असें वैदिकसंमत पद आहे. ३–६७ 'श्यामान्यतिच्छन्दांसि' ३–६८ 'रोचनाभाः कृतयः' अ० ३–६९ 'अनुक्तानां कामतो वर्णा' हीं वृत्तिपाठांपेक्षां अधिक सूत्रें आहेत. ह्याच प्रमाणें अ० ६–१५ सूत्रापुढें 'एकरूपं नौ ज्गौग्' हें सूत्र व ८–१६ 'एकोनेऽध्वा' हें महत्त्वाचें सूत्र, वृत्तिपाठांपेक्षां; वैदिकपाठांत जास्त आहे. मी पाहिलेल्या लेखी पुस्तकांत 'एकोनेद्धा' अशीं अक्षरें आढळतात. परंतु त्यांतून कांहींच सुसंबद्ध अर्थ निघत नसल्यामुळें त्याच्या जागीं ध्वा असें शुद्धीकरण केल्यानें, अध्वयोग ह्या नांवाचा ६वा प्रस्तार निष्पन्न होत आहे; अर्थात् शास्त्रपूर्णता हेंच ह्या सूत्राचें महत्त्व आहे. हलायुधवृत्तीच्या पाठांत, ६–८ 'हंसरुतं म्नौ गौ' हें सूत्र, विलासिनी, चञ्चलाक्षिका, कामोत्पीडा, गौरी (७–४) हीं वृत्तें व ८–१ (अत्रानुक्तं गाथा) ह्या सूत्रापुढचीं अठरा सूत्रें, पिंगलसूत्रकाराचीं नसून वृत्तिकारानेंच रचिलेलीं आहेत. इतर पाठभेद फारसे महत्त्वाचे नाहींत. आम्हीं भाषान्तर करतांना शक्य तों वैदिकपाठ कायम ठेऊन अर्थ सुबोध करण्याचा प्रयत्न केला आहे. वृत्तिकारानें अधिक दिलेल्या सूत्रांचेंही विवरण दिलें असून सहाव्या अध्यायांतलें यतिप्रकरण व आठव्या अध्यायांतलें प्रत्ययप्रकरण दुर्बोध असल्यामुळें, सविस्तर दिलें आहे. वैदिक काय घोकतात ह्याचा स्पष्टार्थ लोकांना व त्यांना स्वतःला समजावा हाच मुख्य हेतु असल्यानें तसेंच, प्रकाशनास अशक्य असा अधिक ग्रन्थ न वाढावा म्हणून सर्व वृत्तांचीं उदाहरणें मात्र प्रकृत ग्रन्थांत दिलीं नाहींत. तथापि प्रस्ताराच्या अनुसारानें गणाक्षरें मांडून पूर्वज्ञात किंवा अभिनव इष्टवृत्त रचितां किंवा ओळखतां येईल. जसें हल्लीं प्रचलित झालेलें आनंदगीत व गज्जल ह्यांचीं सूत्रें व वृत्तवर्णिका (प्रस्तार) खालीं दिल्याप्रमाणें होतील. 'आनन्दं तरगाः' ऽऽ।ऽ।ऽऽ, 'गर्ज्जलं यरगगाः' ।ऽऽऽ।ऽऽऽ. ह्याचप्रमाणें सर्व अभिनववृत्तांचा, सूत्रभाषेनें संग्रह करतां येतो. सामान्यतः वैदिकवृत्तांना छन्द, मात्रावृत्तांना जाति व अक्षरगणवृत्तांना वृत्त असें म्हणतात. वृत्तांचेच सम, अर्धसम व विषम असें पोटप्रकार असून गाथा हा त्यांचा मिश्रप्रकार आहे. ह्या छन्दःसूत्राचा त्या त्या वेदशाखेस अनुलक्षून असलेला भाग, प्रातिशाख्यनामक वेदग्रन्थांत दिलेला असतो. जसें, ऋक्प्रातिशाख्याच्या १६–१७

व १८ ह्या पटलांमध्यें, त्या वेदाचा छन्दःसंबन्धीं बराच विषय आला आहे. तो विषय, ह्या सूत्राचा विरोधी नसून पूरकच समजावा. 'व्याख्यानतो विशेषप्रतिप्रत्तिर्नहि संदेहादलक्षणम्' म्हणजे सूत्रांतील संदिग्ध अर्थाचें विशेषज्ञान, वृत्ति, भाष्य वगैरे व्याख्यानांनीं करून घ्यावें; संशय आला एवढ्याचवरून लक्षणसूत्र निरुपयोगी समजूं नये. ही वैयाकरणांची परिभाषा ह्याही सूत्राला लागू आहे. कारण पिंगलाचार्यांनीच कोठें कोठें संदिग्ध रचना करून, ही परिभाषा सूचित केली आहे. जसें, अ० ४।१४ ह्या सूत्रांत स्वर शब्दाचा अर्थ सात व अ० ४–३२ ह्या सूत्रांत स्वर शब्दाचा अर्थ तीन असा घ्यावा, हा निर्णय व्याख्यानावरूनच कळून येतो. ह्या विवरणावरून जुन्या वेदादि ग्रन्थांच्या ज्ञानांत गुरुपरंपरेचें किती महत्त्व आहे व केवळ तर्कानें पुष्कळ जागीं फसगत होण्याचा कसा संभव आहे हें स्पष्ट ध्यानांत येईल. मयरस ह्या प्राचीन प्रस्तावश्लोकावरून हलायुधवृत्तीपूर्वीहि पिङ्गलसूत्राचीं व्याख्यानें झालीं असावीं असें व्यक्त होतें, परंतु त्याविषयीं अधिक इतिहास तूर्त तरी आढळत नाहीं. तसेंच वेदाङ्गज्यौतिषसूत्रही पिङ्गलकृतच असावें ह्या आमच्या नवीन तर्कालाही भरपूर पुरावा आढळत नाहीं; तथापि प्रबल मतान्तर पुढें नसल्यामुळें हा तर्क विद्वद्विचाराकरतां प्रसिद्ध केला आहे. वेदाङ्गज्यौतिषार्थ हा दुसरा भाग लौकरच प्रसिद्ध होईल. असो; **ह्या पुस्तकाच्या मुद्रणाचें काम, व्यवस्थित केल्याबद्दल कर्णाटक प्रेसचे मालक व व्यवस्थापक ह्यांचा मी आभारी आहें.** तसेंच माझ्या विनंतीचा स्वीकार करून ह्या पुस्तकास प्रास्ताविक दोन शब्द लिहून दिल्याबद्दल आमचे समव्यवसायी **प्रो. गजेंद्रगडकर** ह्यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

शेवटीं ह्या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ भरपूर द्रव्यसाहाय्य दिल्याबद्दल **मुंबई विश्वविद्यालयाचा मी अत्यंत ऋणी आहें** हें पुन्हां एकदां अत्यंत कृतज्ञतेनें व आदरानें नमूद करतों, पाठकांच्या सोईकरतां प्रारंभीं वृत्तसूची जोडली आहे. ह्यापुढेंही माझ्या दुसऱ्या कांहीं पुस्तकांना विश्वविद्यालयाकडून असेंच साहाय्य मिळेल अशी आशा करून मागील दोन वेदांगांप्रमाणेंच ह्या पिङ्गलसूत्राचें मराठी भाषान्तरही, वेदधर्मरक्षक, जगदन्तर्यामी परमेशाच्या चरणकमलीं अर्पण करतों.

चैत्र शुद्ध ७ गुरुवार
शके १८५६

शिवराम विद्याधर शिंत्रे,
शास्त्री, एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई.

अथछन्दःसूत्रविषयानुक्रमणी

——:o:——

श्रीवेदाङ्गार्थचन्द्रिका

(भाग तिसरा)

अथ सार्थश्रीपिङ्गलाचार्यकृत छन्दःसूत्र.

अध्याय पहिला

“ **ब्राह्मणेन निष्कारणकः षडङ्गो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च** ” म्हणजे ब्राह्मणानें निष्कामबुद्धीनें शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द व ज्यौतिष ह्या साही अंगांसह वेदाचें अध्ययन करावें व त्याचा अर्थ जाणावा अशी वेदाची आज्ञा आहे. अर्थात् वेदाच्या पठनादिकांप्रमाणेंच वेदाङ्गांच्याही पठनादिकांमध्यें पुण्यफल असून शिवाय वेदाच्या अर्थाचें ज्ञान व यज्ञादि कर्मांची सांगसिद्धि यांनाही वेदाङ्गांचें ज्ञान अवश्य आहे; त्यांवाचून त्यांची सिद्धता होणार नाहीं. “ यो ह वा अविदितार्षेयच्छन्दोदैवतविनियोगेन ब्राह्मणेन मन्त्रेण याजयति वाध्यापयति वा स स्थाणुं वर्च्छति गर्तं वा पद्यते वा प्रमीयते पापीयान्भवति यातयामान्यस्य च्छन्दांसि भवन्ति ” असें सामवेदाच्या छन्दोगब्राह्मणांत म्हटलें आहे. ह्याचा अर्थ जो यजमान, ज्याला मन्त्रांचे ऋषि, छन्द, दैवत व विनियोग (उपयोग) ह्यांचें ज्ञान नाहीं, अशा ब्राह्मणाकडून समन्त्रक यजन करवितो तो, अथवा अध्यापन करवितो तो, अज्ञानी अशा वृक्षयोनींत जन्माला जातो: किंवा खाड्यांत पडतो अथवा नाश पावतो किंवा अत्यन्त पापी होतो व त्यानें अध्ययन केलेली छन्दस्

(वेदमन्त्र) नीरस अर्थात् फलहीन होतात; म्हणून यज्ञादिकर्मांमध्यें योजिल्या जाणाऱ्या मन्त्रांनां साफल्य येण्याकरितां वैदिक छन्दांच्या ज्ञानाची अत्यन्त आवश्यकता आहे. त्याचप्रमाणें काव्यें हीं, कीर्ति, द्रव्यलाभ, व्यवहारज्ञान, पापनिवारण व परमाल्हाद इत्यादि फलांनीं पुरुषार्थांचींच साधनें असल्यामुळें त्यांच्या ज्ञानाकरितां लौकिकछन्दांचें (वृत्तांचें) ज्ञानही आवश्यक आहे म्हणून, सर्व लोकांवर उपकार करण्याकरितां, त्यांना वैदिक व लौकिक छन्दांचें ज्ञान थोडक्यांत व्हावें ह्या उद्देशानें, परमकारुणिक अशा श्रीपिङ्गलनागाचार्यानें हें छन्दःशास्त्र रचिलें आहे. हल्लींच्या प्रचलित वेदषडङ्गांमध्यें ह्या पिङ्गलच्छन्दाचीच गणना आहे. ह्यावर भट्टहलायुधाची संस्कृत वृत्ति (टीका) फार उत्तम असून सुप्रसिद्ध आहे. त्या वृत्तीला अनुसरूनच मी ह्यापुढें, महाराष्ट्रभाषेमध्यें त्या पिङ्गल-छन्दसूत्रांचा सविस्तर अर्थ देणार आहें.

भाषाप्रचारांत छन्दःशब्दाचा मुख्यार्थ 'वेद' असा आहे, परंतु ह्या शास्त्रांत छन्दस् म्हणजे वृत्तें, पद्यांच्या चाली असा अर्थ समजावा. पूर्वीं देवांनीं असुरांना समजूं नये म्हणून आपल्या यज्ञादि विधींचे, त्यांत (छन्दांत) रचून छादन (आच्छादन) केलें म्हणून त्यांना छंदस् असें नांव आलें अशी छन्दस् शब्दाची वैदिक व्युत्पत्ति आहे. हल्लींसुद्धां गद्यापेक्षां पद्यामध्यें अर्थ गूढ रहातो असा अनुभव आहे. असो. पाणिनीच्या व्याकरणानें त्याच्या पूर्वींचीं ऐन्द्रादिक व्याकरणें मागें पडलीं, त्याप्रमाणें ह्या पिङ्गलच्छन्दानें त्याच्या पूर्वींचे इतर छन्दोग्रन्थ मागें पडले आहेत. प्रचलित वैदिकांच्या पाठांत, प्रारंभीं 'मयरस०' वगैरेपासून 'त्रिविरामं०' ही कारिका संपेपर्यंत एकंदर सहा, हलायुधाच्या वृत्ती-मधील कारिका अधिक म्हटल्या जात आहेत व घातल्या आहेत; परंतु खरा शास्त्रारंभ 'धी श्री स्त्रीम्' ह्या सूत्रापासूनच आहे. हें ह्या कारिका

वाचतांच ध्यानांत येतें. ह्या कारिकांनीं पुढें येणाऱ्या कांहीं सूत्रांचा अर्थच सांगितला असल्यानें पुढच्या विवरणांत पुनरुक्ति भासेल; तथापि प्रचलित वैदिक पाठास अनुसरून व पुढें येणाऱ्या गणसूत्रांच्या अर्थ-ज्ञानासही सोपेपणा येईल म्हणून त्या कारिकांचे अर्थही अन्वयांसह प्रथमतः देतों.

मयरसतजभनलगसंमितं भ्रमति वाङ्मयं जगति यस्य ॥
सजयति पिङ्गलनागः शिवप्रसादाद्विशुद्धमतिः ॥ १ ॥

अन्वयः—मयरसतजभनलगसंमितं यस्य वाङ्मयं जगति भ्रमति, सः शिवप्रसादाद्विशुद्धमतिः पिङ्गलनागः जयति ॥

मयरसतजभनलग ह्या दहा गणांनीं मोजिलेलें ज्याचें छन्दःशास्त्ररूपी वाङ्मय, ह्या जगांत सर्वत्र संचार करीत आहे; तो श्रीशंकराच्या प्रसादानें अत्यन्त शुद्धबुद्धि झालेला पिङ्गलनाग (छन्दःसूत्रकार) सर्वत्र विजय पावत आहे; म्हणजे व्यवहारांत त्याच्याच छन्दःशास्त्राचा सर्वत्र उत्कर्ष आहे ॥ १ ॥

आतां दुसऱ्या व तिसऱ्या आर्येनें छन्दोवृत्तिकार भट्टहलायुध गणांचें वर्णन करतात. ह्या शास्त्रांत पुढें जीं वृत्तें (छन्दस्) सांगावयाचीं आहेत त्यांचे अवयव समजण्याकरितां, जे ठराविक अक्षरांचे समुदाय मानिले आहेत त्यांना ह्या ग्रंथांत गण असें नांव आहे.

त्रिगुरुं विद्धि मकारं लघ्वादिसमन्वितं यकाराख्यम् ॥
लघुमध्यमं तु रेफं सकारमन्ते गुरुनिबद्धम् ॥ २ ॥

अन्वयः—(त्वम्) मकारं त्रिगुरुं विद्धि, यकाराख्यं लघ्वादिसमन्वितं (विद्धि), रेफं तु लघुमध्यमं (विद्धि) सकारं (च) अन्ते गुरुनिबद्धं (विद्धि) ॥

हे पाठका, तीन गुरुस्वरांनीं युक्त तो मगण, आरंभीं एक लघु (ऱ्हस्व) व पुढें दोन गुरु तो यगण, मागें व पुढें एकेक गुरु असून मध्यें एक लघु असतो तो रगण, व प्रथम दोन लघु असून शेवटीं एका गुरूनें युक्त तो सगण असें तूं समज ॥ २ ॥

लघ्वन्त्यं हि तकारं जकारमुभयोर्लघुं विजानीयात् ॥
आदिगुरुं च भकारं नकारमिह पैङ्गले त्रिलघुम् ॥ ३ ॥

अन्वयः—इह पैङ्गले तकारं लघ्वन्त्यं हि विजानीयात्, जकारम् उभयोः लघुं (विजानीयात्) भकारं आदिगुरुं, नकारं (च) त्रिलघुं (विजानीयात्) ।

ह्या पिङ्गलाच्या शास्त्रांत, प्रथम दोन गुरु असून शेवटीं एक लघु असलेला तो तगण, मध्यें गुरुस्वर असून त्याच्या दोन्ही बाजूस एकेक लघुस्वर असतो तो जगण, आधीं एक गुरु असून पुढें दोन्ही लघु असल्यास तो भगण आणि तीनहि लघुस्वर असलेला तो नगण असें जाणावें ॥ ३ ॥

आतां चौथ्या कारिकेनें पुढें सूत्रांमधून येणाऱ्या लघु व गुरु ह्या संज्ञांचा निर्णय सांगतातः—

दीर्घं संयोगपरं प्लुतस्वरं व्यञ्जनान्तमूष्मान्तम् ॥
सानुस्वारं च गुरुं क्वचिदवसानेऽपि लघ्वन्त्यम् ॥ ४ ॥

अन्वयः—दीर्घं, संयोगपरं, प्लुतस्वरं, व्यञ्जनान्तम्, ऊष्मान्तम्, सानुस्वारं च गुरुं (विजानीयात्) क्वचित् अवसाने अन्त्यं लघु अपि (गुरु भवति) ॥

दीर्घ, जोडाक्षर (संयुक्त व्यंजन) पुढें असलेला ऱ्हस्व, प्लुतस्वर (त्रिमात्र) आणि व्यञ्जन, विसर्ग किंवा अनुस्वार पुढें असलेला ऱ्हस्व

स्वर; ह्यांनां गुरू समजावें. तसेंच क्वचित् स्थलीं पुढें कोणताहि वर्ण नसलेल्या पदाच्या शेवटचा लघुही गुरु होतो ॥ ४ ॥

वृत्तिकार भट्टहलायुध पुन्हां ५व्या कारिकेनें त्या गणांचेच संक्षेपानें वर्णन करितात.

आदिमध्यावसानेषु यरता यान्ति लाघवम् ॥
भजसा गौरवं यान्ति मनौ तु गुरुलाघवम् ॥ ५ ॥

अन्वयः—यरताः (क्रमात्) आदिमध्यावसानेषु लाघवं यान्ति भजसा गौरवं यान्ति, मनौ तु (क्रमात्) गुरुलाघवं (यातः).

प्रत्येक गण तीन अक्षरांचा असतो हें लक्षांत ठेवावें. तसेंच स्वरशास्त्राप्रमाणें ह्या छन्दःशास्त्रांत देखील शब्दांतले स्वरच गणांच्या व्यवहारांत मुख्य आहेत; म्हणून ह्या कारिकेंतील आठ गण तीन अक्षरांनीं म्हणजे तीन स्वरांनीं युक्त असतात असें जाणावें.

कारिकार्थः—यरत हे तीन गण क्रमानें; आरंभीं, मध्यें व शेवटीं लघुस्वरानें युक्त असतात म्हणजे य आद्यलघु, र मध्यलघु आणि त अन्त्यलघु असतो. तसेंच भजस हे गण आरंभीं, मध्यें व शेवटीं गुरुवर्णानें युक्त असतात. म्हणजे भ आद्यगुरु, ज मध्यगुरु व स अन्त्यगुरु असतो. 'म' व 'न' हे दोन गण क्रमानें सर्वगुरु (त्रिगुरु) व सर्वलघु (त्रिलघु) असतात. ॥ ५ ॥

आतां सहाव्या कारिकेनें ह्यापुढें येणाऱ्या छन्दःसूत्रांचें स्वरूप व प्रयोजन थोडक्यांत सांगतात.

त्रिविरामं दशवर्णं षण्मात्रमुवाच पिङ्गलः सूत्रम् ॥
छन्दोवर्गपदार्थप्रत्ययहेतोश्च शास्त्रादौ ॥ ६ ॥

अन्वयः—पिङ्गलः शास्त्रादौ छन्दोवर्गपदार्थप्रत्ययहेतोः त्रिविरामं दशवर्णं षण्मात्रं च सूत्रम् उवाच ॥

श्रीमान् पिङ्गलाचार्य, तीन यति (विश्राम) मयरसतजभनलग हे दहा वर्ण व सहा मात्रा ह्यांनीं युक्त असलेलें हें छन्दःसूत्र, शास्त्रादिक ग्रंथांमध्यें, छन्दांच्या समुदायांचें व त्यांच्या अवयव वगैरेंचें ज्ञान होण्याकरितां सांगता झाला ॥ ६ ॥

आतां ह्यापुढें, प्रत्यक्ष पिङ्गलनागाच्या छन्दसूत्रांचें विवरण द्यावयाचें आहे. त्याकरितां प्रथम थोडीशी सूत्रभाषेची माहिती देणें अवश्य आहे. पूर्वींच्या परिस्थितीस अनुसरून प्राचीन कालचे महर्षि आपलीं शास्त्रें, पठन व लेखन वगैरेंच्या सौकर्याकरितां, संक्षिप्त परंतु संदेहरहित अशा नियमांनीं लिहीत असत; ते नियमच सूत्रें होत. हीं सूत्रें विस्तारानें लहान असल्यामुळें पाठ करण्यास व लक्षांत रहाण्यास सोपीं असून त्यांनीं शास्त्रांचे मुख्य सिद्धांत डोळ्यांसमोर उभे राहातात. ह्यांची भाषा फार साधी असते. सूत्रामध्यें लाघव (आटपशीरपणा) येण्याकरितां सूत्रकार बहुधा दिलेल्या पदांची वारंवार आवृत्ति करीत नाहींत तर सूत्रार्थांच्या पूर्णतेकरितां जरूरी असलेलीं पदें मागच्या किंवा पुढच्या जवळच्या सूत्रांतून अध्याहृत आणतात; अथवा एकशेषसमासाच्या प्रमाणें त्याच सूत्राची पुनरावृत्ति—अर्थात् गृहीत धरितात, व हे प्रकार गुरुपरंपरेनें जाणले जातात. ह्यांपैकीं मागच्या सूत्रांतील पदें पुढें आणण्यास अनुवृत्ति, पुढच्या सूत्रांतलें पद घेण्यास अपकर्ष, व पुनःपठनास आवृत्ति अशा शास्त्रीय परंपरेच्या संज्ञा आहेत. ह्यापुढें येणाऱ्या पिङ्गल सूत्रांच्या किंवा बहुधा कोणत्याही सूत्रांच्या ज्ञानास ही माहिती अवश्य लक्षांत ठेवली पाहिजे. असो. पूर्वीं सांगितलेल्या कारणास्तव हें छन्दःशास्त्र लिहिण्यास प्रवृत्त

झालेले श्रीपिङ्गलाचार्य, सोप्या युक्तीनें शास्त्रज्ञान होण्याकरितां, ह्या शास्त्रांतील संज्ञा व परिभाषा प्रथम सांगतात.

धीश्रीस्त्रीम् ॥ १ ॥

हें पहिल्या अध्यायांतलें पहिलें सूत्र आहे. यांत उपलक्षणार्थ म्हणजे उदाहरणार्थ घेतलेले तीन गुरुस्वर संज्ञि असून म् ही त्या गणाची संज्ञा आहे; म्हणजे धी श्री स्त्री अशीं तीन गुरु अक्षरें (स्वर) क्रमानें आलीं असतां तो मगण होय. स्वरशास्त्राप्रमाणेंच छन्दःशास्त्रांत फक्त स्वरांचेंच महत्त्व आहे, व्यञ्जनें फक्त ऱ्हस्वाला गुरुत्व देण्यापुरतीच उपयोगीं आहेत असें मानलें जातें. हें मागें पांचव्या कारिकेच्या विवरणांत एकदां प्रसंगानें लिहिलेंच आहे. असो. ह्या मगणाप्रमाणेंच गुरुलघूंचें उपलक्षण व ' य ' वगैरे संज्ञा पुढच्या गणबोधक सूत्रांत आहेत असें जाणावें. ह्या गणांचे उपयोग ' विद्युन्माला ' वगैरे पुढें येणाऱ्या अक्षरगणवृत्तांत होतात. ह्या गणसूत्रांमध्यें धी स्त्री वगैरेच अक्षरें देण्याचें कारण काय, हें पुढें सर्व गणसूत्रें संपल्यावर सांगूं.

वरासाय् ॥ २ ॥

हें दुसरें सूत्र. ह्यानें आद्यलघु म्हणजे पहिलें ऱ्हस्व व पुढचीं दोन अक्षरें गुरु असलेल्या अक्षरत्रिकाचें नांव यगण असें सांगितलें आहे.

कागुहार् ॥ ३ ॥

ह्या सूत्रानें लघुगुरूंचें उपलक्षण सुचवून मध्यगुरु तो रगण असें समजून येतें.

वसुधास् ॥ ४ ॥

ह्या सूत्रावरून अन्त्यगुरु असलेलें त्रिक तो सगण असें समजून येतें.

सा ते कत् ॥ ५ ॥

ह्या त्रिकाप्रमाणें अन्त्यलघु, असा तीन वर्णांचा समुदाय तो तगण जाणावा.

कदासज् ॥ ६ ॥

ह्याप्रमाणें मध्यगुरू तो जगण जाणावा.

किंवदभ् ॥ ७ ॥

ह्याप्रमाणें आद्यगुरु तो भगण जाणावा, असें सूचित होतें.

नहसन् ॥ ८ ॥

ह्या सूत्राप्रमाणें केवळ तीन लघु तो न म्हणजे नगण असें उपलक्षण केलें जातें. ह्या सूत्रांतून घेतलेलीं अक्षरें लघुगुरूंच्या उपलक्षणार्थ आहेत.

गृल् ॥ ९ ॥

ह्या व पुढच्या सूत्रानें एकाक्षरगणाचीच संज्ञा सांगितली आहे. ‘ गृ ’ हें ऱ्हस्व अशा एका अक्षराचें उपलक्षक आहे, म्हणून केवळ एकट्या ऱ्हस्व अक्षराची संज्ञा ल आहे. (ल म्हणजे लघु होय.) असा ह्या सूत्राचा अर्थ आहे.

गन्ते ॥ १० ॥

ह्या सूत्रांत मागच्या सूत्रांतून ‘ गृ ’ हें अक्षर अनुवृत्तीनें येतें व ह्या सूत्रांतील ग् चा अर्थ गुरु असा आहे म्हणून गृसारखें एकमात्रिक ऱ्हस्व अक्षर, पद्यचरणाच्या अंतीं (अन्ते=शेवटीं) असतां तें ग् म्हणजे गुरुसंज्ञक होतें; असा सूत्रार्थ होतो. परंतु ‘ ग्लिति समानी ’ वगैरे पुढें येणाऱ्या सूत्राप्रमाणें, क्वचित् स्थलीं मात्र लकाराच्या विशेषविधीमुळें ह्या पादान्तीच्या गुरुत्वाचा बाध होतो. म्हणून तशा स्थलीं मात्र पादान्तलघूला गुरुसंज्ञा होत

नाहीं. इतरत्र होते. कारण सर्वसाधारण नियमाचा (उत्सर्गसूत्र) विशेष-सूत्रानें म्हणजे अपवादकानें बाध होतो असा शास्त्रीय नियम आहे. आतां ह्यावर कोणी म्हणेल कीं, पाणिनीच्या व्याकरणशास्त्रांत अशी (गन्ते) पादान्तीच्या लघूला गुरुसंज्ञा केली नाहीं, म्हणून हें सूत्र योग्य नाहीं, तर ह्याचें उत्तर असें कीं पाणिनीच्या शास्त्रांत अशा संज्ञेचा कांहीं उपयोग नाहीं म्हणून त्यानें संज्ञा केली नसली तरीही छन्दःशास्त्रांत ह्या संज्ञेची अपेक्षा आहे; म्हणून छन्दःसूत्रकाराला ही संज्ञा करणें भाग पडलें. शिवाय पिङ्गलनागही स्वतंत्र सूत्रकार आहे. तो सर्वांशीं परावलंबी असणें शक्य नाहीं. असो. आणखी गुरुसंज्ञेच्या विधानाकरितां पुढचें सूत्र रचिलें आहे.

ध्रादिपरः ॥ ११ ॥

ह्या सूत्रांतही ऱ्हस्वाक्षराचें उपलक्षण असणाऱ्या गृची व ग्ची अनुवृत्ति वरच्या दोन सूत्रांतून येथें केली आहे व यांतील ध्र हें अक्षर जोडाक्षरांचें म्हणजे संयुक्त व्यञ्जनाचें उपलक्षक आहे, आणि आदिशब्दानें, विसर्ग, अनुस्वार, जिव्हामूलीय व उपध्मानीय ह्यांचें ग्रहण आहे. क ख ह्यांच्या पूर्वीच्या अर्धविसर्गाचें नांव जिव्हामूलीय आणि प क ह्यांच्या पूर्वीच्या अर्धविसर्गाचें नांव उपध्मानीय आहे. हें आमच्या वेदाङ्गशिक्षार्थामध्यें, (शिक्षार्थ श्लो. ५ पहा) उदाहरणें देऊन विशेष स्पष्ट केलें आहे. असो. एकंदरींत जोडाक्षर, विसर्ग, अनुस्वार, किंवा अर्धविसर्ग पुढें असलेलें ह्रस्व अक्षरही, ह्या छंदःशास्त्रांत गुरुसंज्ञक होतें, असा ह्या सूत्राचा अर्थ होतो.

हे ॥ १२ ॥

ह्या सूत्रांतही वरच्या सूत्रांप्रमाणेंच ग्ची अनुवृत्ति असून ‘ हे ’ हें अक्षर द्विमात्राचें (दीर्घ) उपलक्षक आहे; म्हणून दीर्घ अक्षर (हे सारखे) गुरुसंज्ञक (ग्) होय असा सूत्रार्थ होतो.

लौ सः ॥ १३ ॥

ह्या मधल्या सः (तो) ह्या पदानें प्रकरणप्राप्त ग्‌चें ग्रहण आहे म्हणून तो गुरु दोन लघूंच्या बरोबर (लौ) असतो, असा सूत्रार्थ आहे. तात्पर्य, लघूंच्या उच्चारापेक्षां गुरूच्चाराला दुप्पट वेळ लागतो. लघु एकमात्रिक व गुरु द्विमात्र हेंच ह्या सूत्रानें सांगितलें.

ग्लौ ॥ १४ ॥

हें अधिकारसूत्र असून हें छन्दःशास्त्र संपेपर्यंत ह्यापुढें ह्या सूत्राचा अधिकार आहे. 'स्वदेशे वाक्यार्थाभाववत्त्वे सति उत्तरसूत्रैकवाक्यतया लक्ष्य-संस्कारजनकत्वमधिकारत्वम्' हें अधिकाराचें लक्षण आहे. ह्याचा अर्थः- शास्त्राच्या ज्या स्थानीं सूत्राचें पठन केलें असेल तेथें त्याचा वाक्यार्थ न होतां पुढच्या सूत्रांशीं एकवाक्यता होऊन जें उदाहरणें साधण्यास उपयोगीं पडतें तें अधिकारसूत्र होय. म्हणून यापुढें ' गायत्र्या वसवः ' वगैरे सूत्रांतून जेथें विशेष गण सांगितले नसतील तेथें, हें अधिकारसूत्र जातें व आठ ग् ल् मिळून एक गायत्रीचा पाद होतो; असे अर्थ करण्यास उपयोगीं पडतें.

अष्टौ वसवः इति ॥ १५ ॥

ह्या शास्त्रांत वसु हें पद जेथें येईल तेथें त्याचा अर्थ आठ वर्ण असा घ्यावा. कारण वेदपुराणादिक ग्रन्थांतून वसूंची संख्या आठच मानिली आहे. शेवटच्या इतिपदानें (इति=अशाप्रकारें) हें सूत्र वसूप्रमाणें रुद्र, अंग वगैरे इतर लौकिक संज्ञांचेंही उपलक्षक आहे, असें समजतें. म्हणजे रुद्र ११, अंक ९, वेद ४ वगैरे ज्यांची संख्या निश्चित आहे अशा अर्थाचे वाचक जे शब्द त्यांचाही ह्या शास्त्रांत वसुपदाप्रमाणें उपयोग केला आहे; म्हणून रुद्र म्हणजे ११, समुद्र म्हणजे चार, ऋतु म्हणजे सहा, वगैरे

प्रसिद्धसंख्यांकपदांचे अर्थ जाणावे. तन्त्र (एकांतूनच अनेक अर्थ काढणें), आवृत्ति किंवा एकशेषद्वंद्व ह्यांचा स्वीकार केल्यामुळें ह्या सूत्राच्या शेवटीं इतिपद आहे; त्यानेंच या शास्त्राचा पहिला अध्याय येथें संपला असेंही सूचित होतें. कारण इति शब्दाचा अर्थ प्रकार आहे तसाच समाप्ति हाही आहे. आतां ज्याप्रमाणें नाटकादिकांच्या प्रारंभीं नांदीश्लोकामध्यें पुढें येणाऱ्या संपूर्णकथेचा अर्थ संक्षेपानें सूचित केला असतो, त्याप्रमाणें ' धी श्री स्त्रीम् ' वगैरे मागें व्याख्यान केलेल्या सूत्रांत धी श्री वगैरे अक्षरें घालण्यांत अर्थान्तरही सूचित केलें आहे तें, पूर्वीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें आतां येथें लिहितों. अध्ययनापासून धी म्हणजे शास्त्रीय बुद्धि प्राप्त होते. ज्याजवळ धी त्याला श्री म्हणजे संपत्ती मिळते; व ज्याच्याजवळ श्री त्याला स्त्री मिळते व सुखदायक होते. कारण गृहस्थाश्रमाची सुस्थिति द्रव्यमूलकच आहे. असा पहिल्या संज्ञासूत्रानें सूचित होणारा अर्थ आहे म्हणून, अर्थकामांचे (श्री व स्त्री) साधन असणारी ती धी वरा म्हणजे सर्वांहून श्रेष्ठ आहे असें वरासा ह्या सूत्रानें सूत्रकार आपल्या शिष्याला सूचित करतो. हें ऐकून शिष्य विचारतो, " हे गुरो ! 'का गुहा' तसल्या त्या धीचें गुप्तस्थान कोठें आहे." येथें गुहा हा शब्द स्थानवाचक घेतला आहे. असो. नंतर गुरु ह्याचें उत्तर देतात " ' वसुधा ' म्हणजे ही पृथ्वीच त्या धीचें स्थान आहे अर्थात् त्या पृथ्वीवरच ती धी साध्य आहे, काळजी करूं नको." पुन्हां शिष्य विचारतो, " 'सा ते क्व' म्हणजे ती आपण सांगितलेली बुद्धि वसुधेवर तरी कोठें मिळेल ?" गुरु ह्याचें उत्तर, " दोन सूत्रें (गृ हे) मिळवून देतात. 'गृहे' म्हणजे घरांतच येथें, विद्यार्थ्याला विद्येचा लाभ होईल." पुन्हां शिष्य विचारतो, " ' कदा स' म्हणजे तो धीलाभेच्छु पुरुष तिला केव्हां मिळवूं शकतो ?" त्यावर गुरूंचें उत्तर, " 'ध्रादिपर:' म्हणजे

तो शिष्य जेव्हां विद्येचें धारण (धृ=धारण) अर्थग्रहण, आवृत्ति वगैरे कृत्यांत तत्पर होईल तेव्हांच धीला मिळवील." पुन्हा शिष्याचा प्रश्न, " 'किं वद' महाराज, मनुष्य काय करीत असतांना बुद्धि मिळवील तें सांगा." ह्यावर गुरु म्हणतात, " 'न हसन्' म्हणजे हसणें खिदळणें वगैरे चापल्य न करणारा व गुरुविद्यांवर निष्ठा ठेवणारा शिष्यच त्या बुद्धीला मिळवितो. अथवा 'न हस' म्हणजे विद्याग्रहणकालीं तूं हंसूं खिदळूं नको. 'गृल्' (गृणन् लघुः) 'गन्ते' म्हणजे पठन करीत असतां (गृणन्) जो लघु म्हणजे नम्र असतो तोच शिष्य अध्ययनाच्या अन्तीं गुरु होतो म्हणजे विद्वत्तेचें गौरव मिळवून इतरांचा गुरु होण्यास समर्थ होतो, असाही दुसरा अर्थ संभवतो. असो. असा ह्या पहिल्या बारा सूत्रांचा विद्वत्परंपरागत गर्भितार्थ आहे. तो उपदेशकारक असून चांगला जमतही आहे म्हणून येथें आम्ही दिला आहे. येथें गणांच्या संज्ञा व स्वरूपें सांगितलेला, पिङ्गलछन्दःसूत्राचा हा पहिला अध्याय समाप्त झाला. ह्यामध्यें एकंदर पंधरा सूत्रें आहेत.

अध्याय दुसरा.

‘ छन्दः ’ ॥ १ ॥

हें अधिकारसूत्र असून सर्व शास्त्र संपेपर्यंत ह्याचा अधिकार आहे; म्हणून पुढच्या सूत्रांतून ‘ छन्दः ’ ही संज्ञा अनुवृत्त होते. येथें छन्दः-पदानें ठराविक अक्षरसंख्येनें युक्त असलेल्या छन्दांचें ग्रहण विवक्षित आहे. संस्कृत भाषेंत छन्दःशब्द नपुंसकलिंगी आहे. तथापि तो श्लोकाचा प्रतिशब्द म्हणून आम्ही बोधसौलभ्याकरितां पुढच्या भाषान्तरांत पुल्लिंगी बनवून, जागोजाग प्रयोग केला आहे, हें ध्यानांत ठेवावें.

गायत्री ॥ २ ॥

हें देखील अधिकारसूत्र असून ह्याची अनुवृत्ति ‘ जह्यादासुरी ’ हें (सू. १३) सूत्र संपेपर्यंत जाते.

दैव्येकम् ॥ ३ ॥

एकाक्षरस्वरूपी जें छन्द, त्याचें नांव दैवी गायत्री होय. जसें ‘ ॐ ’ हें दैवी गायत्रीचें उदाहरण आहे. आम्ही ह्यापुढें विस्तारभयास्तव, सर्वच सूत्रांचीं उदाहरणें देणार नसून विशेषस्थलीं मात्र नमुन्याकरितां देणार आहों. छंदांच्या लक्षणांचे अर्थ सविस्तर देऊं. त्यांचीं लक्ष्यें म्हणजे उदाहरणें, सर्वानुक्रमणी व काव्येंपुराणें ह्यामध्यें सांपडतील. ह्या सूत्राचा व पुढील कांहीं सूत्रांचा अर्थ स्पष्ट कळण्याकरितां, येथें प्रथम कोष्टक देऊन छंदांच्या वर्णांची संख्याही त्यांत लिहितों.

छन्दोनाम	गायत्री	उष्णिक्	अनुष्टुप	बृहती	पङ्क्ति	त्रिष्टुप्	जगती
आर्षी	२४	२८	३२	३६	४०	४४	४८
दैवी	१	२	३	४	५	६	७
आसुरी	१५	१४	१३	१२	११	१०	९
प्राजापत्या	८	१२	१६	२०	२४	२८	३२
याजुषी	६	७	८	९	१०	११	१२
साम्नी	१२	१४	१६	१८	२०	२२	२४
आर्ची	१८	२१	२४	२७	३०	३३	३६
ब्राह्मी	३६	४२	४८	५४	६०	६६	७२

स्पष्टीकरणः—बुद्धिबळांच्या पटाप्रमाणें चौसष्ट घरांचें एक कोष्टक वर दिल्याप्रमाणें मांडून त्याच्या पहिल्या ओळीच्या डाव्या बाजूच्या पहिल्या घरांत आर्षी असें नांव लिहावें व त्याखालच्या सात घरांत क्रमानें दैवी, आसुरी वगैरे इतर गायत्रींचीं नांवें वर दिल्याप्रमाणें लिहावीं. आर्षी ह्या शब्दाच्या वर छन्दोनाम असें लिहून त्याच्यापुढें क्रमानें, गायत्री, उष्णिक् वगैरे साती आर्ष (वैदिक) छन्दांचीं नांवें लिहावीं. ह्यानंतर 'दैव्येकम्' वगैरे सूत्रांनीं सांगितलेले आंकडे, त्या त्या नांवापुढच्या घरांतून भरावे, म्हणजे वर दिल्याप्रमाणें कोष्टक तयार होईल. दैवी ह्या नांवापुढील कोष्टकांत एक हा आंकडा प्रथम लिहावा. कारण तेंच (दैव्येकम्) ह्या गणनेचें पहिलें सूत्र आहे. ह्यापुढें "आसुरी पञ्चदश" वगैरे सूत्रांतील

आंकडे त्या त्या नांवापुढील घरांतून मांडावे. असो, आतां पुढील सूत्रांचा अर्थ, अनुक्रमानें लिहितों.

आसुरी पञ्चदश ॥ ४ ॥

एकंदर लघुगुरु मिळून पंधरा अक्षरांनीं आसुरी गायत्री नांवाचें छन्द तयार होतें. 'ग्लौ' (१।१४) असा पूर्वींच दिलेला सामान्य अधिकार आहे म्हणून येथें लघुगुरु मिळून असा अर्थ करतां आला; असेंच पुढील सूत्रांतूनही अनुवृत्तीनें येणाऱ्या शब्दामुळें, इष्टार्थ केले आहेत असें जाणावें.

प्राजापत्याष्टौ ॥ ५ ॥

आठ अक्षरें म्हणजे प्राजापत्या नामक गायत्री होते.

यजुषां षट् ॥ ६ ॥

याजुष गायत्री (यजुर्वेदसंबंधीं) सहा अक्षरांनीं होते.

साम्नां द्विः ॥ ७ ॥

ह्या सूत्रांत वरून षट् हें पद अनुवृत्तीनें येतें, म्हणून द्विगुणित सहा म्हणजे बारा अक्षरें मिळून सामवेदाची गायत्री होते, हा सूत्रार्थ होतो.

ऋचां त्रिः ॥ ८ ॥

ह्या सूत्रांमध्येंही षट् हें पद अनुवृत्त आहे, ह्यामुळें तीनदां सहा अक्षरें अर्थात् अठरा अक्षरें आर्ची गायत्रीसंज्ञक छन्दांत असतात असा सूत्रार्थ होतो.

द्वौ द्वौ साम्नां वर्धेत ॥ ९ ॥

कोष्टकांतील इतर घरें भरतांनां पूर्वोक्तसाम्नीगायत्रीची अक्षरसंख्या उत्तरोत्तर दोन दोन अक्षरें वाढते, म्हणून बारा हा अंक लिहिला; त्याच्या

पुढील घरांतून क्रमानें १४, १६, १८, २०, २२, व २४ असे आंकडे लिहिले. सप्तच्छन्दांचें मागें दिलेलें कोष्टक पहा.

त्रींस्त्रीनृचाम् ॥ १० ॥

आर्ची गायत्रीचा अंक, पुढच्या कोष्टकांतून पूर्वपूर्वापेक्षां तीनतीन अक्षरांनीं वाढवावा. म्हणजे १८ पासून ३६ पर्यंत २१, २४, २७, ३०, ३३, ३६, असे अंक वाढतात.

चतुरश्चतुरः प्राजापत्यायाः ॥ ११ ॥

प्राजापत्या नामक गायत्रीच्या कोष्टकांतील ओळींत उत्तरोत्तर चार चार अंक वाढवावे म्हणजे ८ पासून ३२ पर्यंत वाढ होते.

एकैकं शेषे ॥ १२ ॥

शेष म्हणजे शिल्लक राहिलेल्या दैवी व याजुषी गायत्री ह्यांच्या कोष्टकांत उत्तरोत्तर एकेक अंकाची वृद्धि करावी. ह्यामुळें दैवीच्या कोष्टकांत एकपासून सातपर्यंत व याजुषीच्या कोष्टकांत सहापासून बारापर्यंत, क्रमानें वाढ झाली. स्पष्टज्ञानाकरितां कोष्टक पहा. ह्या सूत्रांत शेषे ह्या पदानें आसुरीचें ग्रहण होत नाहीं. कारण तिच्याविषयीं पुढील सूत्रांत विशेष विधान आहे; व अपवादविषय सोडूनच उत्सर्गसूत्र (सामान्य नियम) प्रवृत्त होत असतें.

जह्यादासुरी ॥ १३ ॥

ह्या सूत्रांत वरून एकैकम् ह्या पदाची अनुवृत्ति आणून आसुरी गायत्री, ओळीच्या पुढच्या कोष्टकांमधून उत्तरोत्तर एकेक अक्षर टाकते. म्हणजे १५ पासून ९ पर्यंत एकेक अंक कमी होत जातो, असा अर्थ होतो. आतां सूत्रकार डाव्या हाताकडील उभ्या दुसऱ्या ओळींत

गायत्रीचे अक्षराङ्क भरले आहेत त्यांच्या पुढच्या सहा कोष्टकांत भरलेल्या अक्षराङ्कांच्या संज्ञा पुढच्या १४ व्या सूत्रानें सांगतात.

तान्युष्णिगनुष्टुब् बृहती पङ्क्तित्रिष्टुब्जगत्यः ॥ १४ ॥

सूत्रार्थः—गायत्र्यङ्काच्या पुढीलसंख्येइतक्या अक्षरांनीं अनुक्रमानें उष्णिक्, अनुष्टुप्, बृहती, पङ्क्ति, त्रिष्टुप् व जगती ह्या नांवांचे छन्द तयार होतात. हे छन्द, अर्थात् दैवी, आसुरी वगैरे पहिल्या उभ्या ओळींत नांवें दिलेल्या जातींचेच असतात.

तिस्रस्तिस्रः सनाम्न्य एकैका ब्राह्म्यः ॥ १५ ॥

कोष्टकांतील सर्वांत खालचीं घरें भरण्याकरितां हें सूत्र आहे. गायत्री उष्णिक् वगैरे सातही वैदिक छन्द इतर लौकिक जातीप्रमाणेंच (वृत्त) स्त्रीलिंगी असल्यामुळें सूत्रांतून स्त्रीलिंगी प्रयोग आहेत. आतां सूत्रार्थ लिहितों. खालच्या **तीन** पङ्क्तींत लिहिलेल्या याजुषी, साम्नी व आर्ची जाति ह्यांच्या भेदांपैकीं तिन्ही एकजातीय छन्द (सनाम्न्यः=समाननामक छन्द) मिळून म्हणजे त्यांचीं अक्षरें मिळवून तेवढ्या अक्षरांचा तो तो ब्राह्मी संज्ञकछन्द होतो. जसें याजुषी, साम्नी व आर्ची गायत्रीचीं सहा, बारा व अठरा अक्षरें मिळून होणाऱ्या छत्तीस अक्षरांनीं ब्राह्मी गायत्री बनते. असेंच पूर्वोक्त तीन जातींच्या बेरजेनें येणाऱ्या संख्येनें, ब्राह्मीच्या उष्णिगादि इतर छन्दांविषयींही समजावें. ते ब्राह्मीचे भेद कोष्टकांत अगदीं खालच्या ओळींत दिले आहेत. पुढच्या सूत्रांत ' प्राग्यजुषाम् ' अशीं पदें असल्यामुळें येथें याजुषी वगैरे खालच्या तिहींचीच बेरीज घेतली.

प्राग्यजुषामार्ष इति ॥ १६ ॥

वरच्या सूत्रांपैकीं ' तिस्रस्तिस्रः सनाम्न्यः एकैकाः ' एवढा भाग येथें अनुवृत्तीनें आणून सूत्रार्थ लिहितों. याजुषीगायत्री वगैरेच्या आठव्या कोष्टका-

वरील प्राजापत्या, आसुरी व दैवी भेदांपैकीं, समाननामाच्या तीन तीन गायत्र्यादि जाति मिळून (अर्थात् अक्षरसंख्या) एकेक आर्षीचा जातिभेद होतो. जसें प्राजापत्या, आसुरी, व दैवी उष्णिक्‌चे १२, १४, व २ हे अंक मिळवून आलेल्या अठ्ठावीस अक्षरांची आर्षी उष्णिक् होते. आर्षी गायत्री २४ अक्षरांची होते. असेच अनुष्टुप्, बृहती, पङ्क्ति, त्रिष्टुप्, व जगती ह्या उरलेल्या छन्दांविषयीं समजावें. हे आर्षी नांवाचे छन्दोभेद कोष्टकाच्या अगदीं वरच्या आडव्या ओळींत गायत्र्यादि अनुक्रमानें दिले आहेत. ह्या सूत्रांच्या अर्थांनीं बनविलेलें मागें दिलेलें कोष्टक दैवीगायत्री वगैरे छन्दांचें थोडक्यांत ज्ञान होण्यास फार उपयोगी आहे. ह्या सूत्राच्या शेवटीं असलेल्या इतिपदानें येथें ह्या अध्यायाची समाप्ति सूचित केली. येथें आमच्या छन्दःसूत्रव्याख्यानाचा दुसरा अध्याय संपला. ह्यामध्यें एकंदर सूत्रें सोळा आहेत.

अध्याय तिसरा

—:०:—

पादः ॥ १ ॥

आतां प्रथम, वैदिकछन्द सविस्तर सांगण्याकरितां दोन परिभाषा (व्यापक नियम) देतात. हा अध्याय संपेपर्यंत ' पादः ' हें अधिकारसूत्र प्रवृत्त होतें. पाद म्हणजे चरण होय.

इयादिः पूरणः ॥ २ ॥

छंदाचा पाद हा इय्, उव् वगैरे विश्लेषण केलेल्या अक्षरांनीं पूरण केला जाणारा असतो; म्हणजे एखाद्या छंदाच्या पादांत सांगितल्यापेक्षां कमी अक्षरें भरल्यास ण्य वगैरे जोडाक्षरें, यांमध्यें विश्लेष करून त्यांचे जागीं णिय वगैरे अक्षरें समजून अक्षरसंख्या पूर्ण करून घ्यावी. तेवढ्या करितां छन्दोभंग मानूं नये. जसें, ' तत्सवितुर्वरेणियम् ' येथें ण्यचे जागीं णिय मानून गायत्रीछन्दाचा अष्टाक्षरी पाद पूर्ण करून घेतला. नाहींतर मूळ संहितापाठांत ' तत्सवितुर्वरेण्यम् ' अशीं सातच अक्षरें (स्वर) आहेत, तीं वरच्या सूत्राच्या रीतीनें पुरीं केलीं असें समजावें. दुसरें उदाहरण ' दिवं गच्छ सुवः पते ' येथें मूळचीं पदें ' दिवं गच्छ स्वः पते ' अशीं आहेत. वैदिकछन्द पुरुषकृत नसून अनादिसिद्ध असल्यामुळें त्यांच्या पूरणापुरतीच ही कल्पना आहे; कारण त्यांत फेरफार करणें योग्य नाहीं. ह्यालाच उद्देशून, ' छन्दसि दृष्टानुविधिः ' वेदांत जशी स्थिति दिसत असेल तिला अनुसरून वेदसंबंधीं शास्त्रीय नियम ठरवावे. असा शास्त्रकारांनीं नियम ठरवून दिला आहे. वेदाच्या शब्दांत किंवा वृत्तांत लौकिक व्याकरण किंवा छन्दःशास्त्र ह्यांच्या नियमापेक्षां वेगळा

प्रकार दिसल्यास त्यांना शास्त्रकार आर्षप्रयोग समजून त्या आर्षत्वाचेही वेगळे नियम बाधतात. त्यांपैकीं हा नियम जाणावा. वेदांशिवाय इतर लौकिकछन्दोरचना ही मनुष्यांच्या स्वाधीन असल्यामुळें तेथें सर्वत्र, कवि पूर्णवर्णच घालतात म्हणून इत्यादिकांनीं पूरण करण्याची आवश्यकताच पडत नाहीं. आर्ष म्हणजे ऋषिसंबंधी अर्थात् वैदिक होय.

गायत्र्या वसवः ॥ ३ ॥

गायत्रीछन्दाचा पाद वसुसंख्याक म्हणजे आठ अक्षरांनीं होतो. 'अष्टौ वसवः' ह्या पहिल्या अध्यायांतल्या सूत्रानें ह्या छन्दःशास्त्रांत लौकिकसंज्ञांनीं सूचित केलेल्या कृत्रिम संख्यांचेंही ग्रहण करावें असें सांगितलें आहे, म्हणून ह्यापुढें, वसु वगैरे लोकप्रसिद्ध संज्ञांनीं आठ वगैरे संख्यांचें ज्ञापन होतें. ह्या तिसऱ्या सूत्रानें, छन्दःसूत्रांत जेथें जेथें गायत्रीचा पाद गृहीत असेल तेथें तेथें तो आठ अक्षरांचा धरावा हेंही सांगितलें आहे.

जगत्या आदित्याः ॥ ४ ॥

जगती छन्दाचा पाद म्हणजे बारा अक्षरें होत. कारण आदित्य (सूर्य) बारा असें पुराणांत प्रसिद्ध आहे.

विराजो दिशः ॥ ५ ॥

विराट् छन्दाचा पाद दहा अक्षरांचा असतो. दिशा दहा हें लोकप्रसिद्धच आहे.

त्रिष्टुभो रुद्राः ॥ ६ ॥

त्रिष्टुप्छन्दाचा पाद म्हणजे अकरा अक्षरें होतात. कारण वेदादिग्रंथांत रुद्र अकरा मानिले आहेत.

एक द्वि त्रि चतुष्पादुक्तपादम् ॥ ७ ॥

वर सांगितल्याप्रमाणें ठराविक अक्षरांच्या पादांनीं गायत्र्यादिक छन्द, क्वचित् एकपाद, कोठें द्विपाद, कोठें त्रिपाद व कोठें कोठें चतुष्पाद (चार चरणांचे) होतात. गायत्री मात्र बहुधा त्रिपादच असते व आठ आठ अक्षरांच्या चार पादांनीं फक्त अनुष्टुपच होते. कारण दुसऱ्या अध्यायांतल्या कोष्टक वगैरे प्रमाणें आर्षी (ऋषिसंबंधी) गायत्री २४ अक्षरांची असल्यामुळें तिच्यांत अष्टाक्षरी तीनच पाद संभवतात. तसेंच आर्षी अनुष्टुप ३२ अक्षरांची असल्यामुळें तीमध्यें अष्टाक्षरी चार पाद होतात. ऋषि म्हणजे वेद होय.

आद्यं चतुष्पादृतुभिः ॥ ८ ॥

ऋतु म्हणजे सहा इतक्या अक्षरांनीं युक्त असलेल्या चार पादांनीं चतुष्पाद् गायत्रीछन्द संभवतें. ह्या सूत्रांत आद्यशब्दानें गायत्रीछन्द घेतलें, कारण ह्या अध्यायांत प्रथम गायत्रीछन्दाचेंच ग्रहण केलें आहे. चतुष्पाद् गायत्रीचें उदाहरण. 'इन्द्रः शचीपतिर्बलेन वीलितः। दुश्च्यवनो वृषा लमत्सुसासहिः' लौकिक गायत्री, नेहमींच षडक्षरी चार पादांची असते हें पुढें येईल.

क्वचिद् त्रिपादृषिभिः ॥ ९ ॥

वेदांत क्वचित् स्थलीं सात अक्षरांच्या (ऋषि=७) तीन पादांची त्रिपाद गायत्री दिसते, म्हणजे तिचीं एकंदर २१ अक्षरें होतात.

सा पादनिचृत् ॥ १० ॥

अशा एकवीस अक्षरांच्या त्रिपाद गायत्रीला पादनिचृत् अशी विशेष संज्ञा आहे. मन्त्रप्रयोग करणाराला नामज्ञानानें विशेष पुण्य लागावें म्हणून येथें ही विशेष संज्ञा सांगितली आहे; नाहींतर वेद, अनादिसिद्ध, अकृत्रिम,

सहज स्फूर्तिरूप असल्यामुळें छन्दांत कमीजास्त अक्षरें असतीं तरी कांहीं हरकत नव्हती. शिवाय वेदाङ्गांचें पठनहि साङ्ग वेदाध्ययनविधीनें विहित असल्यामुळें, त्यांच्या उच्चारणांतही पुण्य आहे म्हणून दृष्टफल नसलें तरीही पठनांत अदृष्ट पुण्यविशेष लाभतेंच म्हणून अशा विशेषसंज्ञा ह्या शास्त्रांत क्वचित् स्थलीं दिसून येतील, ह्यानें छन्दांचीं पुरातन नांवेंही कळतात. महाभाष्यकार पतञ्जलि महर्षींनीं ‘ इको यणचि ’ ह्या सूत्रांवर, पाणिनीच्या सूत्राविषयीं लिहितांना म्हटलें आहे कीं, ‘ सामर्थ्ययोगान्नहि किंचिदत्र पश्यामि शास्त्रं यदनर्थकं स्यात् ’ म्हणजे ह्या अष्टाध्यायी सूत्रांपैकीं सर्वच अक्षरें समर्थ म्हणजे फलवान् असल्यामुळें, ज्यांत कांहींच अर्थ (फल) नाहीं असें, त्यामध्यें मला किंचितही दिसत नाहीं; म्हणजे, बहुतेक सूत्रांना शास्त्रज्ञानरूपी लौकिकफलासहित अदृष्टपुण्यफल आहे, व कांहीं सूत्रांना दृष्टफल नसलें तरी केवळ पुण्यरूप अदृष्टफल आहेच. लौकिकदृष्ट्या प्रत्याख्यान (खण्डन) केलें असलें तरी सर्वथा निष्फळ असें कोणतेंच सूत्र नाहीं. तोच न्याय छन्दःसूत्र वगैरे इतर वेदांङ्गसूत्रांविषयींही समजावा. कारण सर्वच वेदाङ्गसूत्रकार आचार्य परमपूज्य महर्षि आहेत, व त्यांतही छन्दःशास्त्र तर वेदपुरुषाचे पायच आहेत असें पाणिनीय शिक्षेंत स्पष्टच म्हटलें आहे. ‘ छन्दः पादौ तु वेदस्य ’ वगैरे शिक्षासूत्रावरील आमचें विवरण पहा. असो, एकंदरींत अदृष्टपुण्यरूपी फलाकरितां तरी शास्त्रांत त्या सर्व सूत्रांचें पठनपाठन अवश्य आहे, मग त्यांत लौकिक दृष्टफल असो वा नसो.

षट्कसप्तकयोर्मध्येऽष्टावतिपादनिवृत् ॥ ११ ॥

येथें, मागून त्रिपाद हें पद अनुवृत्तीनें आणून सूत्रार्थ देतों. पहिला सहा अक्षरांचा पाद, तिसरा सात अक्षरांचा पाद व त्या दोहोंच्यामध्यें अष्टाक्षरी पाद अशी त्रिपाद अतिपादनिवृत् नांवाची गायत्री होते.

द्वौ नवकौषट्कश्च सा नागी ॥ १२ ॥

प्रथम दोन नऊ अक्षरांचे पाद व तिसरा सहा अक्षरी पाद असतां नागी नांवाची त्रिपादगायत्री होते. नागीच्या शेपटापेक्षां तिचें मस्तक मोठें असतें. नागी म्हणजे हत्तीण.

विपरीता वाराही ॥ १३ ॥

हीच गायत्री वरच्या उलट असली म्हणजे, पहिला पाद षडक्षरी व पुढचे दोन्ही नऊ नऊ अक्षरांचे असे असल्यास वाराही नांवाची गायत्री होते. वराहाचे पुढचे पाय लहान असतात व मागचे त्याहून दीर्घ असतात.

षट्कसप्तकाष्टकैर्वर्धमाना ॥ १४ ॥

पहिला पाद सहा अक्षरांचा, दुसरा सात अक्षरांचा व तिसरा आठ अक्षरांचा असे वाढते पाद असल्यास ती वर्धमाना नांवाची त्रिपाद गायत्री असते. उदाहरण, ' ईशाना वार्याणां, क्षयन्तीश्चर्षणीनाम् । अपो या चामि भेषजम् ' ॥

विपरीता प्रतिष्ठा ॥ १५ ॥

हीच वरच्या उलट म्हणजे क्रमानें, अष्टाक्षर, सप्ताक्षर व षडक्षर असे पाद असल्यास ती प्रतिष्ठासंज्ञक गायत्री होते. उदाहरण, ' आपः पृणीत भेषजम्, वरूथं तन्वे ३ मम । ज्योक्च सूर्यं दृशे ' ॥

तृतीयं द्विपाज्जागतगायत्राभ्याम् ॥ १६ ॥

ह्या सूत्रांत तृतीयपदानें, ह्या अध्यायांतील अधिकारक्रमानें प्राप्त असलेल्या विराट् छन्दाचें ग्रहण होतें.

सूत्रार्थ—पहिला जगतीछन्दाचा अर्थात् बारा अक्षरांचा पाद व दुसरा गायत्र (गायत्रीचा) म्हणजे आठ अक्षरांचा अशा दोन पादांनीं द्विपाद् विराट् ह्या नांवाची गायत्री होते; कारण विराट् छन्दाच्या दोन पादांचीं अक्षरेंही वीसच भरतात.

त्रिपाद् त्रैष्टुभैः ॥ १७ ॥

त्रिष्टुप्छन्दाच्या म्हणजे अकरा अक्षरांच्या तीन पादांनीं त्रिपाद् विराट ह्या नांवाची गायत्री होते. येथें वरच्या सूत्रांतून विराडर्थक 'तृतीयम्' ह्या पदाची अनुवृत्ति आहे. ह्या व पुढच्या सूत्रांतीलही विशेष संज्ञा, पाठपुण्याकरितां व व्यवहार वगैरे करितां दिल्या आहेत असें जाणावें. येथें गायत्री ह्या पदाचा अधिकार संपला; कारण ह्या पुढील सूत्रांत उष्णिक असें वेगळ्या छन्दाचें ग्रहण आहे. त्यानें पहिला तत्समानजातीय संज्ञेचा अधिकार निवृत्त केला जातो.

उष्णिग् गायत्रौ जागतश्च ॥ १८ ॥

पहिले दोन गायत्रीचे अर्थात् अष्टाक्षरी पाद व तिसरा जगती छन्दाचा (द्वादशाक्षर) पाद अशा तीन पादांनीं उष्णिक्संज्ञक त्रिपादछन्द होतें. येथें फक्त पादांची अक्षरसंख्या सांगितली आहे. त्यांच्या क्रमविशेषानें प्राप्त होणारीं निरनिराळीं नांवें पुढें दिलीं आहेत.

ककुभ् मध्ये चेदन्त्यः ॥ १९ ॥

वरच्या सूत्रांत सांगितलेल्यांपैकीं शेवटचा बारा अक्षरांचा पाद मध्यें असून त्याच्यामागें व पुढें एकेक अष्टाक्षरी पाद असल्यास ती उष्णिक्, ककुभ् नांवाची असते. मूळसूत्रांत स्पष्टस्वरूप कळण्याकरितां ककुभ् शब्दाचा संधि आम्ही केला नाहीं. संधि केला असतां 'ककुम्मध्ये' असें होतें.

पुर उष्णिक् पुरतः ॥ २० ॥

प्रारंभींच (पुरतः) तो बारा अक्षरांचा पाद असून पुढचे दोन्ही पाद अष्टाक्षरी असल्यास तिचें नांव पुरउष्णिक् असें होतें.

परोष्णिक् परः ॥ २१ ॥

पहिले दोन पाद अष्टाक्षरी व तिसरा बारा अक्षरांचा असल्यास परोष्णिक् नांवाचें त्रिपाद्छन्द होतें.

'उष्णिग्गायत्रौ जागतश्च' ह्या १८ व्या सूत्रांत उष्णिक् हें जें सामान्य नांव सांगितलें आहे त्याचेंच विशिष्ट पादक्रमाची अपेक्षा धरून वेगळी संज्ञा सांगण्याकरितां पुढील सूत्रांत ग्रहण केलें आहे. कारण १८ व्या सूत्रांतलें उष्णिक्पद अधिकारार्थ (पुढें चालणारें) आहे.

चतुष्पादृषिभिः ॥ २२ ॥

ऋषि म्हणजे सात कारण सप्तर्षि लोकप्रसिद्ध आहेत. सप्ताक्षरी चार पादांनीं चतुष्पाद् उष्णिक् होते. आर्षी उष्णिक् अठ्ठावीस अक्षरांची असते, हें दुसऱ्या अध्यायांत कोष्टक वगैरेंनीं सिद्ध झालेंच आहे. येथें उष्णिक्चा अधिकार संपला; कारण पुढच्या सूत्रांत तिसऱ्या अनुष्टुप् छन्दाचा अधिकार सुरू होत आहे.

अनुष्टुब्गायत्रैः ॥ २३ ॥

येथें वरून चतुष्पाद् हें पद अनुवृत्तीनें येतें. सूत्रार्थः—अष्टाक्षरी (गायत्र) चार पादांनीं, चतुष्पाद् अनुष्टुप्छन्द होतें.

त्रिपात्कचिज्जागताभ्यां च ॥ २४ ॥

ह्या सूत्रांतील चकारानें येथें गायत्र ह्या पदाची अनुवृत्ति होते. सूत्रार्थ–एक गायत्र म्हणजे अष्टाक्षरी पाद व त्यापुढचे दोन द्वादशाक्षरी (जागत) पाद अशा प्रकारची त्रिपाद अनुष्टुप् क्वचित् संभवते. ऋचा

किंवा गाथा ह्या सामान्य नामांशीं संबद्ध असल्यामुळें, गायत्र्यादि वैदिक छन्दांचीं नांवें स्त्रीलिंगी आहेत व त्यांच्याच अनुकरणानें बहुतेक लौकिक छन्दांचीं नांवेंही स्त्रीलिंगी व काव्यात्मक आहेत हें ध्यानांत असावें.

मध्येऽन्ते च ॥ २५ ॥

द्वादशाक्षरी दोन पादांच्या मध्यें किंवा पुढें एक अष्टाक्षरी पाद (गायत्र) असला तरीही त्रिपाद् अनुष्टुप् होते. येथें अनुष्टुप्‌चा अधिकार संपला. पुढच्या सूत्रापासून बृहतीचा अधिकार चालू होतो.

बृहती जागतस्त्रयश्च गायत्राः ॥ २६ ॥

एक द्वादशाक्षरी (जागत) पाद व त्यापुढचे तीन अष्टाक्षरी पाद अशा चार पादांनीं बृहती नामक छन्द होतें.

पथ्या पूर्वश्चेत्तृतीयः ॥ २७ ॥

वर सांगितलें त्यांपैकीं पहिला म्हणजे बारा अक्षरांचा (जगतीचा) पाद तिसरा असून इतर तीन अष्टाक्षरी असले तर ती पथ्यानामक बृहती होते.

न्यङ्कुसारिणी द्वितीयः ॥ २८ ॥

दुसरा द्वादशाक्षरी पाद असून बाकीचे तीन अष्टाक्षरी (गायत्र) असल्यास ती न्यङ्कुसारिणी नांवाची बृहती होते.

स्कन्धोद्ग्रीवी क्रौष्टुकेः ॥ २९ ॥

क्रौष्टुकी नामक ऋषीच्या मतानें, वरच्या न्यङ्कुसारिणीचेंच नांव स्कंधोद्ग्रीवी असें आहे.

उरोबृहती यास्कस्य ॥ ३० ॥

यास्क नामक आचार्यांच्या मतानें तिचेंच नांव उरोबृहती असें आहे. ह्या शास्त्रांत इतर आचार्यांच्या नांवांचा असा उल्लेख जेथें असेल तेथें

तो त्यांचा सन्मान करण्याकरितां व छन्दाचें ऐतिहासिक नामान्तर कळण्याकरितां आहे असें समजावें. सारांश अशा स्थळीं मतभेदानें एकाच छन्दाचीं अनेक नामें असतात. स्वरूपांत फरक नसतो असें जाणावें.

उपरिष्टाद्बृहत्यन्ते ॥ ३१ ॥

पहिले तीन अष्टाक्षर पाद असून शेवटचा द्वादशाक्षर (अर्थात् जगतीचा) असल्यास तें उपरिष्टाद्बृहती नांवाचें छन्द होतें.

पुरस्ताद्बृहती पुरः ॥ ३२ ॥

प्रारंभीं जागत पाद असून त्यापुढचे तीन अष्टाक्षरी असल्यास तें पुरस्ताद् बृहती नांवाचें छन्द असतें.

क्वचिन्नवकाश्चत्वारः ॥ ३३ ॥

क्वचित् स्थलीं नवाक्षरी चार पादांचीही बृहती होते. आर्षी बृहती छत्तीस अक्षरांची असते हें मागें दुसऱ्या अध्यायांतील कोष्टकांत सिद्धच केलें आहे. ऋषि म्हणजे वेद तत्संबंधीं ती आर्षी अशी ह्या शब्दाची व्युत्पत्ति आहे.

वैराजौ गायत्रौ च ॥ ३४ ॥

पहिले दोन पाद दशाक्षरी (वैराज=विराट् छन्दाचे) व त्यापुढचे दोन अष्टाक्षरी (गायत्र) असल्यास तीही बृहतीच होते.

त्रिभिर्जागतैर्महाबृहती ॥ ३५ ॥

द्वादशाक्षरी तीनच पादांनीं महाबृहती नामक छन्द होतें.

सतोबृहती ताण्डिनः ॥ ३६ ॥

ताण्डि नामक आचार्याच्या मतानें महाबृहतीचेंच नांव सतोबृहती असें आहे. येथें बृहतीचा अधिकार संपला. यापुढें पङ्क्तिच्छन्दाचा अधिकार सुरू होतो.

पङ्क्तिर्जागतौ गायत्रौ च ॥ ३७ ॥

कोणतेतरी दोन बारा अक्षरांचे (जागत) व दोन अष्टाक्षरी (गायत्र) असे सर्व मिळून चार पाद (एकूण, चाळीस अक्षरें) असल्यास पङ्क्ति-नामक छन्द होतें.

पूर्वौ चेदयुजौ सतः पङ्क्तिः ॥ ३८ ॥

वर सांगितले त्यांपैकीं पहिले म्हणजे द्वादशाक्षर पाद, पहिले व तिसरे (अयुज=विषम) असून इतर म्हणजे दुसरा व चवथा अष्टाक्षरी असल्यास तिचें नांव सतःपङ्क्ति होय.

विपरीतौ च ॥ ३९ ॥

तसेंच वरच्या उलट म्हणजे विषम पाद (१।३) गायत्र व समपाद (२।४) जागत असल्यास तीही सतःपङ्क्तिच होते.

आस्तारपङ्क्तिः परतः ॥ ४० ॥

ह्यामध्यें व पुढच्या तीन सूत्रांतही जागत ह्या पदाची अनुवृत्ति आहे. आतां सूत्रार्थ देतों. पहिले दोन पाद अष्टाक्षरी असून पर म्हणजे शेवटचे दोन (३।४) जगतीच्छन्दाचे अर्थात् द्वादशाक्षर असल्यास तिचें नांव आस्तारपङ्क्ति असतें.

प्रस्तारपङ्क्तिः पुरतः ॥ ४१ ॥

पहिले दोन पाद जगतीचे (द्वादशाक्षर) असून त्यांच्या पुढचे दोन गायत्रीचे असल्यास ती प्रस्तारपङ्क्ति होते.

विष्टारपङ्क्तिरन्तः ॥ ४२ ॥

जेव्हां द्वादशाक्षरी दोन पाद अन्तर्भागीं म्हणजे मध्यें असून त्याच्या सभोंवतीं अर्थात् पहिला व चौथा पाद अष्टाक्षरी असतो तेव्हां ती विष्टारपङ्क्ति होते.

संस्तारपङ्क्तिर्बहिः ॥ ४३ ॥

मध्यें दोन अष्टाक्षर पाद असून दोन्ही बाजूस एकेक द्वादशाक्षर (जागत) पाद असतो तेथें संस्तारपङ्क्तिच्छन्द असतें.

अक्षरपङ्क्तिः पञ्चकाश्चत्वारः ॥ ४४ ॥

पांच पांच अक्षरांच्या चार पादांनीं अक्षरपङ्क्ति नांवाचें छन्द होतें. ह्यावर कोणी अशी शंका करील कीं, पङ्क्तिच्छन्द तर चाळीस अक्षरांचें असतें, व येथें तर वीसच अक्षरांचा सांगितला हें कसें ? ह्याचें उत्तर असें कीं, येथें सिंहावलोकन न्यायानें पुढच्या सूत्रांतील ' अल्पशः ' हें पद अपकर्षानें आणून त्यानें अल्पस्थलीं अशी वीस अक्षरांची अल्पपङ्क्ति होते, असा अर्थ केला जातो.

द्वावप्यल्पशः ॥ ४५ ॥

येथें पञ्चकपदाची अनुवृत्ति करून सूत्रार्थ देतों. वेदांत अल्पस्थलीं पञ्चाक्षरी दोन पादांचें म्हणजे दहा अक्षरांचें देखील पंक्तिच्छन्द दिसतें.

पदपङ्क्तिः पञ्च ॥ ४६ ॥

येथेंही पञ्चकपद अनुवृत्त आहे. पञ्चाक्षरी पांच पादांनीं पदपङ्क्ति नांवाचें छन्द होतें.

चतुष्कषट्कौ त्रयश्च ॥ ४७ ॥

ह्या सूत्रांतल्या चकारानें पञ्चकपदाचें ग्रहण होतें. पञ्चक म्हणजे पञ्चावयवी अर्थात् पञ्चाक्षरी पाद होय.

सूत्रार्थ.—जेव्हां पहिला पाद चार अक्षरांचा दुसरा सहा अक्षरांचा व त्यापुढचे तीन पांच अक्षरांचे असतात, तेव्हां तेथेंही पांच पादांची पङ्क्तिच होते.

पथ्या पञ्चभिर्गायत्रैः ॥ ४८ ॥

अष्टाक्षरी (गायत्र) पांच पादांनीं पथ्यापङ्क्ति नांवाचें छन्द होतें. येथें पङ्क्तीचा अधिकार संपून त्रिष्टुब्जगतीचा अधिकार सुरू होतो.

जगती षड्भिः ॥ ४९ ॥

येथें ' गायत्रैः ' हें पद अनुवृत्तीनें येतें. सहा अष्टाक्षरी पादांनीं अर्थात् अठ्ठेचाळीस अक्षरांनीं जगती नांवाचें छन्द होतें.

एकेन त्रिष्टुब् ज्योतिष्मती ॥ ५० ॥

येथें 'गायत्रैः' हें पद अनुवृत्त असून 'पञ्चभिः' हें पदही मण्डूकप्लुतानुवृत्तीनें येतें. बेडूक (मण्डूक) जसा मधली कांहीं जागा सोडून पुढें एकदम उडी मारतो त्याप्रमाणें, जें पद मधलीं कांहीं सूत्रें सोडून त्यापुढच्या सूत्रांत जातें त्याची मण्डूकप्लुतानुवृत्ति झाली असें शास्त्रपरिभाषेंत समजतात. येथें प्रकरणबलानें व पुढच्या संबंधामुळें 'एकेन' ह्या पदाचा अर्थ, एका त्रिष्टुप् पादानें सहित असा होतो; म्हणून एका त्रिष्टुप् पादासह (एकादशाक्षर) असलेल्या पांच गायत्र पादांनीं ज्योतिष्मती नामक पांच पादांची त्रिष्टुप् होते, असा सूत्रार्थ झाला. गुरुसहित पञ्चसंख्याक शिष्य आले, ह्या वाक्यांत जसे शिष्य चारच असून गुरु मिळवून पांच असा अर्थ होतो, त्याप्रमाणें येथेंही एक त्रैष्टुप् व चारच गायत्र पाद पडतात म्हणून, पञ्चपाद व एकेचाळीस अक्षरें यांनीं युक्त अशी ही ज्योतिष्मती त्रिष्टुप् होते. ' यजमानपञ्चमा इडां भक्षयन्ति ' ' वेदानध्यापयामास महाभारतपञ्चमान् ' वगैरे सुप्रसिद्ध वाक्यांतही अशाच प्रकारचें विजातीय वस्तूनें संख्यापूरण केलेलें प्रसिद्ध आहे, तसेंच त्या सूत्रांत समजावें; एक त्रैष्टुभ व पांच गायत्र असे सहा पाद समजूं नये. कारण तसें उदाहरण वेदांमध्यें कोठेंही

दृष्ट नाहीं, आणि पूर्वींच्या पण्डितांनीं तसें व्याख्यानही केलेलें नाहीं. असो, असाच अर्थ पुढच्याही चार सूत्रांत समजावा.

तथा जगती ॥ ५१ ॥

एक द्वादशाक्षर पाद व इतर चार अष्टाक्षर अशा पांच पादांनीं (एकूण चव्वेचाळीस अक्षरें), वरच्या त्रिष्टुप्प्रमाणेंच ज्योतिष्मतीसंज्ञक जगती होते.

पुरस्ताज्ज्योतिः प्रथमेन ॥ ५२ ॥

वर सामान्यरूपानें छन्दाचें नांव सांगितलें. आतां पादांच्या क्रमविशेषानें त्याच्याच विशेषसंज्ञा सांगतात. पहिला अकरा अक्षरांचा (त्रिष्टुप्चा) पाद असून पुढचे चार अष्टाक्षरी असल्यास ती पुरस्ताज्ज्योतिः ह्या नांवाची त्रिष्टुप् समजावी. ह्या सूत्रांत व पुढेंही 'तथा जगती' ह्या पदांची अनुवृत्ति करून दुसरे सूत्रार्थ होतात. त्यांपैकीं येथील पदांचा अर्थ पहिला पाद जागत व पुढचे चार गायत्र असतां ती पुरस्ताज्ज्योतिः ह्या नांवाची जगती होते.

मध्येज्योतिर्मध्यमेन ॥ ५३ ॥

मध्यें अर्थात् तिसरा पाद त्रिष्टुप्चा असून त्याच्या मागें दोन व पुढें दोन अष्टाक्षरी पाद असे पांच पाद असल्यास ती मध्येज्योतिर्नामक त्रिष्टुप् होते. अशाच रीतीनें तिसरा जागत पाद व त्याच्या मागें दोन व पुढें दोन गायत्र पाद असल्यास तीही, मध्येज्योतिःसंज्ञक जगती होते. हा तथा जगती ह्या अनुवृत्तपदांचा अर्थ केला.

उपरिष्टाज्ज्योतिरन्तेन ॥ ५४ ॥

पहिले चार अष्टाक्षर पाद असून पांचवा त्रैष्टुभ् असल्यास तें उपरिष्टाज्ज्योतिः त्या नांवाचें त्रिष्टुप् छन्द होतें. ह्यांपैकीं पांचवा त्रैष्टुभाऐवजीं

जगतीचा असल्यास ती उपरिष्टाज्ज्योतिःसंज्ञक जगती होते (तथा जगती).

एकस्मिन्पञ्चके छन्दः शङ्कुमती ॥ ५५ ॥

मागून छन्द:पदाची अनुवृत्ति असतां येथें पुन्हां छन्द:पद पठित आहे. त्याच्या सामर्थ्यामुळें अधिकारानें प्राप्त होणाऱ्या छन्दाचेंच ग्रहण येथें विवक्षित नसून वाटेल तें छन्द असा अर्थ येथें होतो. ज्या छन्दांत एक पांच अक्षरांचा पाद असून बाकीचे तीन पाद यथायोग्य शास्त्रोक्त असतात, तें छन्द शङ्कुमती संज्ञक असतें. जसें एक पञ्चाक्षरी पाद व इतर तीन षडक्षरी पाद (लौकिक गायत्री) असल्यास ती शङ्कुमती गायत्री असते. असेंच इतर छन्दांविषयींही समजावें.

षट्के ककुद्मती ॥ ५६ ॥

एक षडक्षर पाद असून इतर तीन यथाशास्त्र असल्यास तें छन्द ककुद्मती नामक असतें. जसें ककुद्मती गायत्री, वगैरे ह्या सूत्रांत वरून ‘ एकस्मिन् ’ हें पद आलें आहे.

त्रिपादणिष्ठमध्या पिपीलिकमध्या ॥ ५७ ॥

त्रिपादात्मक छन्दाचा पहिला व तिसरा पाद अधिक अक्षरांचा असून मधलाच त्यांच्यापेक्षां अणु म्हणजे कमी अक्षरांचा असल्यास ती गायत्री वगैरे पिपीलिकमध्या ह्या नांवाची समजावी; कारण तिचा मधला भाग पिपीलिकेसारखा (मुंगीसारखा), दोन्ही टोकांपेक्षां बारीक असतो.

विपरीता यवमध्या ॥ ५८ ॥

वरच्या उलट स्थिति असतां म्हणजे मधला पाद मोठा असून पहिला व तिसरा कमी अक्षरांचे असल्यास ती गायत्री वगैरे जाति, यवमध्यासंज्ञक

समजावी. कारण तिचा मध्यभाग यवा (सातू) सारखा दोन्ही टोकांपेक्षां मोठा असतो.

ऊनाधिकेनैकेन निचृद्भुरिजौ ॥ ५९ ॥

गायत्रींत एकंदर चोवीस अक्षरें असतात. त्यांत एक अक्षर कमी असल्यास तिला निवृत् असें विशेष नांव मिळतें. जास्ती असल्यास भुरिक् असें नांव मिळतें. ह्याप्रमाणेंच एकेक अक्षर कमी किंवा जास्त असल्यास उष्णिक् वगैरे इतर छन्दांसही अनुक्रमानें ह्याच संज्ञा मिळतात. जसें, निवृदुष्णिक, भुरिगुष्णिक् वगैरे निवृत्च्या जागीं दाक्षिणात्य प्रतींत निचृत् असें आहे.

द्वाभ्यां विराट् स्वराजौ ॥ ६० ॥

ह्या सूत्रांत वरून ' ऊनाधिकेन ' हें पद येतें व त्याचा येथील विशेष्यवाचक द्विवचनी पदास जुळेल असा ' ऊनाधिकाभ्याम् ' हा विभक्तिपरिणाम केला जातो (विभक्तीचा बदल). सूत्रार्थ—सामान्य शास्त्रोक्तीपेक्षां दोन अक्षरें कमी असल्यास ती गायत्री वगैरे विराट्संज्ञक होते, व दोन अक्षरें एकंदर शास्त्रोक्तसंख्येपेक्षां जास्त असल्यास ती गायत्री वगैरे जाति, स्वराट्संज्ञक होते.

आदितः संदिग्धे ॥ ६१ ॥

जेथें छन्दाच्या नामाविषयीं संशय उत्पन्न होईल तेथें शास्त्रानुसारानें पहिला पाद (आदितः) ज्या छन्दाचा असेल तें छन्द मानावें. उदाहरणार्थ, एखाद्या मन्त्रांत सव्वीस अक्षरें आहेत, तर हीं दोन अक्षरें जास्ती वाढल्यामुळें स्वराड्गायत्री मानावी किंवा उष्णिक्च्या अठ्ठावीस अक्षरांपेक्षां दोन अक्षरें कमी असल्याकारणानें ही विराडुष्णिक् समजावी अशी शंका आली असतां तिचें उत्तर हें सूत्र सांगतें कीं, त्या मन्त्राचा पहिला चरण ज्या छन्दाचा असेल तेंच छन्द समजावें. वेदांच्या सर्वानु-

क्रमणींत ह्याच सूत्राच्या आधारानें छन्दोनामाचा निर्णय केलेला दिसून येईल.

देवतादितश्च ॥ ६२ ॥

मन्त्रच्छन्दाविषयींचा संदेह दूर करण्याकरितां हें दुसरें प्रमाण सूत्रकार सांगतो. आद्यपादाप्रमाणेंच मन्त्रप्रतिपाद्य देवता, स्वर वगैरे वरूनही हा अमकाच छन्द हें निश्चित करावें. देवता वगैरेंचीं निर्णायक सूत्रें आतांच खालीं येतील.

अग्निः सविता सोमो बृहस्पतिर्वरुण इन्द्रो विश्वेदेवाः ॥ ६३ ॥

आतां वर सुचविलेल्या निर्णायक प्रमाणांच्या ज्ञानाकरितां प्रथम गायत्र्यादि वैदिक सात छन्दांच्या देवता ह्या सूत्रांत देतात. गायत्री, उष्णिक्, अनुष्टुप्, बृहती, पङ्क्ति, त्रिष्टुप् व जगती ह्या सात छन्दांच्या देवता अनुक्रमानें, अग्नि, सविता, सोम, बृहस्पति, वरुण, इन्द्र व विश्वेदेव ह्या आहेत. जसें गायत्रीची देवता अग्नि, उष्णिक्ची सविता वगैरे देवता समजाव्या. ह्या सूत्रामुळें विराट् स्वराट् वगैरे स्थलीं, अर्थविचारानें अग्नि-देवतेचा प्रतिपादक मन्त्र असल्यास तें छन्द गायत्री, सवितृदेवताक असल्यास तें छन्द उष्णिक् वगैरे निर्णय समजावा.

स्वराः षड्जादयः ॥ ६४ ॥

गायत्र्यादि सात छन्दांचें, अनुक्रमानें सा, रि, ग, म, प, ध, नी म्हणजे षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पञ्चम, धैवत, व निषाद हे सात स्वर आहेत. 'उदात्ते निषादगान्धारौ' वगैरे शिक्षासूत्रावरील आमच्या व्याख्यानानें व परंपरागत वैदिकांच्या पठनानें हे सात स्वर, अर्थज्ञान नसणारालाही समजून येईल. पुढचीं तीन सूत्रें इतिहासज्ञान व पुण्यविशेषाची प्राप्ति ह्याकरितां आहेत. त्यांना शास्त्रीयनिर्णयरूपी दृष्टफळ दिसत नाहीं.

सित–सारङ्ग–पिशङ्ग–कृष्ण–नील–लोहित–गौराः ॥ ६५ ॥

गायत्र्यादि सात छन्दांचे वर्ण अनुक्रमानें पांढरा, चित्रविचित्र (सारंग) पिवळा, काळा, निळा, तांबडा व गोरा असे आहेत.

आग्निवेश्य–काश्यप–गौतमाङ्गिरस–भार्गव–कौशिक–वासिष्ठानि गोत्राणि इति ॥ ६६ ॥

गायत्री वगैरे सात छन्दांचीं गोत्रें अनुक्रमानें आग्निवेश्य, काश्यप, गौतम, आङ्गिरस, भार्गव, कौशिक व वासिष्ठ हीं आहेत. येथें 'श्यामान्यतिच्छन्दांसि, रोचनाभाः कृतयः' अशीं दोन अधिक सूत्रें कांहीं छन्दःसूत्राच्या पुस्तकांत आढळतात. त्यांचा अर्थः–पुढें चौथ्या अध्यायांत येणारी अतिजगती वगैरे अतिशब्द पूर्वीं असलेलीं छन्दें काळसर रंगाचीं व कृति-शब्दान्त छन्दें झळकणाऱ्या रंगाचीं किंवा गोरोचनेच्या रंगाचीं आहेत असें समजावें. अधिक श्रद्धाळु असणारे वैदिक पाठक ह्या दोन सूत्रांचेंही येथें पठन करीत असतात. परंतु अतिछन्द व कृति ह्यांच्या विराट् व स्वराट् वेदांत आढळत नसून वैदिक छन्दांत त्यांचा स्वतंत्र उद्देशही नाहीं, म्हणून व वरच्या ६६ व्या सूत्राच्या शेवटींच समाप्तिदर्शक इतिपद असल्यामुळें हीं दोन सूत्रें प्रक्षिप्तच ठरतात. तथापि अतिच्छन्द व कृति ह्यांच्याहि स्वरवर्ण वगैरेंच्या ज्ञानांत दृष्टफळ नसलें तरीहि अदृष्ट पुण्यरूपी फळ संभवतें म्हणून त्यांचेंही पठन योग्य आहे असा त्या श्रद्धाळु पाठकांचा अभिप्राय आहे. ह्याकरितां ज्यांच्या छन्दःसूत्राच्या पाठांत अशीं अधिकसूत्रें असतील त्यांनीं त्यांचें पठन करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ह्या पक्षीं इतिकार ह्या दोन सूत्रांपुढें मानावा. कदाचित् तीं सूत्रेंही आचार्योक्त असल्यास इतर सूत्रांप्रमाणें त्यांच्या पाठांतही लाभच होईल. असो. 'आग्निवेश्य काश्यप' वगैरे वर दिलेल्या सूत्रांतल्या इतिपदानें येथें तिसरा अध्याय संपला हें बोधित केलें आहे.

अध्याय चौथा.

षडक्षरपादाच्या गायत्रीछन्दापासून द्वादशाक्षरपादाच्या जगतीछन्दापर्यंत असलेले छन्द पूर्वीच सांगितले. आतां त्रयोदशाक्षरीपादापासून सव्वीस अक्षरें पादांत असलेल्या छन्दापर्यंतचीं वृत्तें सामान्यरूपानें सांगण्याकरितां, प्रथम त्यांच्या संज्ञा सांगण्यास प्रारंभ करतात.

चतुःशतमुत्कृतिः ॥ १ ॥

ज्या छन्दांत चार आणि शंभर म्हणजे एकशें चार अक्षरें चारी पादांत मिळून असतात, तें उत्कृतिनामक छन्द होय. अर्थात् त्याच्या एका पादांत सव्वीस अक्षरें असतात.

चतुरश्चतुरस्त्यजेदुत्कृतेः ॥ २ ॥

उत्कृतिपासून चार चार अक्षरें कमी करून येतील ते अक्षरांक क्रमानें (५२ पर्यंत) मांडावे. आतां त्याचीं नांवें अनुक्रमानें सांगतात.

तान्यभिसंव्याप्रेभ्यः कृतिः ॥ ३ ॥

तीं उत्कृतीच्या मागचीं छन्दें, अनुक्रमानें अभि, सम्, वि, आ, प्र ह्या उपसर्गांपुढें कृति हें अक्षर ठेवलें असतां बनतात. म्हणजे चारी पाद मिळून शंभर अक्षरांची अभिकृति, शहाण्णव अक्षरांची संकृति, ब्याण्णव अक्षरांची विकृति, अठ्ठयांयशी अक्षरांची आकृति व चौऱ्यांशी अक्षरांची प्रकृति होते.

प्रकृत्या च ॥ ४ ॥

तसेंच उपसर्गांवांचून केवळ प्रकृतीनें म्हणजे मूळरूपानें राहिलेली

कृति ही त्यांच्या मागचा म्हणजे ऐंशी अक्षरांचा कृतिसंज्ञक छंद होतो. पुढें आणखी त्याच्या मागच्या छन्दांचीं नांवें, तीन सूत्रांनीं सांगतात.

धृत्यष्टि शर्करी जगत्यः ॥ ५ ॥

कृतीच्या पुढें, धृति, अष्टि, शर्करी व जगती हीं चार नांवें क्रमानें लिहावीं.

पृथक् पृथक्पूर्वत एतान्येवैषाम् ॥ ६ ॥

ह्या चार नांवांपैकीं प्रत्येकाच्या पूर्वी तींच तींच नांवें आणखी पुन्हा निराळीं लिहावीं, म्हणजे चार जोड्या मिळून आठ नांवें होतील.

द्वितीयद्वितीयमतितः ॥ ७ ॥

ह्या जोड्यांपैकीं दुसरें दुसरें नांव अतिपूर्वक लिहावें. अर्थात् तीं नांवें अतिधृति, अत्यष्टि, अतिशर्करी व अतिजगती अशीं होतील. म्हणजे कृतीच्या पूर्वीं हीं आणखी आठ छन्दांचीं नांवें झालीं. ह्यामुळें पूर्व-क्रमानुसार अतिधृति ७६ अक्षरांची, धृति ७२ अक्षरांची, अत्यष्टि ६८ अक्षरांची, अष्टि ६४ अक्षरांची, अतिशर्करी ६० अक्षरांची, शर्करी ५६ अक्षरांची, व अतिजगती ५२ अक्षरांची होते. ह्यांच्या मागचे ४८ अक्ष-रांच्या जगतीपासून २४ अक्षरांच्या गायत्रीपर्यंतचे छन्द तिसऱ्या अध्या-यांत आलेच आहेत. जगती अठ्ठेचाळीस अक्षरांनीं होते, हें मागेंच आलें आहे. ह्या प्रमाणें सप्तच्छन्दांशिवाय इतर चौदा छन्दांच्या सामान्यसंज्ञा सांगितल्या. त्यांचे पोटभेद पुढें पांचव्या अध्यायापासून येतील.

अत्र लौकिकम् ॥ ८ ॥

हें अधिकार सूत्र असून ह्यापुढें हें छन्दःशास्त्र संपेपर्यंत ह्याचा अधिकार आहे. ह्यावरून ह्यापूर्वीं सविस्तर कथन केलेले गायत्री वगैरे

छन्द वैदिक होत, असें ज्ञापित होतें. असो, ह्यापुढील आर्येपासून चूलिके-पर्यंत सर्व छन्द वैदिक व लौकिक असे दोन्ही प्रकारचे जाणावे. वैदिक छन्दांचें प्रकरण चालू असतां मध्येंच लौकिक छन्द सांगण्याचें कारण; स्मृति, पुराण, इतिहास वगैरेंतून आलेलीं तीं लौकिक छन्देंही ऋषींच्याच अनादिपरंपरेनें प्राप्त झालेलीं असून ह्यापुढें रचिल्या जाणाऱ्या काव्यरचने-सही त्यांचें ज्ञान अवश्य व मूलभूत आहे हें सूचित होतें. आणि काव्यें हीं तर धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या पुरुषार्थांस साक्षात् व परंपरेनें साधक आहेत हें अलंकारशास्त्रांत सिद्ध केलें आहे. काव्यप्रकाशांत श्रीमम्मटाचार्य म्हणतात, काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये । सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥ म्हणजे काव्यनिर्माण हें कीर्तिलाभ, द्रव्यप्राप्ति, व्यवहाराचें उत्तमज्ञान, अकल्याण व पाप ह्यांची निवृत्ति, लागलीच रसादिज्ञानाचा अपूर्व व अखण्ड आनन्द आणि प्रियस्त्रीप्रमाणें रुचि उत्पन्न करून उपदेश देणें ह्या प्रयोजनांकरितां अत्यंत सफल व आवश्यक आहे. अशाप्रकारें कलांमध्यें श्रेष्ठ असणाऱ्या काव्यांनां छन्दोज्ञान पायाच आहे, व त्यामध्यें त्याची महतीही फार आहे; कारण 'अपि माषं मषं कुर्याच्छ-न्दोभङ्गं न कारयेत्' म्हणजे, वेळ पडली तर 'माष' शब्दाच्या जागीं 'मष' शब्द लिहावा. परंतु छन्दोभङ्ग होऊं देऊं नये. ह्याचें कारण तो दोष अगदीं सहज लक्षांत येणारा आहे; तो प्रथम टाळला पाहिजे. इत्यादि अनेक कारणांस्तव सूत्रकार येथें परमदयाळूपणानें लौकिकछन्दांचें कथनही करीत आहे, शिवाय लौकिकवृत्तांच्या कथनाशिवाय शास्त्रास पूर्णताही आली नसती.

आत्रैष्टुभाच्च यदार्षम् ॥ ९ ॥

गायत्री पासून त्रिष्टुप् संपेपर्यंत पूर्वीं छन्दांच्या ज्या सहा आर्ष जाति सांगितल्या त्याही लोकव्यवहारांत तशाच आहेत असें समजावें. महाभार-

तादि पुराणग्रन्थांतून वैदिकछन्दांचे प्रयोग सुप्रसिद्ध असून ‘ अमी वेदिं परितः क्लृप्तधिष्ण्याः ’ हा शाकुंतलनाटकांतला त्रिष्टुप् छन्दाचा श्लोकही विद्वज्जनांस माहीत आहे. दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं दिलेल्या कोष्टकांपैकीं पहिल्या ओळींत ते, आर्षी गायत्र्यादि सातही छन्द दिले आहेत. त्यावरून चोवीस अक्षरांची गायत्री, अठ्ठावीस अक्षरांची उष्णिक्, बत्तीस अक्षरांची अनुष्टुप्, छत्तीस अक्षरांची बृहती, चाळीस अक्षरांची पङ्क्ति आणि चव्वेचाळीस अक्षरांची त्रिष्टुप् असें समजून येईल. चोवीस अक्षरांच्या मागचें लौकिक छन्द येथें प्रत्यक्ष सांगितले नसून पुढें आठव्या प्रत्ययाध्यायांत ते सुचविले आहेत.

पादश्चतुर्भागः ॥ १० ॥

प्रत्येक छन्दाचा चवथा भाग म्हणजे पाद होय. जसें गायत्री चोवीस अक्षरांची असल्यानें तिचा पाद सहा अक्षरांचा आहे. हा नियम समवृत्तांविषयींच जाणावा.

यथावृत्तसमाप्तिर्वा ॥ ११ ॥

किंवा जशा जशा सांगितलेल्या कमीजास्त अक्षरांच्या पादांनीं वृत्तें संपतील तसे त्यांचे पाद धरावे. हा विकल्प व्यवस्थित (नियमबद्ध) असून विषम व अर्धसमवृत्तांविषयींच समजावा. चतुष्पाद समवृत्तांविषयीं नाहीं. त्यांचा पाद दहाव्या सूत्राप्रमाणें समजावा. लौकिक छन्दें तीन प्रकारचीं आहेत. आर्येपासून उद्गीतिपर्यंत गणच्छन्दें आहेत, त्यापुढें वैतालीयापासून चूलिकेपर्यंत मात्राछन्दें आहेत व त्यापुढें समानीपासून उत्कृति संपेपर्यंत अक्षरच्छन्दें आहेत. त्यांमध्येंही मयरस वगैरे गण आहेत. तथापि त्यांत ठराविक अक्षरें असल्यानें ते अक्षरच्छन्द समजावे. असो आतां सूत्रकार आर्यादिकांच्या ज्ञानाकरितां प्रथम गण म्हणजे काय हें येथें सांगतात.

लः समुद्रा, गणः ॥ १२ ॥

ल हें पद एकमात्रिकाचें उपलक्षण आहे असें समजावें; तसेंच समुद्र चार हें प्रसिद्धच आहे. सूत्रार्थ—ह्रस्व, दीर्घ मिळून अथवा कशातरी चार मात्रा म्हणजे एक गण होतो. ह्रस्वाची मात्रा एक व दीर्घाच्या (गुरु) दोन जाणाव्या. ह्या शास्त्रांत स्वरशास्त्राप्रमाणेंच प्लुतस्वरानें व्यवहार नाहीं म्हणून लुतस्वराचेंही ग्रहण दीर्घपदानेंच होतें असें जाणावें. मात्रा म्हणजे वस्तुतः एक क्षण. लघूच्चारास एक क्षण काल लागतो म्हणून तो एकमात्रिक असा व्यवहार आहे.

गौ गन्तमध्यादिर्लश्च ॥ १३ ॥

ह्या सूत्रानें त्या चार मात्रांनीं होणाऱ्या गणांचे अवांतरभेद सांगतात. सूत्रार्थ—दोन ग (गुरु), गन्त, गमध्य, गकारादि व केवळ ल असे पांच चतुर्मात्रिक गण होतात. ह्या छन्दःशास्त्रांत लघूची खूण । अशी एक उभी रेघ व गुरूची खूण ऽ अशी अवग्रहासारखी वांकडी रेघ मानण्याची परंपरा आहे. त्यांनीं वरच्या पांचहि गणांचे प्रस्तार अनुक्रमानें; ऽऽ, ॥ऽ, ।ऽ।, ऽ॥, ॥॥, असे होतात. ह्या सर्वांत चार चार मात्रा स्पष्टच आहेत. ह्यांपेक्षां अधिक चतुर्मात्रिक प्रकार संभवतच नसल्यामुळें हें सूत्र केवळ स्पष्ट समजण्याकरितां रचिलें आहे, विशेष कांहीं नाहीं. आतां ह्यापुढें आर्याधिकार सुरू झाला.

स्वरा अर्धं चार्यार्धम् ॥ १४ ॥

षड्ज, ऋषभ, गांधार वगैरे स्वर सात लोकप्रसिद्ध आहेत, म्हणून ह्या सूत्रांत स्वर हें पद सात ह्या संख्येचें उपलक्षक धरून असा सूत्रार्थ होतो कीं, वर सांगितल्याप्रमाणें चतुर्मात्रिक सात गण व एक अर्धा गण

म्हणजे दोन मात्रा मिळून एकंदर तीस मात्रांनीं आर्येचें एक अर्ध तयार होतें. उत्तरार्धासंबंधी विशेष अपवाद पुढें येतील. ॥ १४ ॥

अत्रायुङ् न ज् ॥ १५ ॥

ह्या आर्याछन्दांत साडेसात गण एका अर्धांत असावे असें वरच्या सूत्रानें सांगितलें परंतु त्यापैकीं अयुक् म्हणजे विषमस्थानाचा गण अर्थात् पहिला तिसरा, पांचवा व सातवा गण ज् (।ऽ। मध्यगुरु) नसावा, इतर स्वेच्छेप्रमाणें घालावे ॥ १५ ॥

षष्ठो ज् ॥ १६ ॥

आर्येंत सहावा गण मात्र ज् हाच असावा.

न्लौ वा ॥ १७ ॥

किंवा न्ल म्हणजे चतुर्लघु (।।।।) गण सहावा असावा ॥ १७ ॥

न्लौ चेत्पदं द्वितीयादि ॥ १८ ॥

येथें षष्ठः हें पद अनुवृत्तीनें येतें. सूत्रार्थ–आर्याधींत सहावा गण जर न्ल योजिला तर त्यांपैकीं दुसऱ्या मात्रेपासून पदास आरंभ झाला असला पाहिजे, व पहिली मात्रा मागील पदांत पाहिजे. जसें,

श्रीरामचंद्र विभुच्या पादसरोजास, नमन उभय करीं ।
करितां हरि तापातें निवटी अघनग हि अभय करी ॥ १ ॥
(स्वकृत १) ॥ १८ ॥

सप्तमः प्रथमादि ॥ १९ ॥

येथें 'न्लौ चेत्पदं' ह्या पदांची अनुवृत्ति आणून सूत्रार्थ देतों. आर्येचा सातवा गण जर सर्वलघु (न्ल) असला तर त्याच्या पहिल्या मात्रेपासूनच पदास आरंभ केला पाहिजे नाहींतर यतिभंग होईल. यति

म्हणजे पद्यपठनांत किंचित् थांबण्याची जागा. हें यतिप्रकरण पुढें येईलच. असो. ह्या सूत्राचेंही उदाहरण, वरील १८ व्या सूत्रावर दिलेल्या आर्येंतच आहे. तीमध्यें उभय ह्या पदाला सातव्या गणाच्या पहिल्या मात्रेपासून सुरुवात झाली आहे. ॥ १९ ॥

अन्त्ये पञ्चमः ॥ २० ॥

येथें 'न्लौ चेत्पदं' व 'प्रथमादि' येवढ्या पदांची अनुवृत्ति करून सूत्रार्थ देतों. अन्त्ये म्हणजे उत्तरार्धामध्यें पांचवा गण जर चतुर्लघु (न्ल) घातला तर, त्यांतही पदास प्रारंभ पहिल्या मात्रेपासून केला पाहिजे. वरच्या आर्येंत पहा, अघ नग ह्या पदास पांचव्या गणाच्या पहिल्या मात्रेपासून प्रारंभ केला आहे ॥ २० ॥

षष्ठश्च ल् ॥ २१ ॥

ह्या सूत्रांत अन्त्ये हें पद अनुवृत्तीनें येतें. अन्त्ये म्हणजे उत्तरार्धांत सहावा गण केवळ एकलकाररूपच (।) घालावा. अर्थात् उत्तरार्धांत एकंदर पंधराच मात्रा संभवतात.

'षष्ठो ज् न्लौ वा'

ह्या दोन सूत्रांनीं पूर्वार्धाप्रमाणेंच उत्तरार्धांतही सहावा गण मध्यगुरु (।ऽ।) किंवा सर्व लघु (।।।।) येत असतां त्याचें हें सूत्र अपवादक आहे; म्हणून उत्तरार्धामध्यें सहावा गण केवळ एकमात्रिक म्हणजे एकच लघु अक्षर घालावें. वरच्या आर्येंत उत्तरार्धांत सहावा गण केवळ 'हि' असाच एकलकार घातला आहे पहा, ॥ २१ ॥

त्रिषु गणेषु पादः पथ्यायै च ॥ २२ ॥

ह्यांत चकारानें 'अन्त्ये' हें पद अनुवृत्त आहे. ज्या आर्येंत दोन्ही अर्धांत पहिल्या तीन गणांच्या शेवटीं पादसमाप्ति अर्थात् पदसमाप्ति

होत असते, ती आर्या पथ्यासंज्ञक होय. उदाहरण वरचेंच पहा. त्यांत विभुच्या व तापातें असें तिसऱ्या गणाच्या शेवटीं पादच्छेद (पदच्छेद) पाडतां येत आहेत. ॥ २२ ॥

विपुलान्या ॥ २३ ॥

जिच्या पहिल्या किंवा दुसऱ्या अथवा दोन्ही अर्धांत तिसऱ्या गणाच्या शेवटीं पादच्छेद (पदान्त) होत नसेल ती आर्या विपुलासंज्ञक होय. जसें "सोडुनि सर्वहि संसा—रभया हरिभक्तिलाचि लागावें । सांगावें काय जना—र्दन नुरवी क्लेश, झणि धावे" ॥ (स्वकृत २) ह्या पद्यांत संसारभया व जनार्दन हीं एकपदें असून तृतीय गणाच्या शेवटीं पाद (पदान्त) पडत नाहीं म्हणून ही आर्या विपुला होय ॥ २३ ॥

चपला द्वितीयचतुर्थौ ग्मध्ये जौ ॥ २४ ॥

ज्या आर्येत दुसरा व चवथा गण ज म्हणजे मध्यगुरु असून त्याच्या मागें व पुढें गुरु अक्षरें असतील ती आर्या चपला संज्ञक होय. असें व्हावयास अर्थात् पहिला गण अन्त्यगुरु, तिसरा द्विगुरु (SS) व पांचवा प्रारंभीं गुरूनें युक्त पाहिजे. उदाहरण, कमलापतीस चित्तीं धराल भावें तरी तराल भवा। असला सपाप कोणी तथापि तोही वरिल विभवा ॥ (स्वकृत ३) ॥ २४ ॥

पूर्वे मुखपूर्वा ॥ २५ ॥

वरच्या सूत्रांत सांगितलेला गमध्यस्थ जगण फक्त पूर्वार्धांत असून उत्तरार्धांत नसेल तर ती आर्या मुखपूर्व चपला म्हणजे मुखचपला होय. वरील तिसऱ्या आर्येच्या उत्तरार्धांतील सपाप हें पद काढून तेथें अघनिधि हें पद घातलें तर तेंच मुखचपलेचें उदाहरण होईल. ॥ २५ ॥

जघनपूर्वेतरत्र ॥ २६ ॥

इतरत्र म्हणजे उत्तरार्धांतच (पूर्वभिन्न) वर सांगितल्याप्रमाणें गमध्यस्थ जगण असेल तर ती जघनचपला नांवाची आर्या होय. वर दिलेल्या तिसऱ्या आर्येच्या पूर्वार्धांत, चित्तीं हें पद काढून तेथें हृदयीं असा शब्द घातला असतां तेंच जघनचपलेचें उदाहरण होईल. ॥ २६ ॥

उभयोर्महाचपला ॥ २७ ॥

दोन्ही अर्धांत चपलेचें लक्षण जुळलें तर ती आर्या महाचपला समजावी. उदाहरण वर दिलेली तिसरी आर्याच होय. ॥ २७ ॥

आद्यर्धसमा गीतिः ॥२८॥

येथें वरून 'उभयोः' हें पद अनुवृत्तीनें येतें. दोन्ही अर्धांमध्यें, आर्यापूर्वार्धासारखीच अर्थात् एकंदर साठ मात्रांनीं युक्त असतें ती गीति होय. हीमध्यें तीस तीस मात्रांचें एकेक अर्ध होतें, आर्येच्या उत्तरार्धांत सत्तावीसच मात्रा असतात. मागें दिलेल्या स्वकृत पहिल्या आर्येंत अघन-गहि ह्याच्यापुढें शीघ्र असा शब्द घातला असतां तीन मात्रा वाढून तेंच गीतीचें उदाहरण होईल. मोरोपंत कवीच्या बहुतेक आर्या ह्या गीति-जातीच्या आहेत ॥ २८ ॥

अन्त्येनोपगीतिः ॥ २९ ॥

ह्या सूत्रांतही 'उभयोः' ह्या पदाची अनुवृत्ति आहे. दोन्ही अर्धांत आर्येच्या उत्तरार्धाप्रमाणेंच सत्तावीस मात्रा असतील तर, ती उपगीति होते. पहिल्या आर्येंत उभयकरीं ह्या शब्दांतील उभय हें पद काढलें असतां तीच कविता उपगीतीचें उदाहरण होईल. ॥ २९ ॥

उत्क्रमेणोद्गीतिः ॥ ३० ॥

आर्येच्या अर्धांची उलटापालट (उत्क्रम) केली असतां म्हणजे पहिलें अर्ध

सत्तावीस मात्रांचें व दुसरें तीस मात्रांचें रचिलें असेल तर ती उद्गीति होते. पहिल्या स्वकृत आर्येचीं अर्धें बदलून मांडा, म्हणजे अर्थात थोडा दूरान्वय होत असला तरी तें उद्गीतिचें उदाहरण होईल. ॥ ३० ॥

अर्धे वसुगण आर्यागीतिः ॥ ३१ ॥

प्रत्येक अर्धात पूर्ण आठ गण (वसु—आठ) अर्थात् बत्तीस मात्रा असल्यास तें छन्द आर्यागीतिनामक होतें. ह्याचें उत्तरार्धही असेंच अष्टगणी असून दोन्ही अर्धात सहावा गण आर्येप्रमाणेंच ' ज ' किंवा ' न्ल ' असतो. उदाहरण " शिन्त्रेवंशसमुद्भव वाग्देवीचरणदास शिवराम कवी। विवरून देशभाषे-मधिं छन्दःसूत्र पण्डितांप्रति सुखवी " ॥ (स्वकृत ४) पथ्या, चपला वगैरे अवांतर भेदांनीं ह्या सर्व जातींचेही अनेक प्रकार होतात. ह्या आर्याप्रकरणांत सर्वत्र अर्धाच्या शेवटीं गुरु असतो हें लक्षांत ठेवावें. ह्या असंख्य प्रकारांचीं व पुढें येणाऱ्या सर्व वृत्तांचींही उदाहरणें नवीन रचून किंवा ग्रन्थांतरांतून उद्धृत करून आम्ही येथें प्रायः देणार नाहीं; कारण त्यानें फारच ग्रंथविस्तार होईल. तथापि ।, ऽ, या लघुगुरु चिन्हांनीं इष्टवृत्ताच्या गणांचा प्रस्तार मांडून जिज्ञासूला नवीन कविता रचितां येईल किंवा छन्दाचें नांव सहज ओळखतां येईल. येथें आर्याधिकार संपून पुढें वैतालीयाधिकार सुरू होतो ॥ ३१ ॥

वैतालीयं द्विः स्वरा अयुक्पादे युग्वसवोऽन्तेर्लगाः ॥ ३२ ॥

येथें लः ह्या पदाची अनुवृत्ति फार फार दूर प्रदेशाहून मण्डूकप्लुतीनें (बेडकासारखी गती) येते. जेथें विषम म्हणजे पहिल्या व तिसऱ्या पादांत प्रथम सहा (द्विः स्वराः येथें १३ व्या सूत्राप्रमाणें सात स्वर न मानतां स्वर म्हणजे तीन, असा अर्थ घेतला आहे; कारण ' उदात्तश्चानुदात्तश्च स्वरितश्च स्वरास्त्रयः वेदाङ्ग शिक्षा,' पहा) ल म्हणजे मात्रा व

समपादांत प्रथम आठ ल असून त्यांच्यापुढें र, ल, ग असे गण क्रमानें येतात. तेथें वैतालीय नांवाचें वृत्त (छन्द) होतें. र, ल, ग ह्यांचा मात्रा विन्यास ऽ। ऽ, ।, ऽ असा आहे. वैतालीयाचें उदाहरण:—'वन्दन हें भारतीपदां मम संतत, हरि जें निजापदां। कविवृन्द यदीयचिन्तनें मतिजाड्यादि लयास शीघ्र ने (स्वकृत ५) ॥ ३२ ॥

औपच्छन्दसिकम् ॥ ३३ ॥

येथें वरच्या सूत्रांतील 'द्विः स्वराः' वगैरे भागाची अनुवृत्ति आहे. सूत्रार्थ—त्या वैतालीय छन्दाच्याच प्रत्येक पादाच्या शेवटीं जर एकेक गुरु अधिक असला तर, तें वृत्त औपच्छन्दसिक नांवाचें होतें. तात्पर्य विषम पादांत प्रथम वर सांगितल्याप्रमाणें सहा मात्रा व समपादांत आठ मात्रा रचून त्यांच्यापुढें र, ल, ग ह्यांच्याऐवजीं र, य (ऽ।ऽ, ।ऽऽ) हे त्र्यक्षरीं दोन गण रचावे म्हणजे औपच्छन्दसिक वृत्त होतें; हा फलितार्थ निघतो. ॥ ३३ ॥

आपातलिका भ्गौ ग् ॥ ३४ ॥

येथें 'द्विः स्वराः लः अयुक्पादे युग्वसवोऽन्ते' एवढीं पदें अनुवृत्तीनें आणून सूत्रार्थ लिहितों. वैतालीयाप्रमाणेंच प्रथम विषम पादांत सहा मात्रांचा व सम पादांत आठ मात्रांचा विन्यास असून त्यापुढें र ल ग ऐवजीं भ ग ग (ऽ।।, ऽ, ऽ) हे गण प्रत्येक पादांत असल्यास तें वृत्त आपातलिका नांवाचें होतें. ॥ ३४ ॥

शेषे परेण युङ् न साकम् ॥ ३५ ॥

या वैतालीयाधिकारांत असलेला गणांचा नियम सांगितला. आतां शिल्लक राहिलेला मात्रांचा नियम ह्या सूत्रानें सांगतात. ह्या पूर्वोक्त सहा किंवा आठ मात्रांमध्यें सम मात्रा (युक् २, ४, ६) पुढच्या मात्रेशीं युक्त

करूं नये म्हणजे दुसरी व तिसरी, चवथी व पांचवी, सहावी व सातवी ह्या जोड मात्रांना एका गुरु अक्षरांत एकत्र घालूं नये. बाकीच्या मात्रा स्वेच्छेनें रचाव्या ॥ ३५ ॥

षट् चामिश्रा युजि ॥ ३६ ॥

येथें न ह्या पदाची अनुवृत्ति होते. शिवाय ह्या वैतालीयाधिकारांत पहिल्या सहा मात्रा समपादांत (युजि, दुसरा व चवथा) मोकळ्या ओळीनें घालूं नये. म्हणजे त्यांचा '॥॥॥' असा विन्यास होऊं नये. ३२ व्या सूत्रावरील उदाहरणांत, द्वितीयपादांत 'मम संतत' ह्याच्या जागीं 'मम अविरत' अशीं पदें घालूं नये, असें तात्पर्य. विषमपादांत अशा मात्रा वेगवेगळ्या सहा रचिल्या तरी चालतात. वरच्याच उदाहरणामध्यें प्रथम पादांत 'वन्दन हें' ह्याच्या जागीं सविनयनति असें पद घातल्यास चालेल. इतकें गणमात्रांचें नियमन केलें तरीही पुष्कळ वृत्तांचे, कोट्यवधीहि पोटप्रकार प्रस्तारभेदानें होतात. एकट्या गीतिचेच १६ कोटीहून अधिक प्रकार होतात, हें संस्कृत वृत्तरत्नाकर ग्रन्थावरच्या नारायणभट्टकृत टीकेवरून स्पष्ट कळेल. सारांश इतर शास्त्रांप्रमाणेंच ह्या छन्दःशास्त्राचा विस्तारही व्यक्तिगणनेच्या दृष्टीनें अनंत आहे ह्यांत तिळमात्रहि संशय नाहीं. ॥ ३६ ॥

पञ्चमेन पूर्वः साकं प्राच्यवृत्तिः ॥ ३७ ॥

वरच्या सूत्रानें सममात्रेचें पुढच्या विषम मात्रेशीं एकीकरण करूं नये असें सांगितलें. त्याला थोडीशी मोकळीक देऊन एक निराळें वृत्तनाम सांगतात. येथें मागून युजि हें पद आणून सूत्रार्थ करतों. समपादांत चवथी मात्रा पांचवीशीं मिश्र रचल्यास तें प्राच्यवृत्ति नांवाचें वैतालीय होतें. जसें ३२ व्या सूत्रावरील उदाहरणांत 'मम संतत' ह्याच्या जागीं 'मम सदैव' अशीं पदें रचिलीं तर तो प्राच्यवृत्तीचा पाद होईल.

अयुक्तृतीयेनोदीच्यवृत्तिः ॥ ३८ ॥

येथें ' पूर्वः साकम् ' ह्या पदाची अनुवृत्ति करून सूत्रार्थ. विषमपादांत, दुसरी व तिसरी मात्रा (तृतीयेन र्वः साकम्) एकत्र म्हणजे एका गुर्वक्षरांत रचली असतां तें, उदीच्यवृत्ति नांवाचें वैतालीय होतें. जसें बत्तिसाव्या सूत्रावरील उदाहरणांत ' वन्दन हे ' ह्या पदांच्या जागीं ' नमोऽस्तु हें ' अशीं पदें घातलीं तर तो उदीच्यवृत्तीचा चरण होईल.

आभ्यां युगपत्प्रवृत्तकम् ॥ ३९ ॥

प्राच्यवृत्ति व उदीच्यवृत्ति ह्यांचीं लक्षणें एकाच पादांत जुळत असल्यास त्या वैतालीयाचें नांव प्रवृत्तक होय. ॥ ३९ ॥

अयुक् चारुहासिनी ॥ ४० ॥

ह्यांपैकीं विषमपादाच्या (प्राच्यवृत्तीच्या) लक्षणानेंच चारी पाद युक्त असले तर तें चारुहासिनी नांवाचें वैतालीय वृत्त होतें. अर्थात् चारही पादांत प्रथम सहा मात्रा व त्यांपुढें र ल ग (ऽ। ऽ, ।, ऽ) हे गण असून दुसरी व तिसरी मात्रा एकत्र पाहिजे ॥ ४० ॥

युगपरान्तिका ॥ ४१ ॥

ह्यांपैकीं समपादांच्या (युक्) किंवा उदीच्यवृत्तीच्याच लक्षणानें युक्त असे चारी पाद असल्यास तो अपरान्तिकानामक वैतालीयाचा प्रकार होतो. अर्थात् चारी पादांत प्रथम आठ मात्रा व त्यांपुढें र ल ग हे गण असून चौथी व पांचवी मात्रा एकत्र पाहिजे. येथें वैतालीयाधिकार संपून मात्रासमाधिकार सुरू होतो ॥ ४१ ॥

गन्ता द्विर्वसवो मात्रासमकं नवमः ॥ ४२ ॥

मागच्या सूत्रांतून पादे व लः हीं पदें अनुवृत्तीनें येतात. जेथें एका पादांत द्विर्वसु म्हणजे सोळा मात्रा एकंदर असून त्यांपैकीं शेवटीं पंधरावी

व सोळावी मात्रा मिळून एकगुरु (गन्ता) व नववी मात्रा एकलघुरूपीच ठराविक असते तेथें मात्रासमक वृत्त जाणावें. जसें,

ईशपदाला सतत नमावें
तद्गुणगानीं रत मुख व्हावें ।
मन तच्चिन्तन–निमग्न होई
तरि मनुजाला भव भय नाहीं ॥ (स्वकृत) ६

हें मात्रासमकाचें उदाहरण आहे. येथें सर्वत्र पादान्तीं गुरु असून नवव्या मात्रा एकलघुरूप मोकळ्या आहेत. ॥ ४२ ॥

द्वादशश्च वानवासिका ॥ ४३ ॥

येथें सूत्रांतील चकारानें नवमः याची अनुवृत्ति आहे. ज्या मात्रासमकाच्या पादांत बारावी व नववी मात्रा मोकळी एकलघुरूपच असते; त्याचें नांव वानवासिका होय. ॥ ४३ ॥

विश्लोकः पञ्चमाष्टमौ ॥ ४४ ॥

ज्या मात्रासमकाच्या पादांत पांचवी व आठवी मात्रा एकलघुरूपच असते त्याचें नांव विश्लोक होय. येथें द्वादश व नवम ह्या पदांची अनुवृत्ति होत नाहीं हें प्राचीन व्याख्यानांवरून दिसून येतें. ॥ ४४ ॥

चित्रा नवमश्च ॥ ४५ ॥

येथें सूत्रस्थ चकारानें पञ्चमाष्टमौ ह्या पदाची अनुवृत्ति होते. ज्याच्या पादांत नववी, पांचवी व आठवी मात्रा एकलघुरूपच असते तें चित्रानामाचें मात्रासमक जाणावें. प्रसिद्ध चर्पटपञ्जरी स्तोत्राचें किंवा कटावाचें वृत्त मात्रासमकच आहे. ॥ ४५ ॥

परयुक्ते नोपचित्रा ॥ ४६ ॥

येथें नवमः हें पद आणून सूत्रार्थ, नववी मात्रा दहावीशीं एकत्र झाली असल्यास तें उपचित्रा नांवाचें मात्रासमक होय. ह्यांत पांचव्या व आठव्या लघूचा विशेष नियम नाहीं. तथापि शेवटीं गुरु पाहिजेच. ॥ ४६ ॥

एभिः पादाकुलकम् ॥ ४७ ॥

मात्रासमक, वानवासिका, विश्लोक, चित्रा व उपचित्रा ह्या वृत्तांपैकीं अनेक वृत्तांच्या पादांच्या मिश्रणानें युक्त चार पाद असल्यास, त्याचें नांव पादाकुलक वृत्त होय. येथें मात्रासमाधिकार संपला. ॥ ४७ ॥

गीत्यार्या लः ॥ ४८ ॥

ह्या सूत्रांत 'पादे व द्विर्वसवः' हीं पदें अनुवृत्त आहेत. ज्याच्या पादांत सोळाही मात्रा केवळ लघुरूपच असतात, त्या वृत्ताचें नांव गीत्यार्या होय. ह्या सूत्रांत लची अनुवृत्ति सिद्ध असतां पुन्हां लः हें पद सूत्रांत घातलें आहे. त्यानें गुर्वक्षराची सर्वथा निवृत्ति सूचित केली म्हणून पादांत एकही गुरु उपयोगी नाहीं असें ठरतें. जसें, 'चरण भजन तव भवभय निवटिल' हा गीत्यार्यावृत्ताचा एक पाद आहे. ॥ ४८ ॥

शिखा विपर्यस्तार्धा ॥ ४९ ॥

वरच्या उलट म्हणजे सर्व गुरुवर्णांचेंच एक अर्ध असल्यास तिचें नांव शिखा होय. म्हणजे दोन पादांत मिळून केवळ बत्तीस लघु व दुसऱ्या दोन पादांत मिळून केवळ सोळा गुरु होय. कारण प्रत्येक चरणांत सोळा मात्रा असतात. ॥ ४९ ॥

लः पूर्वश्चेज्ज्योतिः ॥ ५० ॥

पहिलें अर्ध (दोन पाद) केवळ लघूंचें असल्यास व दुसरें अर्ध केवळ गुरूंचें असल्यास ती ज्योतिःसंज्ञक शिखा होय. ॥ ५० ॥

गश्चेत्सौम्या ॥ ५१ ॥

येथें पूर्वः हें पद अनुवृत्तीनें येतें. सूत्रार्थ. पूर्वार्ध जर केवळ गुर्वक्षरांचें व उत्तरार्ध केवळ म्हणजे बत्तीस लघूंचें असेल तर ती सौम्या नांवाची शिखा होय. ॥ ५१ ॥

चूलिकैकोनत्रिंशदेकत्रिंशदन्ते ग् ॥ ५२ ॥

येथें अर्धपदाची अनुवृत्ति होते. प्रथमार्धांत एकोणतीस मात्रा व उत्तरार्धांत एकतीस मात्रा असून त्यांपैकीं शेवटच्याच दोन दोन फक्त एकगुर्वात्मक असतात व बाकीचे, क्रमाक्रमानें सत्तावीस व एकोणतीस केवळ लघुच असतात, त्या वृत्ताचें नांव चूलिका होय. हीं दिग्दर्शन केलेलीं मात्रावृत्तें, साकी, दिण्डी, दोहा, पदें वगैरे सर्व प्राकृत प्रसिद्ध वृत्तांचीं उपलक्षकच होत. म्हणून गण व मात्रा ह्यांच्या नियमांनीं, दिंडी, साकी, अभंग व इतर प्राकृत पदें ह्यांचींही लक्षणें पठनाच्या सोयीप्रमाणें कल्पना करून बांधावीं. ह्या शास्त्रांत फक्त दिशा दाखविल्यामुळें व सर्वोपयोगी गण व मात्रा सांगितल्याच असल्यामुळें, शास्त्रांत साकी वगैरे वृत्तांचीं नांवें व लक्षणें न दिल्यानें ह्यामध्यें न्यूनता आहे असें समजूं नये. पुढें येणारा प्रस्ताराध्यायहि असाच सामान्यतः सर्ववृत्तांचा संग्राहक आहे. वृत्तांचीं नांवें व प्रकार पुढेंही रुचिवैचित्र्यामुळें अनंत वाढतील. परंतु त्या सर्वांचा समुद्रांत जलांचा होतो त्याप्रमाणें 'मयरसतजभनलग' ह्या दशगणीच्या प्रस्तारांत अंतर्भाव झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ॥ ५२ ॥

सा ग्येन न समा लां ग्ल इति ॥ ५३ ॥

सूत्रकार आतां ह्या सूत्रानें, गणच्छन्द व मात्राच्छन्द ह्यांमधील गुरूंची व लघूंची संख्या ओळखण्याचा उपाय सांगतो. ग्ल म्हणजे एकंदर श्लोकांतील गुरु–लघु मिळून होणारीं अक्षरें, लाम् म्हणजे मात्रांच्या समाः

म्हणजे बरोबर (तुल्य), येन म्हणजे जेवढ्या अक्षरसंख्येनें, असे प्रकृत सूत्रांतील शब्दांचे अर्थ आहेत. ह्यांत ल चे लघु व मात्रा असे दोन अर्थ केले आहेत. आतां स्पष्ट सूत्रार्थ लिहितों. पद्यांतील एकंदर अक्षरांची संख्या, जेवढ्या संख्येनें एकंदर मात्रासंख्येच्या समान होत नाहीं, तेवढी त्या पद्यांतील गुरूंची संख्या होय. म्हणजे मात्रासंख्येंत एकंदर अक्षरसंख्या वजा केली असतां बाकी राहील ती गुरूंची संख्या जाणावी, असा फलितार्थ होतो. हीच गुरुसंख्या अक्षरसंख्येंत वजा केली असतां बाकी राहील ती लघूंची संख्या हें सहज समजतें; म्हणून त्याकरितां वेगळें सूत्र रचिलें नाहीं. हें सूत्र उदाहरणानें स्पष्ट करतों. " श्रीरामचंद्रविभुच्या पादसरोजास नमन उभय करीं । करितां हरि तापातें, निवटी अघनगहि अभय करी ॥ (१८ वें सूत्र पाहा.) ह्या पूर्वी दिलेल्या स्वकृत आर्येंत एकंदर त्रेचाळीस अक्षरें आहेत. आर्येंत दोन्ही अर्धें मिळून एकंदर ५७ मात्रा असतात, त्यांतून ४३ वजा केले असतां १४ राहातात. तितकेच ह्या आर्येंतील गुरु असून बाकीचे एकोणतीस लघुवर्ण जाणावे. मात्रासमकादि इतर वृत्तांतील लघु-गुरुसंख्याही अशाच ओळखाव्या. ह्या सूत्राच्या शेवटीं 'इति' शब्द लावून येथें हा चवथा अध्याय संपला हें ज्ञापित केलें आहे. ॥ ५३ ॥

अध्याय पांचवा.

वृत्तम् ॥ १ ॥

हें अधिकारसूत्र असून ह्यापुढें हें शास्त्र संपेपर्यंत ह्याचा अधिकार आहे; म्हणून ह्या पुढच्या छन्दांचें नांव नियमानें वृत्त असें जाणावें. ह्यांचे पाद व्यवस्थित असल्यानें त्यांना पद्य असेंही म्हणतात. ह्या पूर्वीच्या वैदिक पद्यांना छन्द व आर्या वगैरे केवळ लौकिक वृत्तांना जाति अशी संज्ञा आहे. ॥ १ ॥

सममर्धसमं विषमं च ॥ २ ॥

वृत्त हें सम, अर्धसम व विषम अशा तीन प्रकारचें असतें. ज्याचे चारही चरण सारखे असतात तें समवृत्त होय. ह्याचे तनुमध्या वगैरे प्रकार पुढें येतील. ज्याचीं अर्धें सारखीं असतात म्हणजे पहिला व तिसरा पाद आणि दुसरा व चौथा पाद सारखे असतात तें अर्धसमवृत्त होय. ज्याचे चारी पाद निरनिराळ्या स्वरूपाचे असतात तें विषमवृत्त असें जाणावें. ॥ २ ॥

समं तावत्कृत्वः कृतमर्धसमम् ॥ ६ ॥

एकाद्या गायत्री वगैरे छन्दांतील समवृत्तांच्या एकंदर संख्येला तिनेंच गुणून गुणाकार येईल तेवढी त्या छन्दांतील अर्धसमवृत्तांची संख्या होय. जसें, षडक्षरी गायत्री छन्दांत प्रस्तारानें ६४ समवृत्तें संभवतात, तो प्रकार पुढें आठव्या प्रस्ताराध्यायांत येईल. असो. त्या चौसष्ट संख्येला तिनेंच गुणलें असतां गुणाकार ४०९६ येतो. तेवढीं षडक्षरपाद गायत्रीछन्दांतील अर्धसमवृत्तें जाणावीं. ॥ ३ ॥

विषमं च ॥ ४ ॥

येथें 'तावत्कृत्वः कृतमर्धसमम्' येवढ्या पदांची अनुवृत्ति आहे. सूत्रार्थ. अर्धसमवृत्तांच्या एकंदर संख्येला तिनेंच गुणून जो गुणाकार येतो तेवढी तेवढ्या अक्षरांच्या पादांतील विषमवृत्तांची संख्या होते. जसें, वर लिहिल्याप्रमाणें गायत्रीछन्दांतील अर्धसमवृत्तें ४०९६ आलीं. त्या संख्येला तिनेंच पुन्हां गुणलें असतां, गुणाकार १,६७,७७,२१६ येतो; ही षडक्षरपाद गायत्रीच्या एकंदर संभवणाऱ्या विषमवृत्तांची संख्या झाली. परंतु ह्या दोन्ही संख्या मिश्र आहेत म्हणून विशेष कार्य सांगतात. ॥ ४ ॥

राश्यूनम् ॥ ५ ॥

वरच्याप्रमाणें केलेल्या गुणाकारांनीं एकंदर अर्धसम व विषमवृत्तांची संख्या येते ती मिश्र येते म्हणजे तिच्यांत क्रमानें समवृत्तांची व अर्धसमवृत्तांची संख्या मिसळली असते म्हणून गुण्यराशि गुणाकारांतून वजा करावा म्हणजे शुद्ध अर्धसमांची व शुद्ध विषमांची संख्या निघेल. ह्या करितां ४०९६ ह्या मिश्रसंख्येंतून गायत्री छन्दांतील ६४ शुद्ध समवृत्तें वजा करावीं म्हणजे ४०३२ हींच उरलेलीं खरीं गायत्रीचीं अर्धसमवृत्तें होत. तसेंच विषमवृत्तांच्या १,६७,७७,२१६ ह्या गुणाकारांतून ४०९६ ह्या गुण्यराशि वजा करून उरलेलीं १,६७,७३,१२० हींच गायत्रींतील खरीं विषमवृत्तें होत. असेंच सर्व छन्दांतील वृत्तसंख्यांविषयीं समजावें. ॥५॥

ग्लिति समानी ॥ ६ ॥

येथें 'पादस्यानुष्टुब् वक्त्रम्' ह्या पुढें येणाऱ्या सूत्रांतून अनुष्टुब् हें पद अपकर्षानें आणावें. सूत्रार्थ. ज्या वृत्तांत गलगल अशा गणक्रमानें अनुष्टुब् सारखे अष्टाक्षरी चार पाद संपतील त्या वृत्ताचें नांव समानी होय. म्हणजे

अष्टाक्षरी चार पाद असून त्यांत 'रामनाम पुण्यधाम' असा गुरुलघूंचा क्रम पाहिजे. ॥ ६ ॥

लिगति प्रमाणी ॥ ७ ॥

येथेंही पूर्वसूत्राप्रमाणेंच अनुष्टुब् हें पद अपकर्षानें आणावें. असो. ज्या वृत्तांत 'उमावरा शिवाहरा' असा लघुगुरूंचा क्रम असलेले अष्टाक्षरी चार पाद असतात त्याचें नांव प्रमाणी होय. ॥ ७ ॥

वितानमन्यत् ॥ ८ ॥

ह्या दोहोंपेक्षां कोणत्याही निराळ्या क्रमानें, अष्टाक्षरी चार पाद संपणारें जें वृत्त त्याचें नांव वितान होय. ॥ ८ ॥

पादस्यानुष्टुब् वक्त्रम् ॥ ९ ॥

हें अधिकारसूत्र असून त्यांतील 'पादस्य' ह्या पदाची अनुवृत्ति हा पांचवा अध्याय संपेपर्यंत जाते, व अनुष्टुब् वक्त्रम् ह्या पदांची अनुवृत्ति पदचतुरूर्ध्ववृत्तापर्यंत जते. ॥ ९ ॥

न प्रथमात्स्नौ ॥ १० ॥

ह्यापुढें सांगावयाच्या अष्टाक्षरपादाच्या वक्त्रजातींच्या वृत्तांमध्यें पहिल्या वर्णापुढें लागलीच सगण (।।S) व नगण (।।।) रचूं नये. ॥ १० ॥

द्वितीय चतुर्थयोरश्च ॥ ११ ॥

येथें सूत्रस्थ चकारानें पूर्वसूत्राची अनुवृत्ति होते म्हणून, दुसऱ्या व चौथ्या पादांत तर, प्रथमाक्षरापुढें स, न व रगणही (S।S) घालूं नये असा सूत्रार्थ होतो. अर्थात् वरचा केवळ स, न ह्यांचा निषेध पहिल्या व तिसऱ्या पादांनाच लागू आहे. ॥ ११ ॥

वान्यत् ॥ १२ ॥

वर सांगितलेले दोन निषेध वगळून इतर म य त वगैरे सहा गण पर्यायानें स्वेच्छेनें प्रथमाक्षरापुढें घालावे. समानीपासून पुढचे सर्व अक्षरच्छन्द असल्यानें, आतां ह्यापुढें मयरसतजभनलग हे पहिल्या अध्यायांत सांगितलेले प्रारंभींचे गणच घ्यावयाचे आहेत. आर्या वगैरे केवळ लौकिकवृत्तांत उपयोगी पडणाऱ्या चातुर्मात्रिक मात्रागणांची ह्यापुढें जरूर पडणार नाहीं. ॥ १२ ॥

यश्चतुर्थात् ॥ १३ ॥

पूर्वोक्ताशिवाय ह्या वक्त्रसंज्ञक वृत्तांत चौथ्या अक्षरापुढें यगण (।ऽऽ) अवश्य असावा. उदाहरण. 'वंदूं महेश्वरा आतां हिमालयसुतानाथा। चरणीं ठेविता माथा साधी जो सकला स्वार्था ॥ (स्वकृत) वगैरे वगैरे. मराठींतील ओवी वगैरे पद्यप्रकार ह्या वक्त्रापैकींच असून कांहीं फेरफारानें बनले आहेत. मात्र मराठींत संस्कृतांतील रसालंकार वगैरे इतर काव्यशोभा आणण्यास बराच प्रयास पडत असल्यानें, ती उणीव भरून काढण्याकरितां व कवितेचें स्वरूप साजरें करण्याकरितां संस्कृतानुष्टुभाप्रमाणें निरनुप्रास न लिहितां, साधारण वृत्तांतही निदान एखादातरी अनुप्रास (सारखा वर्ण) प्रत्येक पादाच्या शेवटीं घालण्याचा प्रघात पडला असावा असें वाटतें. ॥ १३ ॥

पथ्या युजो ज् ॥ १४ ॥

येथें 'चतुर्थात्' हें पद अनुवृत्तीनें येतें. असो. ह्या अष्टाक्षरी वक्त्रजातींत समपादांमध्यें (युजः, २,४,) चौथ्या अक्षरापुढें यगण नसून जगण असल्यास त्याचें नांव पथ्या होय. उदाहरणें वाङ्मयांत शोधावीं किंवा प्रस्तार (लघुगुरुविन्यास) मांडून त्याच्या साहाय्यानें नवीन रचावीं. ॥ १४ ॥

विपरीतैकीयम् ॥ १५ ॥

कित्येकांच्या मतानें, वरच्या उलट म्हणजे विषमपदांत (१।३) चौथ्या अक्षरापुढें जगण असल्यास तीच पथ्या होते. ॥ १५ ॥

चपलाऽयुजो न् ॥ १६ ॥

येथें 'चतुर्थात्' ह्या पदाची अनुवृत्ति करून सूत्रार्थ. जेव्हां विषमपादांत चौथ्या अक्षरापुढें नगण असून समपादांत चतुर्थवर्णापुढें पूर्वोक्त सामान्य लक्षणानें आलेला यगणच असतो, तेव्हां त्या अनुष्टुब् वक्त्राचें नांव चपला होय. मागें आर्याभेदांतही चपला ही संज्ञा आली आहे. ॥ १६ ॥

विपुला युग्लः सप्तमः ॥ १७ ॥

हें सूत्र पुढें येणाऱ्या पदचतुरूर्ध्ववृत्तापर्यन्त अनुवृत्तीनें जाणारें अधिकारसूत्रही आहे. यश्चतुर्थात् ह्या सूत्रानें यगण सामान्यतः सांगितला आहे. त्याचा हा अपवाद आहे. सूत्रार्थ. ज्या वक्त्रांत समपादांत सातवा वर्ण लच (।) असतो त्याचें नांव विपुला होय. हें मागें गेलेल्या पथ्येच्या लक्षणांतच अन्तर्भूत होत आहे; तथापि त्या वृत्ताचेंच हें प्रकारविशेषांत प्रसिद्ध नामान्तर आहे असें समजावें; शिवाय ह्यापुढच्या सूत्रांतूनही ह्याची अनुवृत्ति आवश्यक असल्यामुळेंही येथील विपुला हें पद व्यर्थ नाहीं. मागें आर्याप्रकरणांतही विपुला नाम गेलें आहे. ॥ १७ ॥

सर्वतः सैतवस्य ॥ १८ ॥

सैतव ऋषीच्या मतानें सर्वच (सम व विषम) पादांमध्यें सातवा वर्ण लघु असेल ती विपुला होय. ॥ १८ ॥

भ्रौ न्तौ च ॥ १९ ॥

येथें मागच्या निरनिराळ्या सूत्रांतून 'अयुजः' 'विपुला युग्लः

सप्तमः ' व ' चतुर्थात् ' ह्या पदांची अनुवृत्ति करावी. सूत्रार्थः—विषमपादांमध्यें, चतुर्थवर्णापुढें सामान्यतः प्राप्त होणाऱ्या यगणाचा बाध करून, भ, र, न, त ह्या चोहोंपैकीं कोणता तरी गण असेल व समपादांत सातवें अक्षर लघुरूप अवश्य असेल तर तेंहि वक्त्र विपुलासंज्ञक होय. ह्या सर्व वृत्तांचीं उदाहरणें, सर्व इतिहासपुराणांतील व काव्यग्रन्थांतील अनुष्टुप् छन्दांत हजारों भरलीं आहेत. ह्या विपुलांचे विकल्प व मिश्रप्रकार नांवाप्रमाणेंच असंख्य असून त्यांचे प्रयोगही फार आहेत. त्यांचा निर्देश सामान्यतः अनुष्टुप् ह्या नांवानेंच करितात. सर्व विपुलांत चौथा वर्ण गुरु असतो, असा सामान्य नियम दिसतो. ॥ १९ ॥

प्रतिपादं चतुर्वृध्द्या पदचतुरूर्ध्वम् ॥ २० ॥

अनुष्टुप् वृत्ताच्या पुढच्या पुढच्या पादांतून क्रमानें चार चार अक्षरें वाढत गेलीं असतां त्या वृत्ताचें नांव, पदचतुरूर्ध्व असतें. म्हणजे प्रथम पादांत आठ वर्ण, दुसऱ्यांत बारा, तिसऱ्यांत सोळा, व चौथ्यांत वीस वर्ण असतात असें जाणावें. ह्या सूत्रांत विशेषबोधक पद कांहींच नसल्यामुळें लघुगुरूंचा नियम कांहीं नाहीं. ॥ २० ॥

गावन्त आपीडः ॥ २१ ॥

येथें पादस्य हें पद सामान्याधिकारानें प्राप्त होतें. असो, वरच्या सूत्राप्रमाणें वाढते पाद असून प्रत्येक पादाच्या शेवटीं दोन गुरुवर्ण असल्यास त्या वृत्ताचें नांव आपीड होय. ह्यामध्यें अन्तीं दोन गुरूंचा नियम करून त्यापूर्वींचीं इतर सर्व अक्षरें लघु असावीं असें सूचित केलें आहे. म्हणून, 'अनुदिन भज रामा, सकल विबुधमुनिसुखधामा,' अशाप्रकारचे चरण रचावे. ॥ २१ ॥

आदौ चेत्प्रत्यापीडः ॥ २२ ॥

वरच्याप्रमाणेंच चार चार अक्षरांनीं वाढते पाद असून त्यांत शेवटीं दोन गुरु न घालतां, प्रत्येक पादाच्या प्रारंभींच दोन दोन गुरुवर्ण असून पुढचे सर्व लघु घातले असतील तर त्या वृत्ताचें नांव प्रत्यापीड होय. उदाहरण, 'सेवा गुरुहरिहर, नाशा सम कलुषतिमिरभर'। असे पाद रचावे. ॥ २२ ॥

प्रत्यापीडो गावादौ च ॥ २३ ॥

येथें चकारानें 'अन्ते' ह्या पदाची अनुवृत्ति होते. सूत्रार्थः— वरच्या प्रमाणेंच वाढते पाद असून त्याच्या आरंभीं व शेवटीं दोन दोन गुरु व मध्यें सर्व लघुवर्ण अशी स्थिति असल्यास त्या वृत्ताचें नांवहि प्रत्यापीडच होय. जसें, 'वंदा सतत मुकुंदा' अशा प्रकारचे पाद रचावे. असो, ह्याप्रमाणें प्रत्यापीड दोन प्रकारचा आहे. ॥ २३ ॥

प्रथमस्य विपर्यासे मञ्जरी लवल्यमृतधाराः ॥ २४ ॥

येथें आपीडपदाचें ग्रहण निवृत्त झाल्यानें (आपीड=तुरा) दोन गुरुशिवाय इतर सर्व लघुच पाहिजेत हाहि नियम गेला. तथापि सामान्य वाढत्या पादांच्या पदचतुरूर्ध्वाची अनुवृत्ति आहेच. सूत्रार्थः–पदचतुरूर्ध्वाच्या पहिल्या पादाची दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या पादाशीं उलटापालट केल्यास तीं वृत्तें क्रमानें मञ्जरी, लवली व अमृतधारा ह्या नांवांचीं होतील. म्हणजे पदचतुरूर्ध्वाचा पहिला पाद द्वादशाक्षरी व दुसरा अष्टाक्षरी रचल्यास त्याचें नांव मञ्जरी. पहिला पाद सोळा अक्षरांचा व तिसरा अष्टाक्षरी केल्यास तिचें नांव लवली व पहिला पाद वीस अक्षरांचा व चौथा आठ अक्षरांचा रचल्यास तिचें नांव अमृतधारा असें जाणावें. ॥ २४ ॥

उद्गतामेकतः स्जौ स्लौ, न्सौ ज्गौ, भ्नौ ज्लौग्, स्जौ स्जौग् ॥ २५ ॥

येथें 'पादः' ह्या सामान्याधिकाराची अनुवृत्ति आहे. सूत्रार्थः—जिच्या चारी पादांत अनुक्रमानें; सजसल, नसजग, भनजलग आणि सजसजग, असे गण येतात ती उद्गता असें जाणावें. म्हणजे पहिल्या दोन पादांत दहा दहा अक्षरें, तिसऱ्यांत अकरा व चौथ्यांत तेरा अक्षरें भरतात. 'एकतः' ह्या सूत्रस्थपदानें पहिला चरण दुसऱ्याशीं जोडून म्हणावा असा अर्थ होतो. ॥ २५ ॥

तृतीयस्य सौरभकं नौं भगौ ॥ २६ ॥

तिसऱ्या पादाचे चरण भ न ज ल ग नसून र न भ ग हे असले व इतर चरण उद्गतेप्रमाणेंच असले तर तें सौरभक नांवाचें वृत्त होतें. ॥ २६ ॥

ललितं नौ सौ ॥ २७ ॥

येथें 'तृतीयस्य' हें पद अनुवृत्त आहे. सूत्रार्थः—उद्गतेच्याच तृतीयपादांत न न स स असे गण असून इतर तसेच असल्यास तें ललित नांवाचें वृत्त होतें. ॥ २७ ॥

उपस्थितप्रचुपितं पृथगाद्यं स्मौ ज्भौ गौ, स्नौ ज्रौग् नौस्, नौन् ज्यौ ॥ २८ ॥

ज्या वृत्ताच्या चारी पादांत अनुक्रमानें, स म ज भ ग ग, स न ज र ग, न न स आणि न न न ज य असे गण असून पहिला चरण उद्गतेप्रमाणें दुसऱ्या चरणाला जोडून म्हणत नाहींत, तें उपस्थित प्रचुपित ह्या नांवाचें वृत्त होतें ॥ २८ ॥

वर्धमानं नौ स्नौ न्सौ ॥ २९ ॥

येथें मागून तृतीयस्य ह्या पदाची अनुवृत्ति करून सूत्रार्थ देतों. उपस्थितप्रचुपिताच्याच तिसऱ्या पादांत न न स ऐवजीं न न स न न स असे सहा गण असल्यास त्या वृत्ताचें नांव वर्धमान होय. ॥ २९ ॥

शुद्धविराड्ऋषभं त्जाः ॥ ३० ॥

उपस्थितप्रचुपिताच्याच तिसऱ्या पादांत न न स नसून, त ज र असे गण असतील तर त्या वृत्ताचें नांव शुद्धविराड्ऋषभ असें होतें. ॥ ३० ॥

अर्धे ॥ ३१ ॥

ह्यापूर्वीं पादांतून कमीजास्त अक्षरें असलेलीं कांहीं विषमवृत्तें सांगितलीं. आतां नियमित अक्षरांचीं वृत्तें सांगण्यास प्रारंभ करतात. सूत्रार्थः—आतां ह्यापुढें जे गण सांगितले जातील ते पद्याच्या अर्धांत म्हणजे दोन दोन पादांत मिळून समजावे. एकेका पादाचे नाहींत. पद्याचें उत्तरार्धही पूर्वार्धाप्रमाणेंच असतें. 'अर्धे' हा अर्धसमवृत्तांचा अधिकार ह्यापुढें हा पांचवा अध्याय संपेपर्यंत आहे. ॥ ३१ ॥

उपचित्रकं सौ स्लौग् भौ भ्गौग् ॥ ३२ ॥

ज्याच्या पहिल्या पादांत स स स ल ग व दुसऱ्या पादांत भ भ भ ग ग असे गण एका पद्यार्धांत असतात, व दुसरें अर्धही ह्याच क्रमाचें असतें, तें उपचित्रक वृत्त होय. जसें, 'हरिच्या चरणाब्जयुगीं सदा, हो रत मानव ! शाश्वतशोधा।' अशाप्रकारचीं अर्धें रचावीं ॥ ३२ ॥

द्रुतमध्या भौ भ्गौग्, न्जौ ज्यौ ॥ ३३ ॥

जिच्या एका अर्धांत, दोन पादांत अनुक्रमानें, भ भ भ ग ग आणि न ज ज य असे गण असतात ती द्रुतमध्या होय. दुसऱ्या पादाच्या प्रारंभीं चार लघुवर्ण असल्यानें मध्यभाग द्रुत म्हणजे जलद उच्चारला जातो, अशा ह्या रीतीनें नांवाला अन्वर्थताही दिसते. ॥ ३३ ॥

वेगवती सौ स्गौ, भौ भ्गौग् ॥ ३४ ॥

जिच्या पहिल्या पादांत, स स स ग व दुसऱ्या पादांत भ भ भ ग ग अशीं अर्धें असतात ती वेगवती होय. ॥ ३४ ॥

भद्रविराट् त्जौ गौं, म्सौ ज्गौ ग् ॥ ३५ ॥

ज्या वृत्ताच्या एकेका अर्धात्, तजरग आणि मसजगग असे गण क्रमानें दोन्ही पादांत येतात तें, भद्रविराट् ह्या नांवाचें वृत्त होय. ॥ ३५ ॥

केतुमती स्जौ स्गौ, भ्रौ न्गौ ग् ॥ ३६ ॥

जिच्या अर्धांत अनुक्रमानें, दोन्ही पादांमध्यें सजसग व भरनगग असे गण असतात ती केतुमती होय. ॥ ३६ ॥

आख्यानिकी तौ ज्गौग्, ज्तौ ज्गौग् ॥ ३७ ॥

जिच्या एकेका अर्धांत, ततजगग व जतजगग असे गण क्रमानें दोन्ही पादांत असतात तिचें नांव आख्यानिकी समजावें. ॥ ३७ ॥

विपरीताख्यानिकी ज्तौ ज्गौग्, तौ ज्गौग् ॥ ३८ ॥

जिच्या अर्धाच्या दोन्ही पादांत अनुक्रमानें जतजगग व ततजगग असे गण असतात ती विपरीताख्यानिकी जाणावी. ॥ ३८ ॥

हरिणप्लुता सौ स्लौग् न्भौ भ्रौ ॥ ३९ ॥

ज्या वृत्ताच्या अर्धाच्या दोन्ही पादांत, अनुक्रमानें सससलग आणि नभभर असे गण असतात त्याचें नांव हरिणप्लुता होय. हरिणाच्या उड्या मारीत धांवण्याप्रमाणें गणाक्षरांत उतार व चढ भासत असल्यामुळें हें नांव अन्वर्थकही आहे. ॥ ३९ ॥

अपरवक्त्रं नौर्लौग्, न्जौ ज्रौ ॥ ४० ॥

ज्याच्या अर्धाच्या दोन्ही पादांत अनुक्रमानें ननरलग आणि नजजर असे गण असतात त्याचें नांव अपरवक्त्र होय. ॥ ४० ॥

पुष्पिताग्रा नौर्यौ न्जौ जौग् ॥ ४१ ॥

जिच्या अर्धाच्या दोन्ही पादांत क्रमानें ननरय आणि नजजरग हे गण व उत्तरार्धही तसेंच असतें ती पुष्पिताग्रा होय. ॥ ४१ ॥

यव्रमती जौं जौं ज्रौ ज्रौग् ॥ ४२ ॥

जिच्या अर्धांत रजरज आणि जरजरग असे गण अनुक्रमानें दोन्ही पादांत असतात तिचें नांव यवमती समजावें. ॥ ४२ ॥

शिखैकोनत्रिंशदेकत्रिंशदन्ते ग् ॥ ४३ ॥

जिच्या पहिल्या पादांत प्रथम अठ्ठावीस लघु व एकोणतिसावा एकच गुरु असून दुसऱ्या पादांत प्रथम तीस लघु व शेवटीं एकतिसावा एकच गुरु असतो. अशा रीतीनें साठ वर्णांचें एक अर्ध असून उत्तरार्धही असेंच असतें, तिचें नांव शिखा होय. शेवटचा एकच गुरू हा शिखेच्या (शेंडीच्या) गांठीप्रमाणेंच भासतो. मागें चौथ्या अध्यायाच्या उपान्त्यसूत्रांत चूलिकावृत्त सांगितलें तिच्या दोन्ही अर्धांत क्रमानें एकोणतीस व एकतीस मात्रा सांगितल्या आहेत व येथें मात्रा नसून अक्षरें सांगितलीं आहेत व तींही एकेका अर्धांत नसून एकेका पादांत आहेत हें लक्षांत धरावें.

खञ्जा महत्ययुजि इति ॥ ४४ ॥

वरच्या शिखेप्रमाणेंच सर्व रचना परंतु त्यांपैकीं पहिला व तिसरा (अयुज्) पाद मोठा म्हणजे एकतीस अक्षरांचा असून दुसरा व चौथा एकोणतीस अक्षरांचा अशी उलटापालट केल्यास त्या वृत्ताचें नांव खञ्जा होतें. शेवटच्या इति शब्दानें येथें पांचवा अध्याय संपला हें सुचविलें. ॥ ४४ ॥

अध्याय सहावा.

यतिर्विच्छेदः ॥ १ ॥

'विच्छिद्यतेऽत्रेति विच्छेदः' म्हणजे पठणास सुलभ जावें म्हणून जेथें पदपाठ विघटित होतो त्या वृत्ताच्या स्थानास यति म्हणतात. अर्थात् वृत्त-पठन सुकर व्हावें व ऐकण्यासहि बरें लागावें म्हणून त्याच्यामध्यें समुद्रादि (४) अक्षरांवर ज्या किंचित् थांबण्याच्या जागा ठरविलेल्या आहेत त्या यति होत. जेथें विशेष सांगितला नसेल तेथें पादाच्या शेवटींच यति जाणावा. सूत्रवचनाशिवायही, म्हणणारा आपल्या सोयीप्रमाणें मध्यें मध्यें यति करतो. ह्या यतिसंबंधीं सर्व सामान्य सिद्धान्त भट्टहलायुधाच्या छन्दो-वृत्तींत सविस्तर दिले आहेत. जरी ग्रन्थविस्तार होत आहे तथापि ते नियम नवीन काव्यरचनेस अत्यन्त उपयुक्त असल्यामुळें येथें सार्थ देतों. 'यतिः सर्वत्र पादान्ते श्लोकार्धे तु विशेषतः। समुद्रादिपदान्ते च व्यक्ता-व्यक्तविभक्तिके ॥ १ ॥ क्वचित्तु पदमध्येऽपि समुद्रादौ यतिर्भवेत्। यदि पूर्वापरौ भागौ न स्यातामेकवर्णकौ ॥ २ ॥ पूर्वान्तवत्स्वरसंधौ क्वचिदेव परादिवत्। एष्टव्यो यतिचिन्तायां यणादेशः परादिवत् ॥ ३ ॥ नित्यं प्राक्प-दसंबद्धाश्चादयः प्राक्पदान्तवत्। परेण नित्यसंबद्धाः प्रादयश्च परादिवत् ॥४॥ ह्या कारिकांचे अर्थ अनुक्रमानें देतों. सर्व श्लोकांच्या पादान्तीं यति म्हणजे विसाव्याची जागा अवश्य आहे; श्लोकांचे अर्ध संपल्यावर तर, विशेष म्हणजे विभक्तिस्वरूप स्पष्ट दिसणारा पूर्ण यति करावा. तसेंच पादमध्यांत समुद्र, ऋतु वगैरे सूत्रोक्त अक्षरांच्या शेवटींही यति करावा. मग त्यांतील विभक्ति स्पष्ट असो किंवा लुप्त असो, म्हणजे त्या अक्षरावर समासांतील पूर्वपदच संपत असलें तरी चालेल. अशा ठिकाणीं 'सुपो धातुप्रातिपदि-

कयोः' ह्या पाणिनीयसूत्रानें समासमध्यस्थविभक्तीचा लोप होत असल्यानें ती विभक्ति अव्यक्त असते. जसें, 'कश्चित्कान्ता–विरहगुरुणा स्वाधिकार-प्रमत्तः' ह्या मन्दाक्रान्तावृत्तांत चवथ्या अक्षरावर यति पाहिजे. परंतु ह्या उदाहरणांत कान्ताविरह ह्या समासापैकीं कान्ता हें पूर्वपदच म्हणजे अव्यक्त विभक्तिक पद यति-स्थानीं समाप्त झालें आहे; अशी स्थितिही चालते. पहिल्या व तिसऱ्या चरणाच्या शेवटींहि असला पदमध्यस्थ यति क्वचित् चालतो. परंतु अर्धान्तीं असा यति चालत नाहीं. तेथें विभक्ति व्यक्तच पाहिजे ॥ १ ॥ क्वचित्स्थळीं असमस्त अशा एका पदांतसुद्धां, समुद्रादि सूत्रोक्तवर्णावर व पहिल्या व तिसऱ्या पादाच्या शेवटीं यति होऊं शकतो. परंतु त्या पदाचे पूर्व व पर (पुढचा) भाग एकाक्षरी होतां उपयोगी नाहीं. जसें, 'वन्दू नारा-यणचरण ते भुक्तिमुक्तिप्रदाते' हाही मन्दाक्रान्ता-वृत्ताचाच पाद आहे व ह्यांत चौथ्या अक्षराच्या शेवटीं एका पदांतही यति केला आहे. कारण पदांतील पहिला भाग नारा व दुसरा भाग यण हे, एकवर्णी नाहींत म्हणून हा यति ठीक आहे. येथें यतिभंगाचा दोष येत नाहीं. येथेंच 'वन्दावे ई-श्वरचरण ते' असे रचल्यास यतिभंग होईल. कारण यतिस्थानींचा ई हा पहिला पदभाग, एकाक्षरी पडतो ॥२॥ यतींचा निश्चय ठरवितांना संधि (स्वरांचे जोड) हे पूर्वपदाचे अन्त्याव-यव ठरवावे. मात्र 'इको यणचि। ह्या पाणिनीय सूत्रानें होणारा यणादेश-रूपी संधि हा पुढच्या पदाचा पहिला अवयव समजावा. इ,उ,ऋ,ऌ हे स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ असून त्यांच्यापुढें तद्भिन्न स्वर आले असतां त्यांचे जागीं अनुक्रमानें य् व् र् ल् असे आदेश (बदली) होतात; असा 'इको यणचि' ह्या सूत्राचा अर्थ आहे. असो, नियमाचीं उदाहरणें देतों. 'वन्दा दुःखौषधि–हरिपदा भक्तविश्रामधामा' ह्या मन्दाक्रान्तेच्या चरणांत, दुःखौषधि ह्यांतला औ हा संधि, 'पूर्वान्तवत्स्वरसंधौ' ह्या

नियमानें पूर्वपदाचा अन्त्यावयव धरल्यानें, 'क्वचित्तु पदमध्येऽपि समुद्रादौ यतिर्भवेत्।' ह्या नियमानुसार यतिभंगाचा दोष येत नाहीं. 'वन्दा गौर्यङ्घ्रिसरसिरुहा भक्तविश्रामधामा।' असा पाद रचल्यास, 'एष्टव्यो यतिचिन्तायां यणादेशः परादिवत्।' ह्या नियमाप्रमाणें गौर्यङ्घ्रि हा यणादेश पुढच्या पदाचा आद्यावयव असून तो एकटाच (एकाक्षरी) यतिभागांत शिरला आहे, या कारणानें 'यदि पूर्वापरौ भागौ न स्यातामेकवर्णकौ' ही अट सांभाळली जात नाहीं. म्हणून यतिभंगाचा दोष येतो. ॥ ३ ॥ यतीचा निर्णय करणें असतां नेहमीं पूर्वपदाशीं चिकटून रहाणारे च, वा वगैरे शब्द पूर्वपदाचेच अन्त्यावयव समजावे आणि नेहमीं पुढच्याच पदाशीं संबद्ध असणारे प्र, निर्, आ वगैरे उपसर्ग पुढच्या पदाचे आद्यावयव समजावे. च, वा वगैरे शब्द व उपसर्ग ह्यांचे प्रयोग बहुधा संस्कृतांतच होत असल्यानें त्या चौथ्या कारिकेचीं उदाहरणें संस्कृतांतच रचून देतों. त्यावरून मराठींतील, 'हि' वगैरे पूर्वपदसंलग्न व प्र, सम् वगैरे परपदसंलग्न शब्दांविषयीं निर्णय करून घ्यावा. उदाहरण, 'मृतो मनुष्यो वा नागो, वा बभाषे युधिष्ठिरः' हें अनुष्टुपाचें अर्ध आहे. ह्यांतील दुसरा वा, हा संस्कृत भाषेच्या स्वभावाप्रमाणें मागल्या पदाचा अन्त्यावयव मानला पाहिजे; तो एकाक्षरी असून दुसऱ्या चरणांत शिरल्यामुळें यतिभंग झाला. 'मृतो नरो वा नागो वा' 'लभस्व बुद्धिं विद्यां च' असे अनुष्टुप् चरण रचल्यास निर्दोष होतील. 'अनेन वन्दनेन प्र-सन्नो भव महेश्वर' हेंही अनुष्टुप्चेंच अर्ध आहे. ह्यांत नित्य परपदसंबद्ध म्हणजे क्रियापदसंबद्ध असणारा 'प्र'हा उपसर्ग, चौथ्या कारिकेप्रमाणें पुढच्या पदाचा आद्यावयव मानिला पाहिजे, परंतु तो एकटाच पहिल्या चरणांत शिरल्यामुळें यतिभंग झाला. 'अनेन वन्दनेन त्वं प्रसन्नो भव शंकर' असें श्लोकार्ध रचलें तर तें निर्दोष होईल. 'गोविन्द आणि गोपाळ-हि गेले पुण्यपत्तनां' 'भावें

शरण जावे सं-सारतारक ईश्वरां' ह्या मराठी श्लोकार्धांतून, वरच्या नियमा-प्रमाणें यतिभंग होतात म्हणून अशी रचना करूं नये. आधुनिक पुष्कळ कवींना हे यतिनियम माहीत नसल्यामुळें ते भलत्याच ठिकाणीं यतिभंग करतात. तसेच कित्येक अनभिज्ञ टीकाकारही अज्ञानामुळें, यतिभंगाचे नसणारे दोषही, बिचाऱ्या कवींच्या माथीं मारतात. त्या दोघांनाही ह्या यतिविषयक प्रासंगिक विवरणापासून बराच फायदा होईल अशी आशा आहे. ह्या व सूत्रोक्त यतिकथनाशिवाय पद्य म्हणण्यास व ऐकण्यास सुखकारक असे अधिक यति (पदविश्राम) हीं मागच्या व पुढच्या वृत्तांतून व नवीन काल्पनिक वृत्तांतूनही, शिष्टसम्मत व परंपरागत असल्यास मानण्यास हरकत नाहीं. कारण हें वर्णन दिग्दर्शक आहे. निदान हें एवढें विवरण तरी लक्षांत ठेवावें. पुढच्या सूत्रांतून अनेक ठिकाणीं यत्यक्षरांचा निर्देश करायचा असल्यामुळें प्रारंभींच हें यतिलक्षणाचें सूत्र रचलें आहे. असो. मागच्या अध्यायांत वक्त्र वगैरे प्रसिद्ध विषमवृत्तें सांगितलीं. तशींच 'अर्धे' ह्या अधिकारापासून सुप्रसिद्ध अर्धसमवृत्तेंही सांगितलीं. आतां सूत्रकार गायत्रीछन्दापासून प्रारंभ करून, त्या त्या छन्दांचीं अन्तर्गत अशीं लोकप्रसिद्ध समवृत्तें सांगण्यास प्रारंभ करतात. पुढें आठव्या अध्यायांत येणाऱ्या प्रस्तारगणनेच्या दृष्टीनें पहातां, वृत्तांचा अन्तच लागण्यासारखा नाहीं. तथापि पूर्वाचार्यांच्या वेळीं प्रसिद्ध असलेलीं कांहीं थोडीं वृत्तें, दिग्दर्शक म्हणून पिङ्गलाचार्य सांगतात. वृत्तरत्नाकर वगैरे छन्दःसूत्रानंतरच्या ग्रन्थांतून, 'गुःश्रीः' 'गौ स्त्री' 'मो नारी' वगैरे एकाक्षरपादापासून पञ्चाक्षरपादापर्यन्तही कांहीं वृत्तें सांगितलीं आहेत. परन्तु छन्दःसूत्रकाराच्या वेळीं पञ्चाक्षरपादापर्यन्तचीं वृत्तें प्रचलित नसावीं, असें वाटतें. शिवाय वैदिक छन्दांचा प्रारंभ षडक्षर पादापासूनच होतो म्हणून त्यानें त्यांच्या अनुसारानें षडक्षरपादाच्या

गायत्रीछन्दापासूनच, लौकिकवृत्तांसही सुरवात केली असावी. असो, आतां गायत्रींतील प्रसिद्ध समवृत्त देतों. ॥ १ ॥

तनुमध्या त्यौ ॥ २ ॥

येथें 'पादः' हें पद सामान्याधिकारानें आणून सूत्रार्थ—ज्या वृत्ताच्या प्रत्येक पादांत तय (ऽऽ।, ।ऽऽ) असे गण येतात तें तनुमध्यावृत्त होय. उदाहरण, 'रामा रघुनाथा। पायीं तव माथा। पावें मज देवा। देईं पदसेवा ॥ १ ॥ (स्वकृत)। ह्या पुढच्या वृत्तांच्या उदाहरणांची ह्याप्रमाणेंच कल्पना करीत जावी.

ह्या वृत्ताप्रमाणेंच जेथें विशेष यतिनियम सांगितला नसेल तेथें सर्वत्र पादान्तीं मात्र अवश्य यति (विसावा) करावा असा सिद्धांत आहे. ॥ २ ॥

आतां सूत्रकार, सप्ताक्षर पादाच्या उष्णिक् छन्दांतील प्रसिद्ध वृत्त सांगतात.

कुमारललिता ज्सौ ग् ॥ ३ ॥

जिच्या पादांत, ज स ग (।ऽ।, ॥ऽ, ऽ) असे गण असतात तिचें नांव कुमारललिता होय. ॥ ३ ॥

ह्यापुढें अनुष्टुप् छन्दांतील प्रसिद्ध वृत्तें सांगतात.

माणवकाक्रीडतकं भ्तौ लगौ ॥ ४ ॥

ज्याच्या एकेका पादांत भ त ल ग असे गण असतात, त्या वृत्ताचें नांव माणवकाक्रीडतक होय. अर्वाचीन ग्रंथांत ह्याचें नांव माणवक असेंच आहे. ॥ ४ ॥

चित्रपदा भौ गौ ॥ ५ ॥

प्रत्येक पादांत, भ भ ग ग (ऽ॥, ऽ॥, ऽ, ऽ) असे गण येतात तिचें नांव चित्रपदा होय. ॥ ५ ॥

विद्युन्माला मौ गौ ॥ ६ ॥

जिच्या पादांत म म ग ग असे गण असतात ती विद्युन्माला जाणावी. (ऽऽऽ, ऽऽऽऽऽ,) ॥ ६ ॥

हंसरुतं म्नौ गौ ॥ ७ ॥

ज्याच्या पादांत, म न ग ग (ऽऽऽ, ।।।, ऽ, ऽ) असे गण येतात तें हंसरुत नांवाचें वृत्त जाणावें ॥ ७ ॥

आतां पुढें, नवाक्षरपादी बृहती छन्दांतील प्रसिद्ध वृत्तें येतील.

भुजगशिशुसृता नौ म् ॥ ८ ॥

जिच्या पादांत, न न म असे गण क्रमानें येतात, तिचें नांव भुजगशिशुसृता होय. सापाच्या शिशुप्रमाणें जिचें सृत म्हणजे चलन आहे हें लक्षण गण-क्रमांत दिसतें, म्हणून हें अन्वर्थ नांव आहे. भुजगशिशु प्रथम नीट सरळ कांहीं चालून नंतर वळवळत चालतो. (।।।, ।।।, ऽऽऽ). अर्थात् भुजगशिशुभृता हें अर्वाचीन ग्रंथांतील नांव अयोग्य दिसतें. ॥ ८ ॥

हलमुखी नौस् ॥ ९ ॥

जिचा एकेक पाद 'र न स' ह्या गणांनीं बनतो ती हलमुखी होय. जेथें जमेल तेथें नावांची अन्वर्थता शोधावी. ह्याच्या गणांचा लघुगुरुन्यास नांगर व जोखड यांसारखा भासतो. ॥ ९ ॥ आतां सूत्रकार, दशाक्षरपाद पङ्क्तिच्छन्दांतील सुप्रसिद्ध वृत्तें सांगतात.

शुद्धविराण् म्सौ ज्गौ ॥ १० ॥

म स ज ग हे गण, अनुक्रमानें पादांत असल्यास तें वृत्त शुद्धविराट् ह्या नांवाचें होतें. ॥ १० ॥

पणवो म्नौ य्गौ ॥ ११ ॥

प्रत्येक पादांत, म न य ग असे गण क्रमानें असल्यास त्या वृत्ताचें नांव पणव होय ॥ ११ ॥

रुक्मवती भ्मौ स्गौ ॥ १२ ॥

जिच्या पादांमध्यें, भ म स ग असे गण क्रमानें असतात ती रुक्म-वती होय. ॥ १२ ॥

मयूरसारिणी जौं गौं ॥ १३ ॥

जिच्या पादांत अनुक्रमानें रज रग हे गण येतात ती मयूरसारिणी समजावी. ॥ १३ ॥

मत्ता म्भौ स्गौ ॥ १४ ॥

पादामध्यें म भ स ग असे गण आल्यास त्या वृत्ताचें नांव मत्ता असें जाणावें. ॥ १४ ॥

उपस्थिता त्जौ ज्गौ ॥ १५ ॥

जिच्या पादांत त ज ज ग असा गणक्रम असतो तिचें नांव उपस्थिता होय. ॥ १५ ॥

आतां ह्यापुढें, अकरा अक्षरें चरणांत असणाऱ्या त्रिष्टुप्छन्दांतलीं प्रसिद्ध वृत्तें सांगण्यास प्रारंभ करतात.

इन्द्रवज्रा तौ ज्गौग् ॥ १६ ॥

प्रत्येक पादांत त त ज ग ग असा गणक्रम असल्यास तें इन्द्रवज्रा नामक वृत्त जाणावें. ॥ १६ ॥

उपेन्द्रवज्रा ज्तौ ज्गौग् ॥ १७ ॥

प्रत्येक पादांत ज त ज ग ग असे गण असतात तें उपेन्द्रवज्रावृत्त जाणावें. ॥ १७ ॥

आद्यन्तावुपजातयः ॥ १८ ॥

इन्द्रवज्रा व उपेन्द्रवज्रा ह्यांच्या पादांचें मिश्रण करून चारी पाद रचल्यास त्या वृत्ताचें नांव उपजाति होय. ह्या समवृत्ताच्या प्रकरणांत उपजाति हें विषमवृत्त द्यावयाचें कारण लाघव होय. येथें लाघव म्हणजे थोडक्या ग्रन्थांत सूत्रें लिहावयाची सोय जाणावी. असो, वरच्या मिश्रणाचे एकंदर प्रकार प्रस्तारांनीं चौदा संभवतात. विद्वानांना मौज वाटेल म्हणून ते प्रस्तारप्रकार येथें देतो. 'इइइइ, उइइइ, इउइइ, उउइइ, इइउइ, उइउइ, इउउइ, उउउइ, इइइउ, उइइउ, इउइउ, उउइउ, इइउउ, उइउउ, इउउउ, उउउउ' हा इ उ चा प्रस्तार आहे. इ म्हणजे इन्द्रवज्रेचा पाद व उ म्हणजे उपेन्द्रवज्रेचा पाद होय. वरच्या प्रस्तारापैकीं पहिला व शेवटचा प्रकार, अनुक्रमानें इन्द्रवज्रा व उपेन्द्रवज्रा हीं पूर्वोक्त समवृत्तेंच असल्यानें ते दोन सोडून मधले उरलेले चौदा मिश्रप्रकार त्या उपजाति जाणाव्या. कोणी लोक हें सूत्र उपलक्षण म्हणजे दिग्दर्शक मानून, किंचित् भेद असलेल्या कोणत्याहि दोन वृत्तांच्या मिश्रणालाही उपजाति म्हणतात. त्यांच्या मतानें वंशस्थ व इन्द्रवंशा ह्या वृत्तांच्या मिश्रणानें व वातोर्मी आणि शालिनी ह्यांच्या मिश्रणानेंही वरीलप्रमाणेंच चौदा चौदा उपजाति होतील. अशाच दुसऱ्याही कांहीं वृत्तांच्या उपजाति जमतील. त्यांचा शोध करावा. ॥ १८ ॥

दोधकं भौ भ्गौग् ॥ १९ ॥

प्रत्येक चरणांत भ भ भ ग ग असे गण असतात, तें दोधकवृत्त होय. ॥ १९ ॥

शालिनी मतौत्गौ ग् समुद्र ऋषयः ॥ २० ॥

जिचा पाद म त त ग ग ह्या गणांनीं युक्त असून समुद्र म्हणजे चार

व त्यापुढें ऋषि म्हणजे सात ह्या अक्षरांवर यति (विश्राम) असतो ती शालिनी होय. ॥ २० ॥

वातोर्मी म्भौ त्गौग् ॥ २१ ॥

येथें वरून 'समुद्रऋषयः' हीं पदें आणून सूत्रार्थ देतों. जिच्या पादांत म भ त ग ग असा गणक्रम असून शालिनीप्रमाणेंच चार व नंतर सात अक्षरांनीं यति असतो तें वृत्त वातोर्मीसंज्ञक होय. ॥ २१ ॥

भ्रमरविलसिता म्भौ न्लौग् ॥ २२ ॥

येथेंही 'समुद्रऋषयः' ह्यांची अनुवृत्ति आहे. जिच्या पादांत म भ न ल ग असा गणक्रम असून चार व त्यांपुढें सात अक्षरांनीं यति असतो ती भ्रमरविलसिता होय. ॥ २२ ॥

रथोद्धता रौ लौग् ॥ २३ ॥

एकेका पादांत, क्रमानें र न र ल ग असा गणक्रम असल्यास तिचें नांव रथोद्धता होय. ॥ २३ ॥

स्वागता रौ भ्गौग् ॥ २४ ॥

प्रत्येक चरणांत र न भ ग ग असे गण असल्यास ती स्वागता जाणावी. ॥ २४ ॥

वृन्ता नौ स्गौग् ॥ २५ ॥

पादांत न न स ग ग असे गण असल्यास तें वृन्तानामक वृत्त जाणावें. वृन्त म्हणजे फुलाचा देठ. तसा अक्षरविन्यास भासतो. येथें मण्डूकप्लुतीनें (बेडकाच्या उडीची गति) 'समुद्रऋषयः' ह्यांची अनुवृत्ति आणून चार व सात अक्षरांनीं यति करण्याचा संप्रदाय आहे. म्हणजे 'रघुपति–पदयुगला वंदा' असें चरण रचावें. ॥ २५ ॥

श्येनी जौं लौंग् ॥ २६ ॥

जिच्या पादांत अनुक्रमानें, र ज र ल ग असे गण येतात ती श्येनी होय ॥ २६ ॥

विलासिनी ज्रौ ज्गौग् ॥ २७ ॥

चरणांमध्यें ज र ज ग ग असा गणक्रम असल्यास तें विलासिनी नांवाचें वृत्त जाणावें. ॥ २७ ॥

जगती ॥ २८ ॥

हें अधिकारसूत्र असून ह्यापुढें हा सहावा अध्याय संपेपर्यंत ह्याचा अधिकार आहे. अर्थात् ह्यापुढचीं वृत्तें जगतीछन्दांतील म्हणजे द्वादशाक्षरपादाचीं जाणावीं.

'तोटकं सः' वगैरे पुढें दिलेल्या कांहीं सूत्रांत एकच गणाचा निर्देश असल्यानें गणाक्षरें मोजून वृत्ताचा छन्द ठरवितां येणार नाहीं म्हणून येथें हा विशेषाधिकार सांगितला आहे. ॥ २८ ॥

वंशस्था ज्तौ ज्रौ ॥ २९ ॥

जिच्या पादांत ज त ज र असा गणक्रम असतो ती वंशस्था जाणावी. सूत्रानंतरच्या ग्रन्थांतून ह्याचेंच नांव वंशस्थविल किंवा वंशस्थ असें आढळतें. ॥ २९ ॥

इन्द्रवंशा तौ ज्रौ ॥ ३० ॥

प्रत्येक चरणांत त त ज र असे गण असतात तें इन्द्रवंशा वृत्त होय. ॥ ३० ॥

द्रुतविलंबितं नभौ भ्रौ ॥ ३१ ॥

ज्याच्या पादांत न भ भ र असे गण क्रमानें येतात तें द्रुतविलंबितवृत्त

जाणावें. पठनांत प्रथम द्रुति (घाई) व नंतर विलंब भासत असल्यानें हें नांव सार्थ आहे. ॥ ३१ ॥

तोटकं सः ॥ ३२ ॥

ह्या जगती छन्दाच्या पादांत सर्वच म्हणजे चारी सगणच असतात, तें तोटकवृत्त होय. ॥ ३२ ॥

पुटो नौ म्यौ वसुसमुद्राः ॥ ३३ ॥

ज्याच्या पादांत न न म य असे गण क्रमानें असून वसु म्हणजे आठ व नंतर चार अक्षरांनीं यति असतो त्याचें नांव पुट होय. ॥ ३३ ॥

जलोद्धतगति ज्सौ ज्सौ रसर्तवः ॥ ३४ ॥

जिच्या पादांत जसजस असे गण असून सहा सहा अक्षरांनीं यति असतो तिचें नांव जलोद्धतगति समजावें. ॥ ३४ ॥

ततं नौ म्रौ ॥ ३५ ॥

चरणामध्यें न न म र असा गणक्रम असल्यास त्या वृत्ताचें नांव तत होय. ॥ ३५ ॥

कुसुमविचित्रा न्यौ न्यौ ॥ ३६ ॥

जिच्या पादांत नय नय असे गण असतात ती कुसुमविचित्रा होय. ॥ ३६ ॥

चञ्चलाक्षिका नौ रौ ॥ ३७ ॥

पादांमध्यें न ग र र असे गण असल्यास तिचें नांव चञ्चलाक्षिका होय. ॥ ३७ ॥

भुजङ्गप्रयातं यः ॥ ३८ ॥

ज्या जगतीच्या पादांत सर्व म्हणजे चारी यगणच असतात तें

भुजङ्गप्रयात वृत्त होय. बहुतेक सुप्रसिद्ध रामदासी श्लोक ह्या वृत्ताचे आहेत. भुजङ्गप्रयात म्हणजे सापाचें गमन; त्याप्रमाणें आकुंचन व प्रसरण अक्षरविन्यासांत भासतें म्हणून हें नांव अन्वर्थक आहे. ॥ ३८ ॥

स्रग्विणी रः ॥ ३९ ॥

जिच्या पादांत सर्व म्हणजे चारी रगणच असतात ती स्रग्विणी होय. ॥ ३९ ॥

प्रमिताक्षरा स्जौ सौ ॥ ४० ॥

स ज स स असे गण चारी पादांत असल्यास तिचें नांव प्रमिताक्षरा होय. ॥ ४० ॥

कान्तोत्पीडा भ्मौ स्मौ ॥ ४१ ॥

चरणांत भ म स म असे गण असल्यास ती कान्तोत्पीडा होय. ॥ ४१ ॥

वैश्वदेवी मौ याविन्द्रियऋषयः ॥ ४२ ॥

पदांत म म य य असे गण असून पांच व सात अक्षरांनीं यति असल्यास त्या वृत्ताचें नांव वैश्वदेवी असतें. इंद्रियें पांच असून आदिऋषि सात हें सुप्रसिद्धच आहे. ॥ ४२ ॥

वाहिनी त्मौ म्यावृषि कामशराः ॥ ४३ ॥

चरणांत त म म य असे गण असून सात व नंतर पांच (कामशर) अक्षरांनीं यति असतो तिचें नांव वाहिनी होय. 'अरविन्दमशोकं च चूतंच नवमल्लिका । नीलोत्पलं च पञ्चैते पञ्चबाणस्य सायकाः ॥' हे पांच कामशर पुराणप्रसिद्ध असल्यानें, कामशर म्हणजे पांच असा अर्थ होतो. ॥ ४३ ॥

नवमालिनी न्जौ भ्याविति ॥ ४४ ॥

ज्याच्या चरणांत न ज भ य असे गण असतात त्या वृत्ताचें नांव नवमालिनी जाणावें. शेवटच्या इति शब्दानें येथें सहावा अध्याय संपला हें बोधित केलें. ॥ ४४ ॥

अध्याय सातवा.

आतां ह्या अध्यायांत त्रयोदशाक्षर पादाच्या अतिजगती छन्दापासून सव्वीस अक्षरें पादांत असणाऱ्या उत्कृतिपर्यन्त असलेल्या छन्दांमधील प्रसिद्ध वृत्तें सांगावयाचीं आहेत. त्यांपैकीं अतिजगती, शर्करी, अतिशर्करी, अष्टि, अत्यष्टि, धृति आणि अतिधृति हीं सात छन्दें, अक्षरसंख्येनें वैदिक छन्दांचें अतिक्रमण करतात म्हणून ह्यांना अतिच्छन्दस् असें म्हणतात व त्या पुढच्या सात कृतिसंज्ञक जाणाव्या. कारण त्यांच्या नांवांत कृति हा शब्द आहे. आतां प्रथम त्रयोदशाक्षरी अतिजगतीपासून सुरुवात करतात.

प्रहर्षिणी म्रौ ज्रौग् त्रिकदशकौ ॥ १ ॥

प्रत्येक पादांत म र ज र ग असे गण असून तीन व दहा अक्षरांनीं यति असतात त्या वृत्ताचें नांव प्रहर्षिणी असतें. जसें, 'शोभा ये, स्मितवदनें प्रहर्षिणीला' असे चरण रचावे. ॥ १ ॥

रुचिरा ज्भौ स्जौग् ॥ २ ॥

रुचिरावृत्तांत ज भ स ज ग असे गण प्रत्येक पादांत असून चार आणि नऊ अक्षरांनीं यति असतो. ॥ २ ॥

मत्तमयूरं म्तौ य्सौग् समुद्र नवकौ ॥ ३ ॥

चरणांमध्यें म त य स ग असे गण क्रमानें असून चार व नऊ अक्षरांनीं यति असल्यास तें मत्तमयूर नांवाचें वृत्त असतें. मराठींत ह्याला मत्तमयूरी असें म्हणतात. श्रीशंकराचार्यांच्या सुप्रसिद्ध हरिमीडे स्तोत्राचें हें वृत्त आहे. ॥ ३ ॥

गौरी नौ न्सौग् ॥ ४ ॥

जिच्या पादांत न न न स ग असे गण असतात तिचें नांव गौरी होय. ॥ ४ ॥

येथून पुढें चौदा अक्षरांचे पाद असणाऱ्या शर्करीछन्दांतील वृत्तें सांगतात. शर्करीलाच ग्रन्थान्तरांत शक्करी असें म्हणतात.

असंबाधा म्तौ न्सौ गाविन्द्रियनवकौ ॥ ५ ॥

असंबाधा वृत्ताच्या पादांत, म त न स ग असे गण असून पांच (इन्द्रिय) व नंतर नऊ अक्षरांनीं यति असतो. ॥ ५ ॥

अपराजिता नौ सौं ल्गौ स्वरऋषयः ॥ ६ ॥

अपराजिता वृत्ताच्या पादांत न न र स ल ग असा गणक्रम असून सात सात अक्षरांनीं यति असतात. ॥ ६ ॥

प्रहरणकलिता नौ भ्नौ ल्गौ च ॥ ७ ॥

येथें चकारानें ' स्वरऋषयः ' ह्या पदाची अनुवृत्ति आहे म्हणून, प्रहरणकलिता वृत्तांत न न भ न ल ग असे गण असून सात सात अक्षरांनीं यति असतो असा सूत्रार्थ झाला. ॥ ७ ॥

वसन्ततिलका त्भौ जौ गौ ॥ ८ ॥

वसन्ततिलका वृत्ताच्या प्रत्येक चरणांत, त भ ज ज ग ग असे गण असतात. ॥ ८ ॥

सिंहोन्नता काश्यपस्य ॥ ९ ॥

काश्यप आचार्यांच्या मतानें, पूर्वोक्त वृत्ताचें नांव सिंहोन्नता आहे. ॥ ९ ॥

उद्धर्षिणी सैतवस्य ॥ १० ॥

सैतव आचार्यांच्या मतानें वसन्ततिलकेचेंच नांव उद्धर्षिणी असें आहे. ॥ १० ॥

आतां पंचदशाक्षरी अतिशर्करींतील प्रसिद्ध वृत्तें सांगतात.

चन्द्रावर्ता नौ नौ स् ॥ ११ ॥

चन्द्रावर्तेच्या पादांत न न न न स असे गण असतात. जरी सूत्रांत विशेष सांगितला नाहीं तथापि ह्या वृत्तांत सात व आठ अक्षरांनीं यति करण्याचा पूर्वाचार्यांचा संप्रदाय आहे. ॥ ११ ॥

मालर्तुनवकौ चेत् ॥ १२ ॥

चन्द्रावर्तेंतच सहा व नऊ अक्षरांनीं यति असल्यास त्या वृत्ताचें नांव माला असतें. जसें, 'स्मर अनुदिन मुररिपुपद मनुजा' असें मालेचे चरण असतात. ॥ १२ ॥

मणिगुणनिकरो वस्वृषयः ॥ १३ ॥

त्याच चंद्रावर्तावृत्तांत आठ व सात अक्षरांनीं यति असल्यास त्या वृत्ताचें नांव मणिगुणनिकर होतें. ॥ १३ ॥

मालिनी नौ म्यौ य् ॥ १४ ॥

येथें 'वस्वृषयः' हें पद अनुवृत्तीनें येतें. जिच्या पादांत न न म य य असे गण असून आठ व सात अक्षरांनीं यति असतो तें मालिनीवृत्त जाणावें ॥ १४ ॥

आतां षोडशाक्षरी पाद असलेल्या अष्टिछन्दांतील प्रसिद्ध वृत्तें सांगतात.

ऋषभगजविलसितं भ्रौ नौ न्गौ स्वरनवकौ ॥ १५ ॥

ज्याच्या पादांत भ र न न न ग असे गण असून सात व नऊ अक्षरांनीं यति असतात त्या वृत्ताचें नांव ऋषभगजविलसित जाणावें ॥ १५ ॥
ह्यापुढें सतरा अक्षरांचा पाद असणाऱ्या अत्यष्टि छन्दांतील प्रसिद्ध वृत्तें सांगतात.

हरिणी न्सौ म्रौ स्लौगृतुसमुद्रऋषयः ॥ १६ ॥

ज्याच्या प्रत्येक चरणांत, न स म र स ल ग असे गण असून सहा, चार व सात अक्षरांनीं यति असतो, तें हरिणीनामक वृत्त होय. पूर्वी कांहीं लोक ह्यालाच ऋषभविलसित म्हणत असत. ॥ १६ ॥

पृथ्वी ज्सौ ज्सौ य्लौग् वसुनवकौ ॥ १७ ॥

ज्याच्या पादांत ज स ज स य ल ग असा गणक्रम असून आठ व नऊ अक्षरांनीं यति असतो तें पृथ्वीनामक वृत्त जाणावें. मोरोपंत कवीच्या सुप्रसिद्ध श्लोककेकावलीचें वृत्त हेंच आहे. ॥ १७ ॥

वंशपत्रपतितं भ्रौ न्भौ न्लौग् दिगृषयः ॥ १८ ॥

वंशपत्रपतित नांवाच्या वृत्ताच्या पादांत भ र न भ न ल ग असा गणक्रम असून दहा व पुढें सात अक्षरांनीं यति असतो. ॥ १८ ॥

मन्दाक्रान्ता म्भौ न्तौ त्गौग् समुद्रर्तुस्वराः ॥ १९ ॥

मन्दाक्रान्तेच्या चरणांत, म भ न त त ग ग असे गण असून चार, सहा व सात अक्षरांनीं यति असतो. कालिदासाच्या मेघदूतकाव्याचें वृत्त हें आहे. ॥ १९ ॥

शिखरिणी य्मौ न्सौ भ्लौगृतुरुद्राः ॥ २० ॥

शिखरिणी वृत्ताच्या चरणांमध्यें, य म न स भ ल ग असे गण आणि सहा व अकरा अक्षरांनीं यति असतो. जगन्नाथपंडिताची गंगालहरी व शिवमहिम्नः स्तोत्र ह्या वृत्तांत रचलें आहे. ॥ २० ॥

आतां अठरा अक्षरांचा पाद असणाऱ्या धृतिच्छंदांतलें प्रसिद्ध वृत्त सांगतात.

कुसुमितलतावेल्लिता म्तौ न्यौ याविन्द्रियर्तुस्वराः ॥ २१ ॥

ज्याच्या पादांत म त न य य य असे गण असून पांच, सहा व सात अक्षरांनीं यति असतो तें कुसुमितलतावेल्लिता नांवाचें वृत्त असतें. ॥ २१ ॥

आतां पादांत एकोणीस अक्षरें असणाऱ्या अतिधृतींतलें वृत्त सांगतात.

शार्दूलविक्रीडितं म्सौ ज्सौ तौ गादित्यऋषयः ॥ २२ ॥

शार्दूलविक्रीडित वृत्ताच्या चरणांत, म स ज स त त ग हे गण क्रमानें असून बारा व सात अक्षरांनीं यति असतो. ॥ २२ ॥

ह्यापुढें विंशत्यक्षरी पाद असलेल्या कृतींतलें वृत्त सांगतात.

सुवदना म्रौ भ्नौ यभौ ल्गावृषि–स्वरर्तवः ॥ २३ ॥

पादांत, म र भ न य भ ल ग असे गण व सात, सात आणि सहा ह्या अक्षरांनीं यति असतो तिचें नांव सुवदना होय. ॥ २३ ॥

ग्लिति वृत्तम् ॥ २४ ॥

ग ल ग ल अशा गुरुलघूंच्या क्रमानें वीस अक्षरांचा पाद पूर्ण होतो. त्या वृत्ताचें नांव वृत्तच होय. उदाहरण, ' पुण्यधाम रामनाम पूर्णकाम-कारि गाय रे सदैव ' असे चारी पाद रचावे. ॥ २४ ॥

आतां प्रकृतिच्छन्दांतलें (पादाक्षरें २१) प्रसिद्ध वृत्त सांगतात.

स्रग्धरा म्रौ भ्नौ यौय् त्रिः सप्तकाः ॥ २५ ॥

स्रग्धरावृत्तांत, म र भ न य य य असे गण असून सात सात अक्ष-रांनीं तीन ठिकाणीं यति असतो ॥ २५ ॥

ह्यापुढें सूत्रकार आकृति छन्दाचें (अक्षरें २२) वृत्त सांगतात.

मद्रकं भ्रौ न्रौ न्रौन् ग्रौ दिगादित्याः ॥ २६ ॥

भ र न र न र न ग असे गण प्रतिचरणांत असून दहा व बारा अक्षरांनीं यति असतो त्या वृत्ताचें नांव मद्रक असतें. ॥ २६ ॥

सूत्रकार, ह्यापुढें आकृतिच्छन्दांतील (पादाक्षरें २३) वृत्तें सांगतात.

अश्वललितं, न्जौ भ्जौ भ्जौ भ्लौग्रुद्रादित्याः ॥ २७ ॥

अश्वललित नांवाच्या वृत्तांत न ज भ ज भ ज भ ल ग असा गणक्रम असून अकरा व त्यापुढें बारा अक्षरांनीं यति असतो. ॥ २७ ॥

मत्ताक्रीडा मौ त्नौ नौ न्लौग् वसुपञ्चदशकौ ॥ २८ ॥

मत्ताक्रीडावृत्ताच्या एकेक पादांत, म म त न न न न ल ग असे गण असून आठ व पंधरा अक्षरांनीं यति असतो. ह्यापुढें संकृतिच्छन्दाचें (अक्षरें २४) वृत्त देतात. ॥ २८ ॥

तन्वी भ्तौ न्सौ मौ न्याविन्द्रियस्वर–मासाः ॥ २९ ॥

तन्वीवृत्ताच्या पादांत भ त न स म म न य असे आठ गण अनुक्रमानें असून पांच, सात व बारा अक्षरांनीं यति असतो. ॥ २९ ॥

ह्यापुढें पंचवीस अक्षरांचा पाद असणाऱ्या अभिकृतीमधलें वृत्त देतात. अभिकृतीच्या जागीं कित्येक अर्वाचीन छन्दोग्रन्थांत अतिकृति असें नांव आढळतें.

क्रौञ्चपदा भ्मौ स्भौ नौ नौग् भूतेन्द्रियवस्वृषयः ॥ ३० ॥

क्रौञ्चपदावृत्ताच्या चरणांत, भ म स भ न न न न ग असे गण असून पांच, पांच, आठ व सात ह्या अक्षरांनीं यति असतात. ॥ ३० ॥

आतां शेवटच्या उत्कृतिच्छन्दांतील (पादाक्षरें २६) प्रसिद्ध वृत्तें देतात.

भुजङ्गविजृम्भितं मौ त्नौ नौ सौ ल्गौ वसुरुद्रऋषयः ॥ ३१ ॥

भुजङ्गविजृम्भित नामक वृत्ताच्या पादांत म म त न न न र स ल ग असे गण, क्रमानें असून आठ, अकरा व सात अक्षरांनीं यति असतात. ॥ ३१ ॥

अपवाहको म्नौ नौ नौ न्सौ गौ नवर्त्तुरसेन्द्रियाणि ॥ ३२ ॥

अपवाहक वृत्ताच्या चरणांत, म न न न न न न स ग ग असे गण क्रमानें येत असून नऊ, सहा, सहा व पांच अक्षरांनीं यति असतात. येथें कृतिच्छन्दांचे प्रकार संपले ॥ ३२ ॥

दण्डको नौ रः ॥ ३३ ॥

प्रथम दोन न गण असून त्यापुढें सात र गण असल्यास त्या वृत्ताचें नांव दण्डक जाणावें. वरच्या वृत्तांत सव्वीस अक्षरें असल्यानें ह्या दण्डकाच्या पादांत, सत्तावीस अक्षरें अर्थातच येतात; कारण येथपर्यन्तच्या छन्दांत उत्तरोत्तर एकेक वर्णानेंच पादवृद्धि झाली आहे. 'चतुःशतमुत्कृतिः' (अ. ४।१) हें उत्कृतीचें लक्षणसूत्र मागेंच गेलें आहे. आतां ह्या सूत्रांत शेवटीं त्र्यक्षरी र गण दिला असल्यानें ह्यापुढें मात्र, तीन तीन अक्षरांनीं पुढच्या वृत्तांचे चरण वाढवावे; कारण येथील शेवटचा र गण हा तीन अक्षरांचा उपलक्षक आहे. ॥ ३३ ॥

प्रथमश्चण्डवृष्टिप्रपातः ॥ ३४ ॥

वर ३३ व्या सूत्रांत दिलेल्या पहिल्या दण्डकाचें नांव चण्डवृष्टिप्रपात असें आहे. ॥ ३४ ॥

अन्यत्र रातमाण्डव्याभ्याम् ॥ ३५ ॥

मात्र, रात व माण्डव्य ह्या दोघांना सोडून इतर आचार्यांच्या मतानेंच वरची संज्ञा आहे. अर्थात् रात व माण्डव्य ह्या ऋषींच्या ग्रन्थांत वरील दण्डकाचें नांव दुसरेंच कांहीं आहे असें सूचित होतें. ॥ ३५ ॥

शेषः प्रचित इति ॥ ३६ ॥

ह्या चण्डवृष्टिप्रपाताच्या पुढचे उत्तरोत्तर एकेक र गणानें पादवृद्धि होणारे दण्डक, सामान्यतः प्रचितसंज्ञक जाणावे. ह्यांना दुसऱ्याही विशेषसंज्ञा, सूत्रानंतरच्या ग्रन्थांत सांगितल्या आहेत. दोन न गणानंतर एकेक र गणानें पादवृद्धि होणारे हे दण्डक, ९९९ अक्षरांच्या पादापर्यंत वाढतात. त्यांपैकीं कांहींचीं वेगवेगळीं नांवेंही वृत्तरत्नाकराच्या नारायण-भट्टकृत टीकेंत दिलीं आहेत तेथें पहावीं. अर्ण, अर्णव, व्याल, जीमूत, लीलाकर, उद्दम, व

शंख, हीं प्रथम दण्डकापुढें आठ ते चौदा र गण वाढवून होणाऱ्या दण्डकांचीं नांवें आहेत. प्रथम दोन न गण व त्यापुढें सात य गण असल्यास त्या दण्डकाचें नांव प्रचितक असेंच त्या ग्रन्थांत आढळतें. य गणवृद्धींनीं होणाऱ्या दण्डकांचीं नावें, सिंहविक्रान्त, मत्तमातङ्गलीलाकर, अनङ्गशेखर, अशोकमञ्जरी वगैरे आहेत. सूत्रकारानें ह्या सर्वांना प्रचित असें सामान्य नांव दिलें आहे. सर्व दण्डकांत पादाच्या शेवटीं यति असतो; परंतु म्हणणारा दमल्यास मध्येंही सोईप्रमाणें यति करणारच! संस्कृत काव्यांत श्यामला दण्डक वगैरे दण्डकांचीं प्रसिद्ध उदाहरणें असून मराठींतील चूर्णिकावृत्त दण्डक जातीचें आहे. असो. ह्या सूत्राच्या शेवटच्या इतिकारानें येथें सातव्या अध्यायाची समाप्ति सूचित केली. ॥ ३६ ॥

अध्याय आठवा

—:०:—

अत्रानुक्तं गाथा ॥ १ ॥

मागें दिलेल्या छन्दःसूत्रांमध्यें ज्या वृत्तांचीं नांवें दिलीं नाहींत, तथापि जीं काव्यप्रयोगांत मात्र आढळतात त्या वृत्तांचें सामान्यतः नांव गाथा होय. गाथा म्हणजे गानोपयोगी वृत्त. आतां वृत्तिकार स्वतःच त्यांपैकीं कांहीं प्रसिद्ध गाथा, त्यांचीं विशेषनामें व लक्षणें ह्यांसह देतात. प्रथम त्रिष्टुप् छन्दांतील गाथा देतों. ॥ १ ॥

कुड्मलदन्ती भ्तौ न्गौ गिन्द्रिय-रसाः ॥

जिच्या चरणांत भ त न ग ग असे गण असून पांच पांच व सहा अक्षरांनीं यति असतो त्या गाथेचें नांव कुड्मलदन्ती असें आहे.

वरतनु न्जौ ज्रौ षड्रसाः ॥

जिच्या प्रत्येक चरणांत न ज ज र असे गण असून सहा सहा अक्षरांनीं यति असतो त्या गाथेचें नांव 'वरतनु होय. वरतनु संप्र—वदन्ति कुक्कुटाः हा महाभाष्यांत, 'व्यक्तवाचां समुच्चारणे' (१–३–४८) ह्या सूत्राचें प्रत्युदाहरण म्हणून दिलेला चरण ह्या गाथेचा आहे. ह्याचा संपूर्ण-श्लोक कवि कुमारदासाच्या जानकीहरण काव्यांत आहे.

जलधर माला म्भौ स्मौ समुद्रवसवः ॥

प्रत्येक पादांत, म भ स म असे गण व चार आणि आठ अक्षरांनीं यति असतो, त्या गाथेचें नांव जलधरमाला जाणावें.

गौरी नौ रौ ॥

चरणांत न न र र असे गण असल्यास ती गौरीसंज्ञक गाथा होते. ह्या गौरीच्या चरणापुढें एकेक र गण दण्डकापर्यंत अर्थात् चोवीस अक्षरांपर्यंत वाढवीत गेल्यास निरनिराळ्या नांवांचीं वृत्तें बनतात. त्यांचीं नांवें येथें किंवा हलायुधवृत्तींत दिलीं नाहींत. वरच्या वरतनुप्रमाणेंच सुप्रसिद्ध मुक्तकांना नवीन संज्ञा देऊनही, तीं तीं नांवें बनतील. ॥

ललना भ्तौ न्सौ इन्द्रियर्षयः ॥

जिच्या पादांत भ त न स असे गण असून सहा सहा अक्षरांनीं यति असतो त्या गाथेचें नांव ललना आहे. आतां अतिजगतीमधील गाथा सांगतात.

कनकप्रभा स्जौ स्जौग् ॥

जिच्या चरणांत स ज स ज ग असे गण असतात त्या गाथेचें नांव कनकप्रभा जाणावें. ॥ ७ ॥

कुटिलगति नौ तौग् स्वरर्तवः ॥

कुटिल गति नांवाच्या गाथेंत, न न त त ग असे गण असून सात व सहा अक्षरांनीं यति असतो. त्यापुढें शर्करी छन्दांतील प्रसिद्ध गाथा सांगतात.

वरसुन्दरी भ्जौ स्नौ गौ ॥

वरसुन्दरी गाथेंत, भ ज स न ग ग असे गण, प्रत्येक चरणांत असतात. जसें, 'भृंगवर पाहि वरसुन्दरि! सरोजीं' असे चरण रचावे. शारदा नाटकांतील 'सावळा वर बरा गौरवधुला' हें पद मात्रागणनेनें ह्या गाथेच्या जातीचें ठरेल. येथें विशेष नियम नसल्यानें पादान्तीं यति जाणावा.

कुटिला म्भौ न्यौ गौ वेदरससमुद्राः ॥

कुटिलानामक गाथेंत, म भ न य ग ग असे गण असून चार, सह व त्यापुढें चार अशा अक्षरांनीं यति असतो.

ह्या पुढें अष्टिच्छन्दांतल्या (पादाक्षरें १६) गाथा सांगतात.

शैलशिखा भ्रौ न्भौ भ्गौ भूतरसेन्द्रियाः ॥

शैलशिखा नामक गाथेच्या चरणांत, भ र न भ भ ग असे गण व पांच, सहा आणि पांच अक्षरांनीं यति असतात.

वरयुवती भ्रा य्नौ न्गौ ॥

वरयुवती गाथेंत प्रत्येक चरणांत भ र य न न ग असे गण असून पादान्तीं यति असतो.

आतां अत्यष्टींतील (पादाक्षरें १७) गाथा देतात.

अतिशायिनी सौ ज्भौ ज्गौग् दिक्स्वराः ॥

प्रतिचरणांत स स ज भ ज ग ग असे गण व दहा आणि सात अक्षरांनीं यति असतो त्या गाथेचें नांव अतिशायिनी असतें.

अवितथं न्जौ भ्जौ ज्लौग् ॥

प्रत्येक चरणामध्यें, न ज भ ज ज ल ग असा गणक्रम असतो ती अवितथ नांवाची गाथा होय. श्रीमद्भागवतपुराणांतील सुप्रसिद्ध वेदस्तुति ह्या गाथेंत आहे.

वस्विन्द्रियसमुद्राश्चेत्कोकिलकम् ॥

वरच्याच वृत्तांत आठ पांच व चार अक्षरांनीं यति असल्यास त्या गाथेस कोकिलक म्हणतात.

ह्या पुढें धृतिच्छन्दांतली प्रसिद्ध गाथा सांगतात (पादाक्षरें १८).

विबुधप्रिया सौं जौ भ्रौ वसुदिशः ॥

विबुधप्रिया नांवाच्या गाथेंत, र स ज ज भ र असे गण असून आठ व त्यापुढें दहा अक्षरांनीं यति असतो.

नाराचकं नौ रौ रौ ॥

नाराचकं संज्ञक गाथेंत न न र र र र असे गण प्रत्येक पादांत असतात. आतां अतिधृतींतल्या (पादाक्षरें १९) प्रसिद्ध गाथा सांगतात.

विस्मिता य्मौ न्सौ रौ ग्रसर्तुस्वराः ॥

विस्मितेच्या चरणांत, य म न स र र ग असे गण व सहा, सहा आणि सात अक्षरांनीं यति असतो. माघकवीच्या शिशुपालवध ह्या महाकाव्याच्या शेवटचें ' श्रिया जुष्टं दिव्यैः ' हें पद्य ह्या गाथेचें आहे. ॥

आतां प्रकृतिच्छन्दांतली गाथा सांगतात. (पादाक्षरें २१)

शशिवदना न्जौ भ्जौज् ज्रौ रुद्रदिशः ॥

जिच्या प्रत्येक चरणांत, न ज भ ज ज ज र असे गण असून अकरा व दहा अक्षरांनीं यति असतो तिचें नांव शशिवदना जाणावें. ॥

ह्याप्रमाणें वृत्तिकारोक्त सुप्रसिद्ध गाथा आहेत. हलायुध वृत्तिकाराचे वेळीं ह्या वृत्तांचें गायन करण्याचा विशेष प्रघात असल्यामुळें, ह्यांना गाथा असें नांव पडलें असावें. कारण जुन्या नाटकांतून गाण्याच्या प्रसंगीं, ह्यांपैकीं कांहीं गाथा रचलेल्या असून गाथा शब्दाचा प्रसिद्ध अर्थही गेयपद्य असा आहे. असो. सर्व वृत्तांचीं नांवें व लक्षणें देणें अशक्य आहे; कारण तीं अनंत आहेत. तथापि त्या सर्वांचें सामान्यतः ज्ञान व गणनेचा प्रकार कळावा; म्हणजे एकाक्षरपाद छन्दापासून कितीही अक्षरांचे पाद असणाऱ्या छन्दांतील सर्ववृत्तांची माहिती व्हावी म्हणून सूत्रकार, आतां प्रस्तारप्रकार लिहिण्यास प्रारंभ करतात. प्रस्तार म्हणजे ज्या कोष्टकांत,

जिज्ञासूला समजण्याकरितां छन्दांतलीं सर्व वृत्तें पसरलीं जातात (प्रस्तीर्यन्ते वृत्तान्यत्र) तो होय. प्रथम एकाक्षर प्रस्तार सांगून त्यावरून द्व्यक्षर च्छन्दाचा प्रस्तार साधण्याकरितां, क्रमानें दोन सूत्रें देऊन त्यांचा अर्थ लिहितों.

द्विकौ ग्लौ ॥ २ ॥

दोन आवृत्ति ज्यांचें प्रमाण आहे (द्विक) असे ग ल अनुक्रमानें लिहावे. ह्याचें स्पष्टीकरण करतों. प्रथम एक ग (ऽ = गुरु) व त्याखालीं एक ल (। = लघु) लिहावा. हाच एकाक्षरच्छन्दाचा प्रस्तार होय. कारण एकाक्षरपादांत एक गुरु किंवा एकलघु असे दोनच प्रकार संभवतात. अर्थात् एकाक्षरच्छन्दांत दोनच वृत्तें आहेत. त्यापैकीं एक 'श्रीस्ते। सा स्तात्' असें असतें. ह्या वृत्ताचें नांव श्री असें आहे. असो. सूत्रांत ग ल दोनदां लिहिण्यास सांगितले आहेत ते, त्यांच्या प्रसिद्ध खुणांनीं

ऽ असे लिहावें. दोन आवृत्ति लिहिण्यास सांगितल्या असल्यामुळें
। पहिली आवृत्ति झाल्यावर मध्यें आडवी रेघ काढून तिच्या खालीं
ऽ दुसरी आवृत्ति येथें दिल्याप्रमाणें लिहावी. ॥ २ ॥
।

ह्यापुढें, द्व्यक्षरप्रस्तार पूर्ण करण्यास काय करावें, हें पुढच्या सूत्रानें सांगतात.

मिश्रौ च ॥ ३ ॥

ह्या सूत्रांतल्या चकारानें 'द्विकौ ग्लौ' ह्या पूर्वप्रस्ताराचाही समुच्चय होतो. असो, आतां सूत्रार्थ देतों. प्रथम, वरच्याप्रमाणें द्विक ग्ल लिहून त्यापुढें दुसऱ्या उभ्या ओळींत मिश्र ग ल लिहावे. गकारापुढें जोडून लिहिलेला ग तो मिश्र ग व ल पुढें जोडून लिहिलेला ल (।) तो मिश्रल जाणावा. उच्चारणक्रमामुळें, पहिल्या ग लच्या आवृत्तिपुढें मिश्र ग लिहावा,

आणि दुसऱ्या रेघेखालच्या आवृत्तिपुढें मिश्र ल लिहावा व नंतर मधली रेघ पुसून टाकावी; म्हणजे द्वयक्षरप्रस्तार तयार होऊन द्वयक्षरपादवृत्तांचे सर्व प्रकार कळतील. तो प्रस्तार साधनदशेंत

ऽ ऽ
। ऽ
———
ऽ ।
। ।

असा व सिद्धदशेंत

ऽ ऽ
। ऽ
ऽ ।
। ।

असा बनतो. ह्यावरून द्वयक्षरपाद छन्दामध्यें, प्रस्तारांत दिल्याप्रमाणें पाद असणारीं चार वृत्तें संभवतात. त्यांपैकीं एक पहिलें, 'देवा येई। भेटी देई।' असें असतें. ह्या वृत्ताचें नांव स्त्री असें आहे. असो; ह्याप्रमाणें द्वयक्षर प्रस्तार सांगून, ह्यापुढच्या त्र्यक्षर, चतुरक्षर वगैरे सर्व छन्दांचे प्रस्तार एकेक अक्षराच्या वृद्धीनें कसे लिहावे हें, पुढच्या सूत्रानें सांगतील.॥ ३ ॥

पृथग् ग्ला मिश्राः ॥ ४ ॥

वरच्याप्रमाणें आलेल्या द्वयक्षरप्रस्ताराचें द्विक (दोन आवृत्ति), मध्यें रेघ देऊन एकाखालीं एक लिहावें. नंतर त्यापुढें उभ्या ओळींत वरच्याप्रमाणेंच मिश्र ग ल, आवृत्तिभेदानें पृथक् लिहावे. सूत्रांतल्या पृथक् ह्या पदानें विजातीय अक्षरांचा संसर्ग नको हेंही सूचित केलें आहे. त्यामुळें रेघेवरील आवृत्तिपुढें केवळ एकेक गच मिश्र लिहावे, व रेघे-खालच्या आवृत्तिपुढें एकेक लच मिश्र लिहावे; नंतर मधली रेघ पुसून टाकावी. म्हणजे त्र्यक्षर पादच्छन्दाचा प्रस्तार सिद्ध होईल. ह्याप्रमाणें वृत्तिकारादिकांच्या प्राचीन परंपरेस अनुसरून २ ३ ४ ह्या तीन प्रस्तारसूत्रांचा अर्थ दिला आहे. परंतु माझ्या मनास, ह्या प्रस्तारसूत्रांचा सरळ व सोपा अर्थ वाटतो तो ह्यापुढें देतों. 'ग्लौ' हें पहिल्या अध्यायां-

तलें सामान्य अधिकारसूत्र २ ऱ्या सूत्रांत अनुवृत्तीनें आणून 'लिखेत्' ह्या सर्व सामान्य क्रियापदाचा अध्याहार करावा; नंतर एकेक गल उभ्या ओळींत लिहावे, म्हणजे तो एकाक्षरच्छन्दाचा प्रस्तार झाला असा त्या भागाचा अर्थ करावा. ह्यापुढें 'द्विकौ ग्लौ, मिश्रौ च' ह्यांचा अर्थ. गल ह्यांच्या दोन आवृत्ति उभ्या ओळींत लिहाव्या व त्यांच्यापुढें एकेक गल मिश्र लिहावे, म्हणजे द्व्यक्षरच्छन्दाचा प्रस्तार होईल. ह्यांतील व पुढच्या प्रस्तारांतील गल लेखनाच्या नियमाकरितां पुढलें सूत्र 'पृथग् ग्ला मिश्राः' हें आहे. ह्याचा अर्थ, पुढें जोडून (मिश्र), जे गल लिहावयाचे ते पृथक् पृथक् लिहावे. अर्थात् पहिल्या आवृत्तिपुढें केवळ ग व तिच्या खालच्या दुसऱ्या आवृत्तिपुढें नुसते एकेक लच (।) लिहीत जावे. ह्यांत आवृत्तिभेद समजण्याकरितां, प्रथम मध्यें आडवी रेघ सोईकरितां लिहावी व सर्व लिहून झाल्यावर ती पुसून टाकावी. असो. ह्या क्रमानें जितक्या अक्षरांचा प्रस्तार लिहिला असेल त्यापेक्षां एकानें जास्त अक्षरांचा अथवा पुढच्या छन्दाचा प्रस्तार लिहिणें झाल्यास, वर दिल्याप्रमाणें पूर्वप्रस्ताराच्या एकाखालीं एक अशा दोन आवृत्ति लिहून त्यांपैकीं वरच्या आवृत्तिगणापुढें एकेक ग व खालच्या आवृत्तिगणापुढें एकेक ल लिहावे, म्हणजे त्यापुढचा प्रस्तार होईल. उदाहरण, पञ्चाक्षरप्रस्ताराच्या एकाखालीं एक अशा दोन आवृत्ति लिहून त्यांपुढें आवृत्तिक्रमानें जोडून ग ल लिहावे म्हणजे तो षडक्षर पादाच्या गायत्री छन्दाच्या सर्व वृत्तांचा प्रस्तार होईल. ॥ ४ ॥

वसवस्त्रिकाः ॥ ५ ॥

वरच्या तीन सूत्रांच्या युक्तींनीं त्र्यक्षरछन्दांचा प्रस्तार मांडल्यास त्याचे आठ (वसवः) वृत्तप्रकार होतात ते, शास्त्रारंभीं दिलेले 'म य र स त ज भ न' हे आठ गणच होय, असे जाणावे. ह्याचप्रमाणें एकाक्षर-वृद्धीनें प्रस्तार मांडल्यास चतुरक्षरांत सोळा, पञ्चाक्षरांत बत्तीस व षडक्षर-

प्रस्तारांत एकंदर चौसष्ट समवृत्तें संभवतात. ह्याप्रमाणें कोणत्याही प्रस्तार-संख्येच्या दुप्पट त्या पुढच्या छन्दःप्रस्ताराची वृत्तसंख्या होते. प्रस्तार मोजून देखील त्र्यक्षराची वृत्तसंख्या समजणें शक्य असल्यानें, हें सूत्र केवळ स्पष्ट ज्ञानाकरितांच रचलें आहे असें समजावें. ॥ ५ ॥

आतां कोणत्याही प्रस्ताराचा अमकाच प्रकार कसा आहे हें चटकन प्रस्तारावांचून काढण्याकरितां, सूत्रकार नष्टज्ञानाचा (नष्टवृत्तज्ञान) प्रकार सांगतात. ह्या प्रत्ययाला (प्रतीत्युपायाला) छन्दःशास्त्रांत नष्ट अशी संज्ञा आहे.

लर्द्धे ॥ ६ ॥

पृच्छकानें विचारलेल्या प्रकाराची संख्या मांडून तिची निम्पट (अर्ध) करावी व त्या निम्पटीच्या अंकाखालीं अथवा पुढें बरोबर पूर्ण संख्येंत अर्ध झालें म्हणून एक ल (।) मांडावा. ॥ ६ ॥

पूर्ण संख्येंत निम्पट होत नसल्यास काय करावें हें पुढच्या सूत्रानें सांगतात.

सैके ग् ॥ ७ ॥

निम्पट अपूर्णांकांत येत असल्यास नष्टाच्या विचारलेल्या अंकांत एक मिळवून (सैके) त्याची निम्पट करावी. अशावेळीं मात्र त्या निम्पटी-खालीं ग (ऽ = गुरु) मांडावा. ह्याप्रमाणें जितक्या अक्षरांचा प्रस्तार असेल, तितके वर्ण होईपर्यंत निम्पटी करून ल ग मांडावे, म्हणजे नष्ट (पृष्ट) वृत्त कसें असेल तें समजेल. उदाहरण, एकाद्यानें षडक्षरपादाच्या गायत्रीछन्दांतलें सहावें वृत्त कसें असें विचारलें तर, त्याचें गणित असें करावें.

६	४	२	२	२	२,
३+१,	२	१+१,	१+१,	१+१,	१'
।	ऽ	।	ऽ	ऽ	ऽ.

खुलासा. येथें सहा ही नष्टवृत्ताची संख्या आहे. तिची निम्पट पूर्णाङ्कांत झाली म्हणून प्रस्ताराच्या पहिल्या जागीं 'लर्धे' ह्या नियमाप्रमाणें लघु लिहिला. त्यापुढें तीन ह्या निम्पटीच्या अर्धांत अपूर्णांक येऊं लागला म्हणून त्यांत एक मिळवून आलेले चार द्वितीयस्थानीं लिहून त्यांची निम्पट केली व त्या २ अंकाखालीं गुरु लिहिला. पुढें ते दोन तृतीयस्थानीं मांडून त्यांच्याखालीं आलेली निम्पट पूर्णाङ्क असल्यामुळें तिच्याखालीं लघु लिहिला. परंतु त्यापुढें मात्र तीनदां एकेक मिळवून निम्पट करावी लागली म्हणून ह्या निम्पटीखालीं तीन गुरूच लिहिले. अशा प्रकारानें '।ऽ।ऽऽऽ' हा षडक्षरछन्दाचा सहावा प्रस्तार प्रकार निघाला. अशींच सर्व नष्टांचीं उदाहरणें शोधून काढावीं. ॥ ७ ॥

सूत्रकार, आतां कोणत्याही छन्दाच्या प्रस्तारांपैकीं दिलेल्या एकाद्या वृत्तप्रकाराची संख्या कोणती हें काढणें, ह्याला छन्दःशास्त्रांत उद्दिष्ट असें नांव आहे; तें उद्दिष्ट (उद्दिष्टसंख्या) काढण्याचा प्रकार दोन सूत्रांनीं सांगतात.

प्रतिलोमगुणं द्विर्लाद्यम् ॥ ८ ॥

दिलेला प्रस्ताराचा प्रकार प्रथम लिहावा. त्यांपैकीं उजव्या हाताकडचा जो शेवटचा लकार असेल त्यापासून (लाद्यम्) डावीकडे सर्व वर्ण संपेपर्यन्त, अंकांची दुप्पट करून लघु गुरुखालीं मांडीत जावा; जो शेवटचा अंक येईल तीच त्या दिलेल्या वृत्ताची संख्या जाणावी. आतां अंकाची दुप्पट करणें तर, प्रथम अन्त्य लकाराखालीं कोणता आंकडा

मांडावा अशी शंका येते तिचें उत्तर असें कीं निराकारशून्याची दुप्पट करतां येत नाहीं, व पूर्णाङ्कापैकीं प्रथम असणाऱ्या एकाला सोडून पुढचा अंक घेण्यास प्रमाण नाहीं; म्हणून अन्त्य लकारापुढें एक हा अंक प्रथम लिहून तेथें लागलीच त्याची दुप्पट करून त्या पहिल्या लकाराखालीं मांडावी; नंतर डावीकडे दुप्पटी करून मांडीत जावें. म्हणजे उद्दिष्टवृत्ताची संख्या कळेल. ॥ ८ ॥

ततोऽग्येकं जह्यात् ॥ ९ ॥

अशा दुप्पटी करून डावीकडे मांडीत जात असतां, जेव्हां गकाराखालीं (ऽ) मांडण्याचा प्रसंग येईल तेव्हां त्या दुप्पटींपैकीं एक कमी करून मांडावा व नंतर त्याची दुप्पट डाव्या हाताच्या वर्णाखालीं मांडावी. अशाप्रमाणें प्रस्ताराच्या पहिल्या वर्णापर्यंत दुप्पटी मांडाव्या. असो, आतां ह्या उद्दिष्टाचें उदाहरण लिहितों.

।	ऽ	।	ऽ	ऽ	ऽ	हें वर नष्ट प्रत्ययांत दिलेलेंच उदाहरण
६	३	२	(१)			

आहे. परंतु तेथें दिलेल्या संख्येवरून प्रस्तारप्रकार काढला आहे व येथें दिलेल्या प्रस्तारावरून त्याची संख्या काढली आहे.

खुलासाः—प्रस्तारांतील शेवटच्या लपुढें अर्थात् तृतीयवर्णापुढें कंसांत एक हा अंक लिहून त्याची दुप्पट २ ही प्रथम लखालीं लिहिली; पुढें त्यांची दुप्पट ४ आली परंतु ती डावीकडे गुरुखालीं मांडण्याचा प्रसंग आला म्हणून त्यांतून, 'ततोग्येकं जह्यात्' ह्या नियमानें एक कमी करून उरलेले तीन त्या गुरुखालीं मांडले. त्यापुढें त्यांची दुप्पट ६ झाली ती त्याच्यामागें असलेल्या प्रथम लघुखालीं मांडली. येथें गुरु नसल्यामुळें संख्या १ उणी करून मांडली नाहीं. असो, ह्याप्रमाणें शेवटची दुप्पट सहा हीच

दिलेल्या षडक्षरपादांतील प्रस्तारप्रकाराची संख्या जाणावी. म्हणजे प्रकृत-प्रस्तार हा षडक्षरपादच्छन्दाच्या प्रस्तारभेदापैकीं सहावा प्रकार आहे असें समजावें. ह्याचप्रमाणें कोणत्याही उद्दिष्ट प्रकारांत शेवटल्या लघुखालीं प्रारंभ करून, अंकाच्या दुप्पटी आद्यवर्णापर्यंत डाव्या हाताकडे मांडीत जाव्या म्हणजे वाटेल त्या उद्दिष्ट (दर्शित) प्रस्तारप्रकाराची अनुक्रमसंख्या, सर्व-प्रस्तार मांडल्याशिवाय व मोजल्याशिवायहि बिनचूक निघेल. ॥ ९ ॥

आतां सूत्रकार, षडक्षर वगैरे छन्दांतील सर्व समवृत्तें (प्रस्तारसंख्या) किती हें एकदम काढण्याचा प्रकार चार सूत्रांनीं सांगतात.

द्विरर्द्धे ॥ १० ॥

ह्या व पुढच्या सूत्रांत ‘ अपनीते ’ (कमी केलें असतां) ह्या पदाचा अध्याहार करावा.

सूत्रार्थ:—ज्या छन्दांचीं एकंदर समवृत्तें किती असें विचारलें असेल त्यांची पादाक्षरसंख्या जी असेल ती प्रथम लिहावी व तिच्या खालीं तिचीच निम्पट करून लिहावी. ह्याप्रमाणें निम्पटी करून मांडीत असतां जर पूर्णाङ्कांत निम्पट झाली तर म्हणजे मूळ संख्येंतून अर्ध कमी केलें असतां (अर्धे अपनीते) त्या निम्पटीसमोर दोन हा अंक मांडावा. अर्थात् मूळसंख्या सम असली तरच पूर्णाङ्कांत निमपट होईल. ॥ १० ॥

आतां मूळसंख्या विषम असल्यामुळें अपूर्णाङ्कांत निम्पट येऊं लागली तर काय करावें हें पुढच्या सूत्रानें सांगतात.

रूपे शून्यम् ॥ ११ ॥

असा प्रसंग आला तर अर्ध (निम्पट) न करतां मूळसंख्येंतून एकच फक्त उणा करून (रूपे अपनीते) येईल ती संख्या खालीं मांडावी व तिच्यासमोर शून्य मांडावें. ह्याप्रमाणें दोन्ही ओळींत केवळ शून्य येईपर्यंत करावें. ह्यापुढचें कर्तव्य पुढील सूत्र सांगतें. ॥ ११ ॥

द्विः शून्ये ॥ १२ ॥

उजव्या बाजूकडची दुसरी जी दोन व शून्य ह्यांची ओळ असेल तिच्यावरून तिसरी उत्तराची ओळ काढण्याकरितां सर्वांच्या खालच्या अथवा शेवटच्या शून्यापासून प्रारंभ करावा. आतां प्रस्तुत सूत्राचा अर्थ लिहितों. शून्यासमोर संख्येची दुप्पट करून मांडावी. दुप्पटीकरितां प्रथम कोणता अंक घ्यावा असें विचाराल तर, निराकार शून्याची दुप्पट करणें शक्य नाहीं व प्रथमप्राप्त एक ह्या संख्येपुढें जाण्यास प्रमाण नाहीं म्हणून एक ह्या संख्येचीच दुप्पट करावी असें मागें उद्दिष्टांत दिलेल्या न्यायानेंच ठरतें. असो. ह्याप्रमाणें शून्यस्थानीं अंकाची दुप्पट करून मांडण्यास सांगून पूर्ण अर्धस्थानीं काय करावें हें पुढच्या सूत्रानें सांगतात. ॥ १२ ॥

तावदर्द्धे तद्गुणितम् ॥ १३ ॥

जेथें पूर्णाङ्कांत अर्ध तुटल्यामुळें 'द्विरर्द्धे' ह्या नियमानें दोन हा अंक मांडला असेल तेथें चालू झालेल्या संख्येची दुप्पट न करतां, तिला तिनेंच गुणून (तद्गुणितम्) गुणाकार येईल तो, दोन ह्या अंकापुढें मांडावा. ह्याप्रमाणें सर्व दुसरी ओळ संपेपर्यंत करून तिसरी ओळ बनवावी; व शेवटीं जी संख्या येईल तीच त्या छन्दाच्या सर्व वृत्तांची अथवा प्रस्तारभेदांची संख्या जाणावी. उदाहरण, अष्टाक्षर पादाच्या अनुष्टुप् छन्दाचीं सर्व समवृत्तें किती असें कोणी विचारलें तर वरच्या चार सूत्रांस अनुसरून त्याचें गणित करावें व पुढें दिल्याप्रमाणें उत्तर काढावें.

८	२	=	२५६
४	२	=	१६×१६
२	२	=	४×४
१−१	०	=	२×२
=०			१+१

किंवा खालीं दिल्याप्रमाणें देखील तीन ओळी लिहाव्या.

८	४	२	१ −	१ = ०
२	२	२	०	
२५६	१६×१६	४×४	२×२	१ + १

ह्यांची उपपत्ती देतों. प्रथम पादाक्षरसंख्या आठ ही पहिल्या ओळींत लिहून त्यांची निम्पट चार ही त्याच्या खालच्या ओळींत लिहिली व 'द्विरर्धे' ह्या नियमाप्रमाणें दोन हा अंक आठांच्या समोर मांडला. ह्याचप्रमाणें चारांची दोन व दोहोंची एक अशा निम्पटी करून त्यांच्यापुढें दोन, दोन ही संख्या मांडली. पुढें एकाची निम्पट पूर्णांकांत होत नाहीं म्हणून 'रूपे शून्यम्' ह्या नियमानें त्यांतून एक उणा करून आलेलें शून्य खालीं मांडलें व एका समोरहि शून्य लिहिलें. आतां तिसऱ्या ओळींत, 'द्विः शून्ये' ह्या नियमानुसार, एक ह्या संख्येची दुप्पट करून आलेले दोन, शून्यासमोर मांडले; व त्याच्यावरचीं तीनही अर्धस्थानें पूर्णाङ्कयुक्तच असल्यामुळें, 'तावदर्धे तद्गुणितम्' ह्या नियमानें दोहोंस दोहोंनीं, चारास चारानीं व सोळास सोळांनीं गुणून ते ते गुणाकार वरचे अंक संपेपर्यंत मांडले. शेवटचा गुणाकार दोनशें छप्पन्न, हीच अनुष्टुप्छन्दाच्या सर्व समवृत्तांची संख्या होय. अशाच रीतीनें शून्यस्थानीं दुप्पटी व दोहोंच्या स्थानीं त्या त्या संख्यांस त्यांनींच गुणून, इतर कोणत्याही छन्दाच्या सर्व समवृत्तांची संख्या काढावी. ॥ १३ ॥

द्विर्द्व्यूनं तदन्तानाम् ॥ १४ ॥

गायत्री वगैरे एकाद्या छन्दाच्या वरील चार सूत्रांनीं काढलेल्या सर्व वृत्तसंख्येची दुप्पट करून त्यांतून दोन कमी केले असतां तीच एकाक्षर-च्छन्दापासून तेथपर्यन्तच्या एकंदर सर्व समवृत्तांची संख्या जाणावी. उदाहरण षडक्षरपाद गायत्रीछन्दाचीं एकंदर वृत्तें चौसष्ट आहेत. ह्यांची दुप्पट एकशें-

अठ्ठावीस. ह्यांतून दोन कमी केले असतां (द्व्यूनम्) एकशेंसव्वीस उरतात, हीच एकाक्षरपाद उक्तेपासून षडक्षरपादाचा गायत्रीछन्दसंपेपर्यन्त असलेल्या सर्व समवृत्तांची संख्या जाणावी. खुलासा—उक्तेचीं वृत्तें २ (एकाक्षरपाद), अत्युक्तेचीं चार, मध्येचीं ८, प्रतिष्ठेचीं १६, सुप्रतिष्ठेचीं ३२, (पञ्चाक्षरपाद) आणि गायत्रीचीं ६४ हीं सर्व एकत्र केलीं असतां येणारे १२६ हीच उक्तेपासून गायत्र्यन्त सर्व समवृत्तांची संख्या जाणावी. ह्याचप्रमाणें 'द्विर्द्व्यूनं तदन्तानाम्' हा प्रस्तुत नियम लावून प्रारंभापासून कोणताही छन्द संपेपर्यन्त असणाऱ्या एकंदर समवृत्तांची संख्या काढावी. त्या प्रत्ययाला छन्दःशास्त्रांत 'संख्यान' (संख्या काढणें) असें नांव आहे ॥१४॥


परे पूर्णम् ॥ १५ ॥

एकाद्या छंदाची वृत्तसंख्या समजली असतां, तिच्या साह्यानें त्याच्या पुढच्या छन्दाचीं एकंदर वृत्तें कशीं काढावीं तें ह्या सूत्रानें सांगितलें आहे. येथें मागून ' द्विः ' (दुप्पट) अशी अनुवृत्ति आणून व ' जिज्ञासिते ' (जाणण्याची इच्छा असतां) असा अध्याहार करून सूत्रार्थ देतों. एखाद्या छन्दाच्या पुढच्या छन्दाचीं वृत्तें जाणण्याची इच्छा असल्यास त्याच्या स्वतःच्या वृत्तसंख्येची पूर्ण दुप्पट करावी; तीच पुढच्या छन्दाची पूर्णवृत्तसंख्या होय. जसें, गायत्रींत एकंदर चौसष्ट वृत्तप्रकार आहेत, त्यांची दुप्पट एकशेंअठ्ठावीस, हीच तिच्या पुढच्या उष्णिक छन्दाच्या सर्व समवृत्तांची संख्या होय. मागच्या सूत्रांत ' द्व्यूनम् ' (दोहोनीं उणे) असें पद आहे. त्याच्या निवृत्तिकरितां ह्या सूत्रांत ' पूर्णम् ' हें पद घातलें आहे; ह्यामुळें ' परे जिज्ञासिते द्विः पूर्णम् ' अशी अध्याहारसहित सूत्राची रचना झाली. ॥ १५ ॥

परे पूर्णम् इति ॥ १६ ॥

ह्या सूत्राच्या शेवटच्या इतिकारानें येथें आठवा अध्याय संपला हें सांगितलें असून ' परे पूर्णम् ' अशा सूत्रावृत्तीनें, वस्तुतः येथें हें पिङ्गल-

कृत छन्दशास्त्रहि समाप्त झालें असा अर्थ निघतो. कारण पुष्कळ शास्त्र-सूत्रांच्या शेवटीं सूत्र वगैरेची आवृत्ति लिहिण्याचा सूत्रकारांचा प्रघात आहे. जसें, 'अनावृत्तिः शब्दात् ।' 'अनावृत्तिःशब्दात्' (ब्रह्मसूत्र, अ. ४ पा० ४ सूत्र २२) वगैरे. तथापि वृत्तिकार भट्टहलायुध वगैरे प्राचीन छन्दोग्रन्थकार, ह्या आवृत्तींतूनच 'एका क्रिया द्व्यर्थकरी प्रसिद्धा' ह्या न्यायानें अथवा एकवृन्तगत फलद्वयाच्या (एका डेखांतील दोन फळें ह्या) न्यायानें दुसरा अर्थ काढून ह्या आवृत्तसूत्रानें, 'एकद्व्यादिलगक्रिया' हा पांचवा प्रत्ययप्रकार सूत्रकारानें सांगितला आहे, असें लिहीत आले आहेत. त्या लिहिण्यांत अतिशय अध्याहार व अर्थाची ओढाताण असल्यामुळें व्याख्या-नावरच अर्थज्ञान अवलंबून रहातें. मला स्वतःला केवळ सूत्रांतून एवढा अर्थ निघतो असें वाटत नाहीं व अध्वयोगाप्रमाणेंच हाही केवळ बुद्धिवैभव दाखविणारा पांचवा प्रत्यय, लिहिला नसता तरीही त्यानें शास्त्र अपूर्ण म्हणण्याइतकी हानि झाली नसती. तथापि व्याख्यानपरंपरा समजण्याकरितां व मौजेकरितां तोहि प्रकार येथें अर्थतः लिहीन. त्यापूर्वी वृत्तरत्नाकरांतला एक श्लोक देऊन सहा प्रत्यय सांगतों. 'प्रस्तारो नष्टमुद्दिष्टमेकद्व्यादिलगक्रिया । संख्यानमध्वयोगश्च षडेते प्रत्ययाः स्मृताः ।' = प्रस्तार, नष्ट, उद्दिष्ट, एकद्व्यादिलगक्रिया, संख्यान, व अध्वयोग हे सहा प्रत्यय म्हणजे वृत्तप्रकारांच्या प्रतीतीचे उपाय आहेत. त्यांपैकीं पहिले चार सूत्रकारानें सांगितलेच असून त्यांचें सविस्तर वर्णन मागें केलें आहे. अध्वयोग म्हणजे प्रस्तार मांडण्यास किती जागा लागेल ह्याचा हिशोब. ही गोष्ट ऐच्छिक असल्यामुळें हा प्रत्यय फारसा महत्वाचा नाहीं म्हणून सूत्र-कारानें सांगितला नाहीं असें वृत्तिकार लिहितो. आतां राहिली एकद्व्यादिल-गक्रिया म्हणजे कोणत्याही छन्दाच्या प्रस्तारांत, एकलघु, द्विलघु, त्रिगुरु, चतुर्गुरु वगैरे प्रकार किती किती असतात हें बिनचूक काढणें होय. वरचें

सूत्र व हें सूत्र हीं संख्यानाचाच एक विशेष प्रकार मानण्यास हरकत नाहीं. असो. आतां वृत्तिकारास संमत असा मेरुप्रस्तार देतों. प्रथम एक चौकोनी कोष्टक □ असें लिहून त्याखालीं दोहोंबाजूंस अर्धा अर्धा भाग जाणारीं दोन कोष्टकें  अशीं लिहावीं. अशाच प्रकारें खालीं खालीं, तीन, चार, पांच वगैरे कोष्टकें लिहावीं; म्हणजे चौकोनांच्या ओळीपैकीं पहिलें व शेवटचें कोष्टक अर्धें अर्धें बाहेर येईल; आणि प्रत्येकाच्या वरच्या कोष्टकाच्या मधोमध उभ्या रेघा येतील. ह्याला पहिला सूचिमेरुप्रस्तार असें छन्दःशास्त्रांत म्हणतात. असो; वर लिहिल्याप्रमाणें कोष्टकें लिहून झाल्यावर, वरच्या एकट्या कोष्टकांत व डाव्या आणि उजव्या बाजूच्या शेवटच्या कोष्टकांत एक हा आंकडा सर्वत्र लिहावा व नंतर हें सूत्र प्रवृत्त करावें. ह्याचा अर्थः—पर म्हणजे वर असणाऱ्या दोन कोष्टकांत, जे अंक असतील ते त्याखालीं असलेल्या कोष्टकांतून पूर्ण (बेरीज करून) मांडीत जावे. ह्याप्रमाणें सर्व कोष्टकें भरावीं, म्हणजे एकंदरींत, 'परे यत्तदधः पूर्णम्' असें अध्याहारयुक्त एक सूत्र होतें. ह्याखालीं पूर्वोक्त सूचिमेरुप्रस्तार थोडासा देऊन त्यावरून एकद्व्यादिवृत्तें कशीं ओळखावीं तें सांगतों.

सूचिमेरुप्रस्तार

१								
१	१							उक्ता.
१	२	१						अत्युक्ता.
१	३	३	१					मध्या.
१	४	६	४	१				प्रतिष्ठा.
१	५	१०	१०	५	१			सुप्रतिष्ठा.
१	६	१५	२०	१५	६	१		गायत्री.
१	७	२१	३५	३५	२१	७	१	उष्णिक्.

येथें फक्त सप्ताक्षरपादाच्या उष्णिक् छन्दापर्यन्तच सूचिमेरुप्रस्तार मांडला आहे. ह्याचप्रमाणें पुढें सव्वीस अक्षरांपर्यंत प्रस्तार मांडून एकद्या-दिलग ओळखावें. ह्या मेरूंत पहा. तिसऱ्या ओळींतील मधल्या कोष्टकांत, त्याच्या डोक्यावरील दोन कोष्टकांतले अंक (१ + १) एकत्र करून आलेले दोन, मांडले आहेत. ह्याचप्रमाणें प्रत्येक कोष्टकाच्या डोक्यावरील दोन कोष्टकांतल्या अंकांची बेरीज करून त्यामध्यें मांडली आहे. ह्या मेरूप्रस्तारापैकीं दुसऱ्या आडव्या ओळींत एकाक्षरपादी उक्ताछन्दाची लगक्रिया, तिसऱ्या ओळींत द्यक्षराची, (अत्युक्तेची), चौथींत त्र्यक्षर-पादाची, व पांचवींत चतुरक्षरपादाची लगक्रिया आहे वगैरे ओळखावें. जसें, दुसऱ्या ओळींत १, १ असे आंकडे आहेत म्हणून एकाक्षरपादांत एक सर्वगुरु व एक सर्वलघु अशीं दोन वृत्तें आहेत. हें ह्या मेरूच्या साह्यानें समजतें. सातवी चौकोनाची ओळ गायत्री छन्दाची असून तीमध्यें १, ६, १५, २०, १५, ६, १, असे आंकडे आहेत; म्हणून गायत्रीच्या प्रस्तारांत एक सर्व-गुरु, ६ एकलघु, १५ द्विलघु, २० त्रिलघु, १५ चतुर्लघु, ६ पञ्चलघु व एक षड्लघु किंवा सर्वलघुप्रकार आहे असें समजावें; किंवा ह्याच्या उलट पहिला एक सर्वलघु, ६ एकगुरु, १५ द्विगुरु, (दोन गुरूंनीं युक्त) २० त्रिगुरु, १५ चतुर्गुरु, ६ पञ्चगुरु, एक षड्गुरु, किंवा सर्वगुरु प्रकार आहे असें समजतें. ह्याचा ताळा. सर्व प्रस्तार मांडून मोजून पहा म्हणजे विशिष्ट संख्या बिनचूक आहेत हें दिसेल. ह्याचप्रमाणें पूर्वलिखित सूचि-मेरुप्रस्तारावरून कोणत्याही छन्दाची एकद्यादिलगवृत्तें कळतील. हा वर दिलेला प्रस्तार, वृत्तप्रकारांचा सूचक आहे म्हणून ह्याला सूचिप्रस्तार असें नांव आहे, व मेरुपर्वताप्रमाणें वर वर लहान अग्र होत गेल्यामुळें ह्याला मेरुप्रस्तारही म्हणतात. मात्र लगक्रिया ओळखण्यास प्रारंभ दुसऱ्या ओळीपासून होतो हें लक्षांत ठेवावें, किंवा आम्ही वर दिल्याप्रमाणें ओळी-

च्यापुढें उक्ता, अत्युक्ता, मध्या वगैरे छन्दांचीं नांवेंच क्रमानें लिहून ठेवावीं; म्हणजे संशय रहाणार नाहीं. असो. ह्याप्रमाणें सूत्रकारानें स्वतः, प्रस्तार, नष्ट, उद्दिष्ट, संख्यान व एकद्व्यादिलगक्रिया हे पांच प्रत्यय, म्हणजे वृत्तांचा प्रत्यय (ज्ञान) करून देणारे उपाय सांगितले आहेत. आतां अध्वपरिच्छित्ति अथवा अध्वयोग (प्रस्तार मांडण्याच्या जागेची गणना) हाही एक प्रत्ययप्रकार सूत्रानंतरच्या ग्रन्थांत आहे. तो सूत्रांत न देण्याचें कारण आम्ही मागेंच लिहिलें आहे. म्हणून तेवढ्याच कारणानें शास्त्रास कमीपणा येतो, असें होत नाहीं. वस्तुतः हें सर्व वृत्तिकारांच्या पाठास अनुसरून लिहिलें. दाक्षिणात्यांच्या किंवा वैदिकांच्या पुस्तकांत 'द्विर्द्धूनं तदन्तानाम्' ह्यानंतर 'एकोनेऽध्वा' असें सूत्र असून, संख्येची दुप्पट करून त्यांत एक उणा केला असतां तोच अध्वा किंवा प्रस्तार मांडायचा मार्ग होतो. असा त्याचा अर्थ असल्यानें, ही देखील न्यूनता रहात नाहीं. अध्वयोग हा सहावा प्रत्ययही सूत्रोक्तच आहे. वृत्तरत्नाकरांत केदारभट्टानेंही ह्याचेंच अनुकरण केलें आहे. एक अंगुळ प्रस्तारप्रकार मांडण्यास व त्यांवर एकेक अंगुळ नष्टोद्दिष्टांचे अंक मांडण्याकरितां प्रथमप्रकार सर्वगुरु हें सर्वच प्रस्तारांत ज्ञात होत असल्यानें त्याचें नष्टोद्दिष्ट काढावें लागत नाहीं म्हणून संख्यानाच्या दुपटींतून एक कमी करण्यास सांगितला. असो, यथामति लिहिलेलें श्रीपिङ्गलाचार्यकृत छन्दःशास्त्राचें हें संपूर्ण मराठी विवरण, माझ्याकडून पूर्ण झालें आहे. आमच्या वेदाङ्गार्थचन्द्रिका ह्या मालेपैकीं हें तिसरें पुस्तक आहे. वेदाङ्गशिक्षाविवरण व वेदांगजोतिषार्थ हीं पुस्तकें पूर्वींच लिहिलीं आहेत. त्यांच्यापेक्षां हा ग्रन्थ मोठा असून गद्यात्मक व सौत्रपद्धतीमुळें जरा अधिक कठिणही आहे. तथापि अनेक सांसारिक आपत्तींच्या विघ्नांना न जुमानतां नेटानें प्रयत्न करून, श्रीपिङ्गलनागाच्या सूत्ररूप विषाचा कडकपणा, महाराष्ट्र भाषाजलाच्या मिश्रणानें मोडून टाकून

त्याच्या छन्द:शास्त्राचें हें सौम्य रसायन बनविलें आहे. ह्याचें नियमानें व प्रमाणानें सेवन करीत गेल्यास जिज्ञासूंच्या छन्दोज्ञानाचे अवयव बळकट व पुष्ट झाल्यावांचून रहाणार नाहींत. ह्या शास्त्रांपैकीं बरींच वृत्तें हल्लीं कविप्रचारांत नसून पुष्कळशीं केवळ वैदिक आहेत. तसेंच कांहीं केवळ गानोपयोगी व पठनास आयास पडण्यासारखीं आहेत. त्या सर्वांचीं उदाहरणें शोधून किंवा रचून देण्यांत ग्रन्थविस्तार फार होईल व कालावधीही लागेल, म्हणून तें काम मी केलें नाहीं व त्याचें तितकें महत्त्वही नाहीं. कारण आमच्या ह्या वेदाङ्गमालेचा मुख्य उद्देश, ज्या वैदिक वगैरे ब्राह्मणांनीं आजपर्यन्त निरपेक्ष बुद्धीनें आत्मकर्तव्य म्हणून वेदवेदाङ्ग ग्रन्थ तोंडपाठ करून शिष्यपरंपरेनें त्यांची संपत्ती, आजतागायत आपणां सर्वांकरितां जिवन्त ठेविली आहे; त्यांना व इतर दुसऱ्या श्रद्धाळूंनांहि वेदाङ्गांच्या अर्थाचें यथार्थ ज्ञान सुलभ रीतीनें शब्दश: करून द्यावें हा आहे. ह्यानें आपण काय घोकतों किंवा वाचतों ह्याचा अर्थ त्यांना कळेल व शास्त्राभ्यासाकडे प्रवृत्ति होईल. हा उद्देश साधण्यास सर्व उदाहरणांचा फारसा उपयोग झाला नसता; व कांहीं ठिकाणीं तर अप्रसिद्धवृत्तांचें लिहिणें कंटाळवाणेंही झालें असतें. आणखी शिवाय नवीन कविता रचणाराला, कोणत्याही वृत्ताचा प्रस्तार गुरुलघु चिन्हांनीं मांडून रचना करणें सहज शक्य आहे; कारण त्या प्रकरणाचा ह्या ग्रन्थांत चांगलाच विस्तार झाला आहे. सव्वीस अक्षरांच्या पुढच्या वृत्तांचे प्रस्तारप्रकारही सूत्रोक्तन्यायानें लिहिणें शक्य आहे व योग्य आहे. अशा दृष्टीनें पहातां हें छन्द:-शास्त्र अनन्त व सर्ववाङ्मयव्यापी आहे; तथापि प्रस्ताराला अगोचर असें कोणतेंही वृत्त नाहीं इतकी ह्यांची व्याप्ति आहे. असो, प्रस्तारासंबंधीं एक परंपरागत दन्तकथा प्रचलित आहे ती सर्वांना समजण्याकरितां येथें देतों. एकदां छन्द:शास्त्रकार पिङ्गलनाग, ब्राम्हणाच्या वेषानें उज्जयिनींत महाकाल-

निवासी श्रीशंकराच्या दर्शनाकरितां आले होते. नंतर शिवदर्शन घेऊन परत पाताळांत जात असतां, श्रीगरुड हा जातिवैरामुळें त्यांना मारण्याकरितां अंगावर धावला असतां पिङ्गलनाग त्याला म्हणाले, मी एकप्रकारचें गणित भूमीवर लिहीत जातों त्यामध्यें एकदां लिहिलेली ओळ पुन्हा आली तर त्वां माझें भक्षण करावें. गरुडानें कौतुकानें ती गोष्ट कबूल केल्यावर पिङ्गलनागानें, एकाक्षरप्रस्तारापासून प्रारंभ करून सव्वीस अक्षरें पादांत असलेल्या उत्कृतीचे सर्व प्रकार संपेपर्यन्त, भूमीवर ओळीनें प्रस्तार मांडून, समुद्रापर्यन्त नेलें. गरुडानें, तें चातुर्य पाहून प्रसन्न होऊन श्रीपिङ्गलाचार्यांना सोडून दिलें. तसेंच हें तुझें शास्त्र लोकप्रसिद्ध व अत्युपयुक्त होऊन प्रत्यक्ष वेदांच्या चरणस्थानीं मानलें जाईल असा ह्या शास्त्रांला वरही दिला. ‘ छन्दः पादौ तु वेदस्य ’ ह्या वेदाङ्गशिक्षेच्या वचनांत हें स्पष्टच दिलें आहे. कोठें कोठें असें लिहिलेलें आढळतें कीं, समुद्रापर्यंत प्रस्तार लिहीत नेल्यानंतर, पिङ्गलनागानें एकदम समुद्रांत बुडी मारून गरूडापासून आपला प्राण वांचविला. ह्या शास्त्रांत उपयोग केलेली ऽ, । हीं गुरुलघुचिन्हें, नागाच्या वांकड्या व सरळ गतीसारखीं आहेत ही गोष्ट वरील आख्यायिकेस पोषकच आहे. ही गोष्ट विशेषतः लक्षांत घ्यावी. प्राचीन परंपरेमध्यें तर छन्दःसूत्रकारांना प्रत्यक्ष नागच मानीत आले आहेत. मग ते खरोखर नाग, किंवा नागावतार (पतञ्जलि) अथवा इतर सूत्रकारांप्रमाणें, नागजातीचे, परन्तु सामान्य मनुष्यच होते हें निश्चित समजण्याइतका इतिहास उपलब्ध नाहीं. वृत्तिकार भट्टहलायुध तर ‘ स जयति पिङ्गलनागः शिवप्रसादाद् विशुद्धमतिः ’ असेंच त्यांच्याविषयीं लिहितो. असो; ह्याप्रमाणें प्राचीन परंपरेस व नवीन ज्ञानासही अनुसरून ह्या छन्दःशास्त्राचें हें सांगोपांग विवरण महाराष्ट्र भाषेमध्यें लिहून

तयार केलें आहे. ज्या परमेश्वराच्या कृपेनें विघ्ननिवारण व ज्ञानोत्तेजन होऊन मजसारख्या सामान्य मनुष्याच्या हातून, ह्या कठिण व सूत्रबद्ध ग्रन्थाच्या विवरणासारखें जड काम पार पडलें त्याला व इतरही देव, ऋषि, सूत्रकार, गुरु व आस्तिकब्राम्हण ह्यांना शुभोदर्काकरितां अत्यन्त सद्भावानें वन्दन करून शेवटीं, मी, हा ग्रन्थ त्याच सर्वान्तर्यामीं परमेशाच्या सेवेस अत्यंत लीनतेनें अर्पण करीत आहें. ॥ १६ ॥

ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥ चैत्र शु॥ १२ रविवार शके १८३६. मु. जळगांव, पूर्वखानदेश.

शुद्धिपत्रम्

—0—

पत्र	पङ्क्ति	अशुद्ध	शुद्ध
९	१५	पक	पफ
११	१९	त्या	ह्या
१९	६	इयादिः पूरणः	इयादिपूरणः
२३	१५	याचामि	यांचामि
२३	१८	आपः	आपंः
२६	१६	यङ्कु	न्यङ्कु
२६	१९	क्रोष्टुकेः	क्रौष्टुकेः
३३	१३	परिणाम	विपरिणाम
३४	२३	तीन	दोन
४८	४	र्वः साकम्	पूर्वः साकम्
४९	२३	परयुक्ते नोपचित्र	परयुक्तेनोपचित्रा
६२	२२	जौग्	जौंग्
६७	९	हीं	ही
७४	२०	नगरर	ननरर
८१	१९	न्त्रौ	न्त्रौ
८४	२	चौदा	चौदापर्यंत
८५	८	पांचपांच व	पांच व
८७	९	भ्रा	भ्रौ

C / 2-13